
# माणूस

१५ मार्च १९६९ । चाळीस पैसे



## हिटलरच्या शत्रूंना जे साधले ते गांधीजींच्या भक्तांना साधू नये!

# दोन जीवनयात्रा

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : आठवे : अंक : बेचाळीसावा

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

**स. न.** फेब्रुवारी, २७

मी आपला सुरुवातीपासूनचा एक नियमित वाचक आहे. ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिज यांच्यातील क्रिकेट-मालिका संपली. आपल्याकडील रणजी क्रिकेट सामनेही पार पडलेत. दुलिप स्पर्धा निम्म्यावर आली. एवढे होऊनही 'माणूस'ने क्रिकेटची दखल घेतली नाही. क्रिकेटच नव्हे तर इतर खेळांबद्दलही आपण उदासीन असता हे पाहून फार वाईट वाटते.

आपली ठराविक साच्यातून लिहिलेली पुस्तक परिक्षणे कंटाळवाणी वाटतात. केवळ तुम्हांलाच हव्या असलेल्या पुस्तकांची आपण दखल घेत असता, असा वास येतो. **वसंत भणगे**, पार्ले, मुंबई.

**स. न.** फेब्रुवारी, २८

मध्यंतरी कामाच्या गडबडीत 'माणूस'चे काही अंक वाचू शकलो नाही. आजच १ मार्चचा अंक वाचला.

'अमृता प्रीतम' आणि 'मैफल' उत्कृष्ट आहेत. सर्वांत निशिकांत मिरजकरांचे दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या 'ऑफियम'चे परीक्षण आवडले. परीक्षण उत्कृष्ट होते.

'माणूस'चा बौद्धिक दर्जा कायम नव्हे वरचेवर वाढतच आहे, याचे समाधान वाटते. काही नवकविता वाचायला मिळाल्या तर अंकाचा दर्जा नक्कीच वाढेल.

**ना. का. घट**, खार, मुंबई.

किंमत : ४० पैसे
१०२५ सदाशिव
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. कल्पित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

सु. ल. सोमण

# राष्ट्रीय अर्थसंकल्प

"ह्या मोरारजींचा अर्थसंकल्प म्हणजे उघड उघड गरीबांची गांजवणूक आणि बड्यांची धन आहे झाले! इंग्रजी राज्यात किमती बऱ्याचशा स्थिर होत्या. काँग्रेसी राज्यात गेल्या वीस वर्षांत मात्र करांची ओझी वाढताहेत, धान्यांचे भाव जवळ जवळ आठ-दहा पटींनी वाढलेत, आणि उत्पन्नात मात्र त्यामानाने वाढ नाही. शेठियांच्या इमारतींवर मजलेच्या मजले चढत आहेत, मध्यमवर्गीय-गरीब मात्र अधिकाधिक भुकेकंगाल बनताहेत! अरे, टिळक-गांधींच्या पुढारीपणाखाली लढले ते सारे मध्यमवर्गीय आणि गरीबच! पण स्वातंत्र्याचा मलिदा चाखताहेत मात्र एकजात ढेरपोटे! हे कुठले स्वातंत्र्य? ह्यापेक्षा ब्रिटिश राजवटीतच आम्ही दोन घास सुखाने खात होतो!" केन्द्रीय अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाईंनी लोकसभेत तुटीचा अर्थसंकल्प, जवळ जवळ १५८.६० कोटी रुपयांचे नवे कर लादून सादर केल्याच्या बातम्या झळकल्या, त्याच दिवशी सत्तरीच्या आसपास झुकलेल्या एका वृद्धाने हे जळजळीत उद्‌गार बसच्या प्रवासात, आपल्या शेजाऱ्याशी चर्चा करताना काढले! त्यांच्याच संभाषणातून कळले की, त्या वयस्कर गृहस्थाने बेचाळीसच्या लढ्यात स्वतःची नोकरी, घरदार, वगैरे सर्वांवर पाणी सोडले होते, आणि आज एका चाळीतल्या लहानशा खोलीत ते कशीवशी गुजराण करीत होते. आर्थिक परिस्थितीमुळे मुलांना ते धडपणे शिकवू शकले नव्हते. अर्थात मुलांच्या नोकऱ्यांतूनही त्यांची आर्थिक कोंडी फुटली नव्हती. त्यांच्यावर उद्धृत केलेल्या वाक्यामुळे बऱ्याच जणांना त्यांचा राग आलेला दिसला, काही फिदीफिदी हसलेही, परंतु, त्यांच्या कटुतेमागचा इतिहास समजला, तेव्हा त्या खच्चून भरलेल्या बसमधली, जवळ जवळ प्रत्येक व्यक्ती विमनस्क बनली! त्यांना जास्त मानमरातब नको होते, राजकीय महत्त्वाकांक्षा त्यांना नव्हत्या, पण स्वराज्यात सुखासमाधानाने दोन घास मिळावेत ही त्यांची साधी अपेक्षा होती! पण, दुर्दैवाने स्वातंत्र्य-सैनिक असूनही, त्यांची ती अपेक्षा पूर्ण होत नव्हती! मोरारजींच्या 'बजेट'ने त्यांच्या स्वराज्याच्या कल्पनांना सुरुंग लावला होता, आणि त्याची दखलही बहुधा कुणाला नसावी.

उपपंतप्रधानांनी सादर केलेल्या यंदाच्या अर्थसंकल्पाचे वैशिष्ट्य हे की, मंत्रिमंडळातल्या त्यांच्या सहकाऱ्यांशिवाय व काही थोड्याशाच अर्थशास्त्रज्ञांशिवाय, इतर बहुतेक सर्वांनी ह्या संकल्पावर कडाडून हल्ले चढवले. खुद्द काँग्रेसजनांनीही ह्या अर्थसंकल्पाचे समर्थन करावयाचे टाळले. अर्थमंत्र्यांचा प्रत्यक्ष अर्थसंकल्प

त्यातली आकडेवारी, विविध राजकीय आणि सामाजिक पुढाऱ्यांच्या प्रतिक्रिया आणि अर्थशास्त्रज्ञांची मते इत्यादींवर बहुतेक सर्व वृत्तपत्रांनी इतकी प्रदीर्घ चर्चा केली आहे, की त्या तपशिलात मी जाऊ इच्छित नाही. परंतु ज्या जनतेवर, ह्या संकल्पाचा तावडतोब परिणाम होणार आहे, आणि अशांतल्या ज्यांच्याशी बोलायची संधी मला मिळाली, त्यांतल्या काही मासलेवाईक प्रतिक्रिया मात्र मी 'माणूस'च्या वाचकांना सादर करणार आहे. त्यांतलीच एक कानाला कडू लागणारी, पण अंतःकरण तळमळून ओकणारी प्रतिक्रिया मी सुरुवातीला उद्धृत केली आहे.

"लेकाचे समाजवादाच्या गप्पा मारतात. कुठे दिसतो का हो तो समाजवाद ह्या बजेटात? ह्या बजेटाने नागवला जाणार तो मध्यमवर्गीय, आणि मोरारजींनी जाहीर केलेल्या सवलतींनी लाखोपती होणार करोडोपती! दोन समाजांतली भिन्नता कमी करायच्या वल्गना तेवढ्या करायच्या, न् प्रत्यक्षात मात्र करायचे ते नेमके उलटे! ह्या सर्वांवर एकच उपाय–कम्युनिझम! सर्व धनिकांची संपत्ती वाटून टाकायची सर्व गरीबांत!" एक तरुण, आपल्या टोळक्यात बसून आवेशात बोलत होता.

"अहो, ते बज्जेट-फिज्जेट काही समजत नाही बघा!" एका कामगाराला मी बोलते केले, तेव्हा तो म्हणाला. "इकडं सरकार बज्जेटं पास करती आणि तिकडं साखर महाग होती, म्हणजे च्याचा भावपण वाढलाच. बसचंपण भाडं वाढणार, बोलतात सगळे! अन् तिकडं आमच्या कामगार युनियनचापण घोळ. चार वर्षं झाली कोर्टात केस चाललीय. पुढारी येतात, म्हणतात, पगार घेऊ नका, चार टक्के बोनस घेऊ नका! साहेब म्हणतो, प्रॉडक्शन वाढवा नाहीतर नोटीस देऊ. त्यात सरकार साऱ्या किंमती वाढवतं! कसं जगायचं तेच समजत नाही बघा! जीव द्यायला भीती वाटते न् घरात कच्ची-बच्ची आहेत म्हणून जगायचं, पण त्यात काही राम नाही बघा!"

एका मध्यमवर्गीय गृहिणीने मोरारजींच्या नावाने अक्षरशः शिव्यांची लाखोली वाहिली. दैनंदिन जमाखर्चाची तोंडमिळवणी करताना तिची आधीच त्रेधातिरपीट उडत होती आणि त्यातच रॉकेल, विजेचे दिवे, साखर, सिगरेट्स, पाव वगैरेंचे भाव वाढणार म्हणून ती पार वैतागली होती. शेती व खतांवरील करांमुळे सर्वच अन्न-धान्यांचे व इतर जीवनावश्यक वस्तूंचे भाव कडाडणार ह्याबद्दल तिची खात्री असल्याचे दिसले. हलक्या प्रतीच्या कापडावरील कर कमी होणार म्हणताच ती म्हणाली, "ही कापडं वापरणं परवडतंच कुणाला? लॉंड्रीचे दर बघितलेत एकदा? आता साबण-सोडा महागला की बघायलाच नको! ते कपडे स्वच्छ ठेवण्यात आणि व्यवस्थित वापरण्याचाच खर्च एवढा अफाट वाढलाय् की त्यापेक्षा टेरिलीन-टेरिकॉटच दीर्घकालीन विचार करता फायद्याचं वाटतं. तिथंही सरकारनंच मध्यम-वर्गीयांचाच कोंडमारा केला."

टॅक्सी ड्रायव्हर्स, लाँड्रीवाले, छोटे छोटे दुकानदार कुणीच खूष दिसले नाहीत. पेट्रोलवरील वाढीव करामुळे टॅक्सीवाल्यांना भाववाढ करण्यावाचून गत्यंतर नाही असे दिसले. पण त्यांच्या मते टॅक्सीचे दर पन्नासवरून ऐंशी पैशांवर गेले तेव्हाच कमीत कमी वीस टक्के गिऱ्हाईक कमी झाले. आता आणखीन दर वाढवले तर ते थेट पन्नास टक्क्यांवरच गिऱ्हाइक आणून सोडेल. लाँड्रीवाले, छोटे दुकानदार ह्यांची प्रतिक्रियाही काहीशी अशीच होती. दोन-तीन दिवसांत, भिन्न भिन्न थरांतल्या जवळ जवळ पंचवीस लोकांशी बोलण्याची संधी मिळाली. त्यांतले कुणीही कुठल्याही राजकीय पक्षाचे सभासद नव्हते किंवा कुणीही कुठल्याही पक्षाचा गंडा बांधलेला नव्हता. हे सारे चाकोरीबद्ध जीवन जगणारे सर्वसामान्य जीव होते. त्यांतले कुणीही विचारपरिप्लुत लेख-अग्रलेख वाचून त्यांतल्या मतांची पोपटपंची करणारे नव्हते किंवा तर्कदुष्ट विचारपद्धतीचा अवलंब करणारेही नव्हते ! आणि म्हणूनच त्यांच्या निव्वळ जीवनातल्या समस्यांवर आधारलेल्या ह्या मतांचा विचार राजकीय कार्यकर्त्यांनी जरूर केला पाहिजे. ह्या पंचवीस जणांपैकी फक्त दोघांनीच (म्हणजे ही छोटीशी पाहणी म्हटल्यास, त्यांतल्या फक्त आठ टक्क्यांनी) ह्या संकल्पाचे, त्या संकल्पामुळे भाववाढ होणार हे मान्य करूनही, समर्थन केले. त्यांच्या मते ह्या अर्थसंकल्पामुळे उद्योगधंद्यांमध्ये गुंतवणूक करायला प्रोत्साहन मिळून, त्यायोगे देशाची औद्योगिक प्रगती झपाट्याने होईल व देश स्वावलंबनाच्या दिशेने वाटचाल करू लागेल. त्यांच्या मते शेती, संपत्ती, खते, इमारती इत्यादींवरील कर, खेड्यांतली संपत्ती राष्ट्रविकासकार्यात आणायला मदतच करील; त्यामुळे समतोल ढळायचा प्रश्नच येत नाही ! अर्थात भाववाढ अत्यंत निष्ठुरतेने रोखली गेली आणि काळा पैसा बाहेर आणला गेला, तर हा संकल्प देशाचा कायाकल्प घडवून आणील असेही त्यांनी सांगितले !

परंतु उरलेल्या तेविसांनी संकल्पाचा निषेधच केला. त्यातली काही मते वर आली. उरलेल्यांचा मथितार्थ असा–"मूठभर धनिक आणि राजकीय पुढारी ह्यांच्या संगनमताने देशाचा राज्यकारभार चालतो. निवडणुका जवळ आल्या की, थोड्या सवलती मिळतात, महागाई भत्ते वाढतात. ते संपलं की पुन्हा आश्वासनांवर बोळा फिरवून करांचं ओझं जनतेच्या माथी मारलं जातं....नवीन उद्योगधंद्यांचे परवाने एका मर्यादित वर्तुळाबाहेर फिरत नाहीत, न् शक्यतो त्या वर्तुळाच्या आर्थिक साम्राज्याला धक्का न लागेल ह्याच अंदाजाने संकल्प, योजना राबवल्या जातात ... एक गुलामगिरी नष्ट झाली आहे, पण हे आर्थिक जू त्यापेक्षाही जड आहे...एवढे कर लादले जातात, नि तरीही ह्यांचं बजेट तुटीचंच ! हा कसला अर्थसंकल्प ! म्हणजे जनतेला करांच्या ओझ्याखाली तुडवायचं नि पुन्हा जगभर झोळी घेऊन भीक मागत फिरायचं ! भारतीयांची अब्रू चक्क चव्हाट्यावर मांडायची ! हे कुठलं नियोजन ?" देशांतल्या राजकीय पुढाऱ्यांनी–काँग्रेस व अन्य पक्षीयसुद्धा–

ह्या सर्वसामान्यांच्या प्रतिक्रियांचा विचार केलाच पाहिजे; त्यांच्या अंतर्मनांत धुमसत असलेल्या ज्वालामुखीची दाद, तो जागृत होण्यापूर्वीच घेतली पाहिजे !

# अध्यक्ष निक्सन, युरोप आणि रशिया

गेली दोन दशके विविध शस्त्रास्त्रांच्या, क्षेपणास्त्रांच्या नि अण्वस्त्रांच्या निर्मिती स्पर्धेत घालवून, उभ्या जगाला सतत शीतयुद्धाच्या उदास वातावरणात वावरायला लावल्यानंतर, आता जगातल्या दोन्ही वड्या राष्ट्रांना शांतताविषयक बोलणी करायची तहान लागलेली आहे. स्वतःची आर्थिक राजकीय साम्राज्ये जगभर पसरवून ह्या वडयांनी सर्वत्र आपले हितसंबंध निर्माण केले आहेत, नि म्हणूनच जगाच्या पाठीवर कुठेही जरी ठिणगी उडाली तरी त्या ठिकाणी ह्या दोन वडयांचा प्रत्यक्ष संघर्ष उभा राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अशा तऱ्हेचा प्रत्यक्ष संघर्ष म्हणजे तिसरे महायुद्धच ! हे अणुयुद्ध ठरेल आणि त्यांत जगातल्या मानवाच्या अस्तित्वालाच सुरुंग लागण्याची शक्यता आहे, ह्याही गोष्टी वडयांना माहीत. म्हणूनच आजपर्यंत असे प्रत्यक्ष संघर्ष टाळायचाच प्रयत्न केला गेला. अशा तऱ्हेच्या संघर्षाचे संभाव्य स्वरूप कसे असेल, ह्याची पुसट कल्पना, सात वर्षांपूर्वी क्यूबा प्रश्नावरून जगाला आली आहे ! आज अशा तऱ्हेचे प्रत्यक्ष संघर्ष तर टाळले जातच आहेत; परंतु शक्यतो अण्वस्त्र बंदी, शस्त्रकपात, शांतता-करार वगैरेंसारख्या कायम स्वरूपांच्या उपाययोजनांचाही विचार केला जात आहे ! ह्या प्रयत्नांची निकड उभयपक्षी जाणवत आहे. अध्यक्ष निक्सन ह्यांनी रशियाशी बोलणी करण्याचा मानस व्यक्तविताच, अमेरिकेतील रशियन राजदूत श्री. डॉब्रिनिन ह्यांना अध्यक्षांची खास मुलाखत घ्यायचा आदेश रशियाहून आला. त्यांनी भेट घेऊन उभयपक्षी बोलणी लौकरात लौकर व्हावीत, अण्वस्त्रबंदी अंमलात यावी इत्यादींसाठी रशिया उत्सुक असल्याचे अध्यक्ष निक्सन ह्यांना सांगितले. अध्यक्ष निक्सन ह्यांना रशियन भेटीचे आमंत्रणही सो. रशियाच्या वतीने ह्याच वेळी देण्यात आले. आणि कदाचित् सर्व सुरळीत जमले तर येत्या हिवाळ्याच्या सुमारास अमेरिकन अध्यक्ष रशियात असतील !

परंतु अध्यक्ष निक्सन ह्यांना, रशियाशी प्रत्यक्ष बोलणी सुरू करण्यापूर्वी आपल्या युरोपीय व नाटो राष्ट्रांबरोबरच्या फळीची मजबूती करणे आवश्यक वाटते, आणि त्याच हेतूंनी त्यांनी बेल्जियम, ब्रिटन, इटली, प. जर्मनी व फ्रान्स ह्या पाच राष्ट्रांचा आठ दिवसांचा दौरा आखला व तो पूर्णही केला. माजी अध्यक्ष जॉन्सन ह्यांनी युरोपला विश्वासात घेतले नाही व युरोपकडे दुर्लक्ष केले ह्या आरोपांचे निराकरण करणेही त्यांना आवश्यक होते आणि म्हणूनच, रशियाशी होऊ घातलेल्या बोलण्यांविषयी युरोपीय राष्ट्रप्रमुखांशी सल्लामसलत करायची, त्यांचे परस्पर हितसंबंधांचे

प्रश्न चर्चायचे, युरोपीय राष्ट्रांची एकसंध फळी उभी करून तिचा उपयोग रशिया-बरोबरील चर्चेत स्वतःची बाजू भक्कम करण्याच्या दृष्टीने करून घ्यायचा ही धोरणे नजरेसमोर ठेवूनच त्यांनी युरोपचा दौरा केला. ब्रिटन, इटली, बेल्जियम-बरोबर अमेरिकेचे काही वाद फारसे नाहीतच. ब्रिटिश पौंड सावरणे, ब्रिटनला अणुछत्रीचे संरक्षण देणे आणि युरोपच्या सामायिक बाजारपेठेत त्याला प्रवेश मिळवून देणे वगैरे काही प्रश्न होते; व त्यांची चर्चाही झाली. पश्चिम जर्मनीच्या संरक्षणाचा आणि प. बर्लिनमध्ये बुधवारी (५-३-६९) रोजी होऊ घातलेल्या अध्यक्षीय निवडणुकांबाबतचे पूर्व जर्मनी व रशियाच्या अडवणुकीच्या धोरणाचा असेच दोन महत्त्वाचे प्रश्न होते; परंतु ह्या सर्वच राष्ट्रांनी अध्यक्ष निक्सन ह्यांच्या रशियन भेटीला व रशियाबरोबर सुरू करायच्या बोलण्यांना संमती दर्शवली. अमेरिकेच्या दृष्टीने, सर्वांत कटकटीचे युरोपीय राष्ट्र म्हणजे फ्रान्स! जनरल द गॉल व अध्यक्ष निक्सन ह्यांच्यांत वाटाघाटींच्या तीन फेरी झडल्या; परंतु त्यांचा फारसा तपशील बाहेर आलेला नाही. परंतु अध्यक्षांना निरोप देताना द गॉल ह्यांनी सांगितले, " आपली भेट उभय राष्ट्रांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरली आहे. आपलं व्यक्तिमत्त्वही तिनं उजळ केलं आहे." १९७० च्या सुरुवातीला अमेरिकेला भेट द्यायचेही त्यांनी मान्य केले आहे. पॅरिस वाटाघाटींनंतर, वॉशिंग्ट-नला परतताच अमेरिकन सेक्रेटरी ऑफ स्टेट श्री. विल्यम रॉजर्स हे रशियन राजदूत श्री. डॉब्रिनिन ह्यांची भेट घेऊन पुढील तपशील ठरवतील असे जाहीर झाले आहे. थोडक्यात अध्यक्षांची युरोपीय भेट यशस्वी झाली असेच म्हणावे लागेल.

[ पृष्ठ ६४ वर ]



## □ शशी, बाबा ' मौन ' पाळ !

बिर्ला यांचा बंगला हे गांधीजींचे स्मारक म्हणून सरकारने ताब्यात घ्यावा या अभिनव कल्पनेचे जनक काँग्रेस खासदार शशीभूषण यांना पुन्हा 'बौद्धिक झटका 'च आलेला आहे. परवा इंदूरला त्यांनी सांगितले की, मुदतपूर्व निवडणुकांत काँग्रेसला चारी प्रांतांत यश आले नाही त्याचे कारण काँग्रेसचे असंख्य ' पावली ' सभासद हे ' बोगस ' आहेत. म्हणजे जी माणसे अस्तित्वातच नाहीत त्यांची काँग्रेस सभासद म्हणून वर्गणी भरली गेली आहे. अशा गोष्टी काय चारचौघांत बोलतात ? काँग्रेस सभासद का पडावेत हे आमच्या अर्थात लक्षात आलेले नाही. काँग्रेसचे सभासद जसे ' बोगस ' तसे मतदारही ' बोगस ' असावेत, त्याशिवाय हे घडणार नाही. मागील निवडणुकीत पराभूत झालेल्या के. डी. मालवीय यांची वर्णी, रांची येथील ' हेवी इलेक्ट्रिकल्स ' कारखान्याचे संयोजक म्हणून लावण्यात आली होती. ' फुलपूर ' हा पंडितजींचा मतदारसंघ. तेथे लोकसभेची निवडणूक येताच, मालवीयजी हे रांची सोडून ' फुलपूर 'ला काँग्रेस उमेदवार झाले, ते अशा खात्रीने की, निवडणूक जिंकल्यासारखीच आहे–मग मंत्रिमंडळात तडक जाऊ. परंतु सं. समाजवादी पक्षाचे जनेश्वरप्रसाद मिश्रा यांनी त्यांना अपशकुन केला. मालवीयजी पडले. जनतेने मालवीय यांच्यावर जो अन्याय केला त्याची कारणे काय, असा प्रश्न शशीभूषण यांना विचारताच त्यांनी ताडकन् सांगितले, " याचे कारण जातीयवाद. " हा जातीयवाद कसा काय हे आमच्या तरी लक्षात येत नाही. कारण के. डी. मालवीय जसे ब्राह्मण तसे जनेश्वरप्रसाद हेदेखील ब्राह्मण. इथे जातीयवाद नसल्यामुळेच मालवीय पडण्याची शक्यता आहे. फुलपूरचे ' रणांगण ' वाटले तितके सोपे नव्हतेच. याच मतदारसंघात किमान १५० मतदान केंद्रांवर पंडित नेहरूंविरुद्ध राम मनोहर लोहियांनी अधिक मते मिळवली होती. त्या वेळी नेहरूजी निवडून आले खरे; परंतु त्यांनाही सं. सो. पा. ने धसका दिला होता. मालवीयजींचे जाऊ द्या. आम्हांला आता शशीभूषण यांची काळजी वाटू लागली आहे. ज्या अर्थी ते निवडून आले आहेत त्या अर्थी त्यांच्या मतदारसंघात ' बोगस ' कुणीही नसावे व जातीयवादही नसला पाहिजे. परंतु हे जर असे बोलत राहिले तर १९७२ साली ते निवडून येण्याची शक्यता आम्हांला तरी कमी दिसते. लोकसभेत आता एकही काँग्रेस खासदार कमी होणे इष्ट नाही, हे लक्षात घेऊन इंदिराजींनी शशीभूषण यांना बोलावून–" तुम्ही काँग्रेस कार्य केले नाही तरी चालेल, परंतु बोलू नका, निदान मौन पाळा. " असे निक्षून सांगणे आवश्यक आहे. महात्माजींचा एवढा एक साप्ताहिकी गुणही, अनेकांना अंती हिताचा ठरेल.

–ज्ञानबा

# धरण प्रकल्पातील वाढत्या गाळाचा प्रश्न

सर्व देशभर सरासरी वार्षिक पाऊस जो पडतो त्यायोगे आपणांस ३००० दशलक्ष एकर फूट पाणी उपलब्ध होते, असा अंदाज आहे. त्यापैकी १६५० दशलक्ष एकर फूट पाणी बाष्पीभवन वगैरेंमुळे वाया जाते व १३५० दशलक्ष एकर फूट पाणी देशातील निरनिराळ्या नद्यांच्या पात्रांत समाविष्ट होते. जमिनीचा उंच-सखलपणा, हवामानातील फेरबदल, पाण्याच्या प्रवाहांची प्रकृती व मातीचा गुण-धर्मविशेष इत्यादी मर्यादांमुळे हे सर्वच्या सर्व पाणी ओलितासाठी वापरणे शक्य होत नाही. पाणीपुरवठ्याच्या कमाल सोयी गृहीत धरल्या तरी एकूण उपलब्ध पाण्यापैकी ४५० दशलक्ष एकर फूट पाणीच ओलितासाठी उपलब्ध होऊ शकेल, असा अंदाज आहे.

जमिनीत मुरणाऱ्या पाण्याच्या योगे प्रतिवर्षी २१५ दशलक्ष एकर फूट पाणी उपलब्ध होऊ शकेल. मात्र अनेक अडचणींमुळे यांपैकी केवळ १६५ दशलक्ष एकर फूट पाणीच, विहिरी व नलिकाकूप यांच्या साहाय्याने ओलितासाठी वापरता येईल. या पाण्याच्या द्वारे ५५ दशलक्ष एकर जमिनीस हुकमी पाणीपुरवठा करता येईल. त्यापैकी २७ दशलक्ष एकर जमिनीस सध्या पाणीपुरवठ्याची सोय करण्यात यश मिळाले आहे. उरलेल्या जमिनीस उपलब्ध पाणीपुरवठा प्रत्यक्षात पोहोचविण्याचे काम चौथ्या व नंतरच्या पंचवार्षिक योजनांत हाती घेण्यात येणार आहे. चौथ्या योजनेत ओलित योजनांसाठी ११४० कोटी रु. ची तरतूद उपलब्ध व्हावी असा संबंधित खात्यांचा प्रयत्न आहे. पैकी ८३९ कोटी रु. सध्याच्या पाणीपुरवठा योजना पुऱ्या करण्यासाठी व उरलेले नवीन प्रकल्पांसाठी अशी वर्गवारी आहे.

वरीलप्रमाणे रक्कम उपलब्ध होऊन कार्यवाही झाल्यास उपलब्ध प्रवाही पाणी-साठ्यापैकी ४७ टक्के साठ्याचा विनियोग मोठ्या, मध्यम व लहान ओलित योज-नांच्या द्वारा होऊ शकेल.

मागील तीन पंचवार्षिक योजनांमध्ये ४६५ मोठ्या व मध्यम पाणीपुरवठा योजना हाती घेण्यात आल्या. पैकी २०० योजना पुऱ्या झाल्या. छोट्या पाणी-पुरवठा योजना जमेस धरता तिसऱ्या योजनेअखेर १५० दशलक्ष एकर फूट पाण्याचा विनायोग करण्याची तजवीज झाली. यापुढे जमिनीच्या पृष्ठभागावरील व आतील पाण्याचा सुसूत्र विनियोग करून एकाच जमिनीत दुसरी पिके घेता यावीत, अशी तजवीज करण्याचा प्रश्न महत्त्वाचा आहे.

मोठमोठ्या धरण योजना प्रत्यक्षात आणताना नद्यांच्या पात्रात अमूक एका प्रमाणात गाळ साचेल असे आडाखे बांधून त्यांनुसार रचना केली होती. यांपैकी

काही योजनांची तपशीलवार पाहणी करता असे आढळून आले आहे की, गाळसाचणीचे प्रमाण आडाख्यापेक्षा बरेच जास्त आहे. या अतिरिक्त गाळाचे आक्रमण प्रत्यक्ष पाणी-साठ्यावर होत असून त्यामुळे उपलब्ध पाणीसाठ्यावर विपरीत परिणाम होत आहे. या धरणयोजनांची उपयुक्तता दीर्घकाळ राहावी यासाठी नदी व कालवे यांतील गाळाचे प्रमाण कमीतकमी राहील यासाठी उपाययोजना करण्याची निकड निर्माण झाली आहे.

धरणयोजनांच्या पाणलोटाच्या क्षेत्रात येणाऱ्या सर्व जमिनींस भूसंधारण उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. ज्या जमिनीचा ज्या पिकास सर्वोत्तम उपयोग आहे तसाच तो करून घेणे व जमिनीचा कस कायम ठेवून त्याचा पुरेपूर विनियोग करून घेणे हे भूसंधारणाचे सर्वसाधारण सूत्र आहे. धरणयोजनांच्या बाबतीत मुख्य धरणातील गाळ शक्य तेवढ्या कमी वेळात कमी करणे हे भूसंधारण उपाययोजनांचे उद्दिष्ट आहे.

भूसंधारण उपायांच्या निश्चित यशासाठी जमिनीचे पाणी वाहून जाण्याच्या प्रमाणानुसार गट पाडावे लागतात. योग्य त्या उपाययोजनेकरता सर्व प्राथमिक तपशील, गाळसाचणीचे प्रमाण, स्वरूप व व्याप्ती, दुय्यम व तिय्यम नद्यांतून गाळ वाहून येण्याचे प्रमाण, नद्यांच्या पात्रातील विविध विभागातील धुपणीचे प्रमाण, हवामानविषयक आकडेवारी यांची जरुरी आहे. ही माहिती मिळाल्यावर पाणलोट क्षेत्रापैकी कोणत्या क्षेत्रास गाळनिरोधक उपायांची अधिक जरुरी आहे हे ठरवून पुढील ५ ते १० वर्षांची योजना तयार करावी लागते.

तिसऱ्या योजनेत १४ धरण प्रकल्पांमधील भूसंधारण योजनांसाठी ११ कोटी रुपयांची तरतूद केली होती. १९६८-६९ सालापर्यंत २४६० चौरस मैल पाणलोट क्षेत्रांवर गाळनिरोधक उपाययोजना पूर्ण झाली असून त्यावर २३ कोटी रुपये खर्ची पडले आहेत. पण एकूण समस्येच्या मानाने ही उपाययोजना अत्यंत तोकडी आहे. केंद्राच्या अखत्यारात चालणाऱ्या या कार्यक्रमाच्या अंतर्गत आतापर्यंत १४ धरण प्रकल्पांतील केवळ २५०० चौरस मैल क्षेत्र आले असून अद्याप या प्रकल्पातील २२,५०० चौरस मैल क्षेत्रावर उपाययोजना व्हावयाची आहे. खेरीज अन्य छोट्यामोठ्या धरण प्रकल्पांमधील पाणलोट क्षेत्रातही या उपाययोजनेची निकड आहे. भूसंधारण योजना दीर्घ मुदतीच्या असतात व त्यांचा परिणाम दिसण्यास वेळ लागतो हे लक्षात घेता या कामाची निकड अधिक ध्यानी येईल.

जमिनीवरील विविध वनस्पतिजीवन जमिनीचा कस तर वाढवितेच, शिवाय या वनस्पतींमुळे पाणी वाहून जाणे व नदीनाल्यांत गाळ वाहून जाणे या प्रक्रियांस पायबंद बसतो. विविध कारणांमुळे देशातील वनस्पतिजीवन अधिकाधिक उद्ध्वस्त होत आहे. हा प्रकार असाच चालू राहिला तर गाळाच्या धोक्यामुळे धरण प्रकल्प निकामी होण्याचा संभव आहे. त्यामुळे भूसंधारण उपाययोजनांना वनस्पतिजीवनाच्या अभिवृद्धीची साथ मिळणे अत्यावश्यक आहे. ○



# दोन

वसु भगत

# महात्मा

महात्मा गांधी आणि अ‍ॅडॉल्फ हिटलर.

दोन परस्परविरोधी जीवनप्रणालींचे प्रणेते.

दोन परस्परविरोधी दिशांना जाणाऱ्या जीवनमार्गावरचे पथिक.

दोघांच्या निष्ठा निरनिराळ्या होत्या. प्रेरणा भिन्न होत्या.

साध्य वेगवेगळे होते. साधने विभिन्न होती.

पण, दोघांचेही कर्तृत्व अफाट होते. ताकद अमाप होती.

दोघांनीही सारे जग हलवून सोडले होते.

जीवनयात्रेत एकाने आपल्या स्कंधावर शांती आणि अहिंसेची ध्वजा धारण केली होती.

दुसऱ्याचा आपल्या बाहुबलावर आणि शस्त्रबलावर वज्रविश्वास होता.

## द राईझ अँड फॉल ऑफ द थर्ड रीह्

# जीवन यात्रा


एकाच्या ओठांवर स्वातंत्र्याचे स्वप्नील गीत होते.

दुसऱ्याच्या नजरेत युद्धाचे आणि साम्राज्याचे रुद्रभीषण स्वप्न होते.

पण, दोघांचीही स्वदेशभक्ती संशयातीत होती.

दोघांचेही आपल्या देशावर, आपल्या लोकांवर अपरिमित प्रेम होते.

दोघांच्याही भव्योत्कट स्वप्नांतील उणीवा आज सूर्याच्या प्रकाशात आम्हांला स्पष्टपणे दिसून येत असल्या तरी एक क्षण असा होता की, त्या स्वप्नांनी



आम्ही भारून गेलो होतो. त्या दोन जीवनमार्गांव्यतिरिक्त आणखी एखादा वेगळा मार्ग असू शकतो, असे आम्हांला वाटतच नव्हते.

आजही वाटत नाही.

आजही आम्ही युद्ध आणि शांतता यांच्या सरकत्या सांध्यावर त्रिशंकू होऊन ओंठगून राहिलो आहोत.

गांधी आणि हिटलर यांच्या स्वप्नांनी आजही आमचे जीवन व्यापून टाकले आहे. झाकोळून टाकले आहे. आकाशाने सारी पृथ्वी झाकोळून टाकावी, तसे !

कारण, ते दोघेही महापुरुष होते.

अगदी खऱ्याखऱ्या अर्थाने युगपुरुष होते.

या दोन्ही महापुरुषांच्या कर्तृत्वाची कर्मभूमी वेगवेगळी असली तरी कालखंड एकच होता, हा मोठा चमत्कारिक योगायोग आहे. आणि या दोघांच्याही जीवनांचे दर्शन घडविणे, वस्तुपट एकाच वेळी पाहावयास मिळावे, हाही तितकाच चमत्कारिक योगायोग आहे.

हे वर्ष गांधीजींच्या जन्मशताब्दीचे वर्ष आहे. त्या निमित्ताने भारत सरकार व गांधी स्मारक निधी समितीच्या वतीने अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गांधीजींच्या जीवनकार्याचे व तत्त्वज्ञानाचे दर्शन घडविणाऱ्या वस्तुपटाची निर्मिती हा या कार्यक्रमाचाच एक भाग आहे. त्यानुसार, गांधी स्मारक निधी समितीने तेहतीस रील्सचा म्हणजे जवळजवळ सहा तास लांबीचा एक दीर्घ वस्तुपट तयार केला असून भारत सरकारच्या वस्तुपट विभागाने तो प्रदर्शित केला आहे.

नेमक्या याच वर्षी, हिटलरची जन्मशताब्दी किंवा मृत्युशताब्दी नसतानाही होल्पर या संस्थेने हिटलरच्या जीवनाचे व कर्तृत्वाचे दर्शन घडविणारा एक वस्तुपट तयार केला असून मेट्रो. गोल्डविन-मेयर या संस्थेने तो प्रदर्शित केला आहे. या वस्तुपटाची लांबी अकरा रील्स म्हणजे सुमारे पावणेदोन तास आहे.

हा तपशील सांगण्याचे कारण एवढेच की, हिटलरच्या नाट्यपूर्ण जीवनाने आणि झंझावाती कर्तृत्वाचे ' द राईझ अँड फॉल ऑफ द थर्ड रीइ ' या वस्तुपटाने अवश्य दीड–पावणेदोन तासांत जसे विलक्षण प्रभावी दर्शन घडविले आहे तसे प्रभावी दर्शन ' महात्मा ' हा वस्तुपट जीवघेण्या सहा तासांतही घडवू शकत नाही.

' महात्मा ' या वस्तुपटाचा प्रारंभ होतो एका दीर्घ निवेदनाने. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाचे या वस्तुपटात सम्यक्‌दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला गेला असून गांधीजींच्या जीवनाचा व्याप लक्षात घेता वस्तुपटाची लांबी तेहतीस रील्स होणे अपरिहार्यच होते वगैरे वगैरे, या निवेदनात सांगण्यात आले आहे.

मग समोर दिसते ते पडद्यावर रंगविलेल्या फिकट ढगातून वर येणाऱ्या नकली सूर्याचे दृश्य. त्यानंतर भारताचा भूगोल सविस्तरपणे सांगितला जातो. समोर रेंगाळत असतात ते मात्र फक्त हिमालयाचे काही शॉट्स्. भारताचा भूगोल सांगून

झाल्यावर गुजरातचा भूगोल सांगणे हे ओघानेच येते. एवढे झाल्यानंतर कॅमेरा व निवेदक मुद्यावर येतात. मुद्दा असा की, पोरबंदर गावी अमूक एका घरात मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म झाला. मग पुन्हा कॅमेरा वाट चुकतो आणि गांधी कुटुंबाची वंशावळ सुरू होते. या वंशावळी आणि जन्मावळींपायीच तर ९९ टक्के विद्यार्थी मॅट्रिकनंतर इतिहासाला अडगळीच्या खोलीची वाट दाखवतात. तर, निवेदक नुसता महानगरपालिकेच्या फुटक्या नळासारखा धो धो बोलत राहतो, आणि वस्तुपटाचे फुटांमागून फूट कासवाच्या संथ गतीने रेंगाळत रेंगाळत डोळ्यांपुढून सरकत राहतात.

अगदी पहिल्या क्षणापासून ठाय लयीत सुरू झालेला हा वस्तुपट स्टेशनवरच्या तिकिटाच्या रांगेसारखा पुढेपुढे सरकत राहतो. बालपणानंतर शिक्षण, शिक्षणानंतर उच्चशिक्षण, लंडनला अधिक उच्चशिक्षण घेतल्यानंतर गांधीजी भारतात परत येतात. मग आफ्रिकेला जातात. पुन्हा परत येतात. पुन्हा जातात. पुन्हा...

निवेदक धो धो बोलत असतो. समोर मात्र अजून काही घडत नाही.

आणि खरे सांगू, महात्माजींची हत्या झाल्यानंतरही काही घडले आहे, असे वाटतच नाही.

वस्तुतः, भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात हृदय हलवून सोडणारे, रक्त पेटवून टाकणारे, काळीज थरारून टाकणारे लक्षावधी क्षण आहेत. स्वतः गांधीजींच्या आयुष्यातही काही थोडीथोडकी नाट्यमयता नाही. पण, या वस्तुपटाशी संबंधित असलेल्या एका म्हणता एकाही माणसाला ती नाट्यमयता जाणवलेली अनुभवास येत नाही.

खरे म्हणजे डोंगराएवढी सामग्री त्यांच्या हाती लागली होती. पण, हाती आलेली प्रत्येक गोष्ट शब्दकोशात जसे अनुक्रमाने शब्द मांडावेत तशी मांडण्याखेरीज त्यांना काहीही करता आले नाही. शब्दकोशाची रचना आणि वस्तुपटातील दृश्यांची रचना यांत फरक असतो हे, या वस्तुपटाशी संबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तीला कुणीतरी समजावून सांगणे आवश्यक आहे.

आता दांडीयात्रेचाच प्रसंग घ्या. गांधीजींच्याच नव्हे तर, भारतीय स्वातंत्र्यसंगराच्या आयुष्यातील तो एक महत्त्वाचा प्रसंग आहे. त्या घटनेने गांधीजींच्या तत्त्वज्ञानाची ताकद अजमावली गेली. स्वातंत्र्याच्या युद्धात नवा जोम, नवे चैतन्य ओतले गेले.

पण, हा नाट्यपूर्ण प्रसंग पडद्यावर कसा दिसतो ?

साबरमती आश्रमातून गांधीजी दांडीयात्रेला निघतात. त्यांच्या मागे सत्याग्रहींचा समूह कूच करतो.

आणि...?

आणि मग गांधीजी चालत राहतात. त्यांच्या मागे लोक चालत राहतात.

मग गांधीजी चालत राहतात...मग...

मध्येच गांधीजी झोपतात. मग पुन्हा चालतात...

असे नुसते चालत राहणे जवळ जवळ तीन हजारांवरून अधिक फूट म्हणजे सुमारे अर्धा तास चालत राहते,

या साऱ्या गडबडीत गांधीजी दांडीला कधी पोहोचले व त्यांनी मूठभर मीठ उचलून सत्याग्रह कधी केला हेच कळत नाही.

कळते फक्त एकच गोष्ट. साबरमतीहून दांडीला जाण्याचा मार्ग.

असे केवळ चालणे दाखविण्यासाठी सहस्त्रावधी फूट फिल्म खर्ची घालणाऱ्या दिग्दर्शकाने जालियनवाला बागेतील ऐतिहासिक हत्याकांड केवळ दोनच शॉटस्‌मध्ये गुंडाळून टाकले आहे.

गांधीजींचे मुलांवर प्रेम होते ही गोष्ट सांगणारी निदान दीडडझन तरी दृश्ये या वस्तुपटात वेळी अवेळी दाखविण्यात आली आहे. गोलमेज परिषदेसाठी लंडनला जायला निघालेले गांधीजी हे खरोखरच गोलमेज परिषदेला निघाले आहेत की, वेगवेगळचा पोझेस्‌मध्ये झोपण्यासाठी व मुलांशी खेळण्यासाठी निघाले आहेत अशी शंका आल्यावाचून राहत नाही.

दृश्यांचे औचित्य, त्यांची रचना, नाटचपूर्ण परिणाम साधण्याच्या दृष्टीने ठरवावी लागणारी शॉटस्‌ची लांबी व मांडणीचा क्रम...कशाचा म्हणता कशाचा पत्ता या ‘महात्मा’त लागत नाही.

हा भारतीय स्वातंत्र्यसंगरचा इतिहास आहे असे म्हणताना गांधी स्मारक निधी समितीच्या अध्यक्षांना, भारतीय स्वातंत्र्यसंग्राम म्हणजे केवळ काँग्रेस पक्षाची दरसाल होणारी अधिवेशनेच अभिप्रेत असावीत. एरव्ही, त्यांनी या वस्तुपटात तत्कालीन सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थिती व भारतीय जनतेच्या स्वातंत्र्याकांक्षेची प्रेरणा यांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला असता. पण, तसे काही घडले नाही. म्हणून तर बॅ. जीनांनी पाकिस्तानची मागणी का केली याचा या वस्तुपटात पत्ताच लागत नाही. निवेदक मात्र पुन्हा पुन्हा “गांधीजींचा विभाजनाला विरोध होता,” हे वाक्य आळवून आळवून सांगत राहतो.

सुभाषबाबूंची आझाद हिंद सेना, सावरकर, चंद्रशेखर आझाद यांच्यासारखे अनेक क्रांतिकारक यांच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रयत्नांचा जणू भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाशी काही संबंधच नव्हता. दुसऱ्या महायुद्धानंतर बदललेल्या परिस्थितीचा भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीशी काही संबंधच नव्हता.

हे केवळ अज्ञानापोटी घडले की हेतुपुरस्सर?

खरे म्हणजे, हा वस्तुपट फक्त निवेदकाचाच आहे. सारी दृश्ये मिटवून फक्त निवेदनच ऐकले तर गांधीजींचे सुंदर, रसाळ चरित्र कानांवर पडल्यावाचून राहणार नाही.

पार्श्वसंगीत आणि ध्वनिपरिणाम यांचा वस्तुपटात प्रभावी वापर करता येतो, ही गोष्ट या वस्तुपटाच्या निर्मात्या-दिग्दर्शकांना कुणी तरी समजावून सांगणे आवश्यक आहे.

वापरात असलेल्या माध्यमाविषयी समज नसली की डोंगराएवढी सामग्री हाती येऊनही कशी वाया जाते, याचे 'महात्मा' हे ढळढळीत उदाहरण आहे.

म्हणून तर या वस्तुपटात गांधीजी अनंत वेळा दिसले. पण, महात्मा मात्र क्षणभरही दिसला नाही. महात्मा गांधींच्या जीवनावरील वस्तुपटात गांधीजींचे महात्मेपण प्रत्ययास येऊ नये, याहून दुर्दैव काय असू शकते? अशा वेळी आठवण होते श्री. विश्राम बेडेकरांच्या 'लोकमान्य टिळक' या वस्तुपटाची. अशा वेळी आठवण होते श्री. सत्यजित राय यांच्या टागोरांवरील वस्तुपटाची. श्री. राम गबाले यांचा 'महर्षी कर्वे' आणि विमलदांचा 'स्वामी विवेकानंद' या वस्तुपटांची.

'महात्मा'च्या जोडीला 'द राईझ अँड फॉल ऑफ द थर्ड्ह री' हा वस्तुपट पाहिला की, ही खंत अधिकच बोचरी होते. हिटलरच्या शत्रूंना जे साधले ते गांधीजींच्या भक्तांना का साधू नये?

'महात्मा' पाहताना जो कंटाळवाणेपणाचा अनुभव येतो, त्याच्या नेमका उलट अनुभव 'द राईझ अँड फॉल ऑफ द थर्ड रीह्' पाहताना येतो.

समोरचा पडदा व्यापून टाकणाऱ्या स्वस्तिक चिन्हांचे फलक असलेल्या तुताऱ्या फुंकल्या जात आहेत. या तुताऱ्यांच्या घोषात एक जोष आहे. आक्रमक आवाहन आहे. या घोषांचा निनाद गिरीकंदरातून पसरत जातो. नद्यांच्या खोऱ्यात घुमू लागतो. आणि सहस्रावधी शस्त्रसज्ज सैनिकांच्या विजयघोषाचा स्वीकार करीत व्यासपीठावर एक व्यक्ती येऊन उभी राहते. उद्दामपणे पुढे झालेला तिचा ताठ हात जणू आदेश देतो आहे. नखशिखांत लष्करी गणवेशात असलेल्या या व्यक्तीच्या आक्रमक व्यक्तिमत्त्वाची विविध रूपे विलक्षण गतिमानतेने पडद्यावर प्रतिबिंबित होऊ लागतात. जिथे पाऊल टाकू ती आपली भूमी अशा गर्वाने पुढे पुढे चालणारी लष्कराची पावले, विमानाच्या आक्रमक झेपा, रणगाड्यांनी केलेला आगीचा वर्षाव, उद्ध्वस्त होणारी शहरे...आणि या साऱ्या रुद्रभीषण वादळी विध्वंसात विलक्षण आत्मविश्वासाने व सहजपणे वावरणारे ते वज्रासारखे कणखर व्यक्तिमत्त्व!... हिटलर...हिटलर म्हणून जे नाव आजवर तुम्ही ऐकत आलात ते नाव धारण करणारे हेच ते व्यक्तिमत्त्व!

'द राईझ अँड फॉल ऑफ द थर्ड रीह्' या वस्तुपटाची सुरुवात होते ती अशी... विलक्षण नाट्यपूर्ण, गतिमान, डोळे आणि मन खिळवून ठेवणारी. अवघ्या दोन-अडीचशे फुटांत हिटलरचे व्यक्तिमत्त्व अजिंठ्यातील शिल्पासारखे रेखीवपणे साकार होते.

मग ऑस्ट्रियातून वाहणाऱ्या डॅन्यूबचे संथ पाणी...या नदीच्या काठावर वसलेल्या एका गावातील घर...रस्ते...शाळा...

आता समोरच्या पडद्यावर हिटलर दिसत नाही. दिसते ती जर्मनीतील तत्कालीन राजकीय व सामाजिक परिस्थिती...कैसरची राज्यसत्ता...लष्कराचे बंड...पार्लमेंटची स्थापना...राजकारणाच्या आणि समाजकारणाच्या या साऱ्या प्रचंड उलथापालथीत ॲडॉल्फ हिटलर ही व्यक्ती नगण्य आहे. रस्त्याच्या कडेला किंवा चौकात जमलेल्या गर्दीत ती कुठेतरी उभी आहे.

त्या वेळी, ही व्यक्ती चित्रकार असते. निसर्गाची सुंदर सुंदर रेखाटने करीत असते. पण, तिला चित्रकार म्हणून मान्यता देण्याचे नाकारण्यात येते.

मग ती कलेच्या क्षेत्रातून राजकारणात शिरते. स्वतःचा पक्ष काढते. स्वतःची सेना उभारते. लष्करातील असंतुष्ट गट तिला सामील होतो.

आणि जर्मन भूमीवर एक उत्पात घडून येतो. बंड होते. या बंडाचे नेतृत्व असते ॲडॉल्फ हिटलरकडे. पण, हे बंड मोडून काढले जाते. हिटलरची पहिली झेप अपुरी पडते. फसते. त्याला अटक करून न्यायासनासमोर उभे केले जाते.

आणि याच क्षणी हिटलरच्या सामर्थ्याचा पहिला प्रत्यय जर्मनीला येतो. ज्याच्यासमोर हिटलरला गुन्हेगार म्हणून उभे केले जाते तें न्यायालयच त्याच्या तत्त्वज्ञानाने, विचारांच्या आणि स्वप्नांच्या समर्थनाचे व्यासपीठ बनते. बंडाची सारी जबाबदारी आपल्या एकट्याकडे घेऊन हिटलर आपल्या लायक नेतृत्वाची सिद्धता देतो. त्याला पाच वर्षांची शिक्षा ठोठावण्यात येते.

तुरुंगवासाच्या या कालखंडात हिटलर आपल्या साऱ्या आयुष्याचे मनसुबे रचतो. आयुष्यात कुठल्या मुक्कामाला पोहोचावयाचे आहे आणि तिथे पोहोचण्यासाठी कोणत्या मार्गांचा, कोणत्या पद्धतीने अवलंब केला पाहिजे, याची निश्चित आखणी करतो.

हिमलर आणि गोबेल्ससारखे निष्ठावंत, कल्पक आणि तुल्यबळ ताकदीचे सहकारी त्याच्या पाठीशी उभे राहतात.

तुरुंगातून मुक्त झाल्यानंतर हिटलर निवडणुकीच्या आखाड्यात उतरतो. प्रचाराची रणधुमाळी माजते. पण, निवडणुकीचा प्रत्यक्ष निकाल हिटलरच्या विरोधात जातो. हिटलरच्या प्रचाराची हस्तपत्रके रस्त्यावर झाडली जात असल्याच्या एकाच शॉटमधून हिटलरच्या पराभवाचे स्वरूप स्पष्ट होते. एवढ्या अटीतटीच्या प्रयत्नांनंतर त्याला फक्त सदतीस टक्केच मते पडलेली असतात. हिन्डेनबर्ग निवडून आलेला असतो.

पण, जर्मनीतील एकूण अस्थिर राजकीय परिस्थिती, कोसळणारे अर्थकारण, दैनंदिन जीवनातील आवश्यक वस्तूंचा तुटवडा या आणि अशा इतर अनेक कारणांमुळे हिन्डेनबर्गचे आसन डळमळू लागते. आणि अखेर त्याला हिटलरचा आधार घेणे भाग पडते.

हिटलर जर्मनीचा चान्सेलर होतो.

पार्लमेंटमध्ये नाझी अगदीच अल्पमतात असतात. इतर पक्षांच्या नेत्यांचा हिट-लरवर विश्वास नसतो. आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे मोजकाच, पण विलक्षण सुसंघटित असलेला कम्युनिस्ट पक्ष त्याच्या विरोधात असतो.

निवडणुकीच्या वेळी हिटलरने नवा जर्मनी निर्माण करण्याचे आश्वासन दिले होते. आज तो सत्तेवर होता आणि जर्मन जनता त्याच्याकडून आश्वासनपूर्तीची अपेक्षा करीत होती.

हिटलरच्या बुद्धिमत्तेने त्याला साथ दिली.

पहिला मार्ग प्रचाराचा : कम्युनिस्टांविरुद्ध त्याने प्रचाराचा गदारोळ निर्माण केला.

दुसरे पाऊल प्रत्यक्ष कृतीचे : एका रात्री पार्लमेंटची इमारत कापराच्या ढिगा-सारखी धडाडून पेटली. घातपाताचा आरोप कम्युनिस्ट पक्षावर ठेवण्यात आला. निर्माण झालेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी हिटलरने पार्लमेंटकडून खास अधिकार मागून घेतले.

आणि जर्मन भूमीवरून कम्युनिस्ट पक्ष खरोखरच नामशेष झाला.

कम्युनिस्टांच्या पाठोपाठ नाझी पक्षाला विरोध करणारे सारे नेते मृत्युमुखी पडले.

वृद्धावस्थेने हिन्डेन्बर्ग मरण पावला.

हिटलरच्या हातांत सारी सत्ता आली. आणि नवा जर्मनी निर्माण करण्याचे आश्वासन त्याने खरोखरीच पार पाडले.

त्याने देशाची उत्पादनक्षमता वाढवली. लष्करी बळ वाढविले. दैनंदिन गरजेच्या वस्तू सहजसुलभ झाल्या. लोकांना काम मिळाले. अन्न, वस्त्र, निवारा मिळाला.

लोकांना आणखी काय हवे असते ?

हिटलर त्यांचा देव झाला. प्रेरणा झाला. नाझी होणे ही अभिमानाची आणि गौरवाची गोष्ट झाली.

जर्मनीचा कायापालट झाला होता. हिटलरच्या समर्थ नतृत्वाने जर्मनीला एक स्थिर, समृद्ध आणि विलक्षण कडवे राष्ट्र बनवले होते.

आणि मग दुसरे महायुद्ध.

पोलंड, युगोस्लाव्हिया, ऑस्ट्रिया, रुमानिया, फ्रान्स...

एकएक भूप्रदेश पादाक्रांत करीत हिटलरच्या नाझी जर्मनीचे स्वस्तिक पुढेपुढे चालले आहे. कोणत्याही भूमीवर एकदा टाकलेले पाऊल पुन्हा मागे घ्यायचे नाही, हा हिटलरचा आदेश होता.

गरुडासारखी प्रलयंकारी झेप घालून शत्रूंना नामोहरण करून सोडणाऱ्या पराक्रमी जर्मन सेनेच्या कर्तृत्वाची दृश्ये रणगाड्यासारखी धडाडत समोरून सरकू लागतात.

मुसोलिनी, स्टालिन यांच्यासारख्या चाणक्यबुद्धीच्या राजकारण धुरंधरांच्या कुटील डावपेचांना सुरुवात होते.

या साऱ्या रुद्रभीषण संहाराचा केंद्रबिंदू हिटलर जातीने आक्रमणाच्या आणि विजयाच्या योजना आखत राहतो.

मग विन्स्टन चर्चिलचा धीरगंभीर आवाज घुमू लागतो..."आम्ही त्यांच्याशी भूमीवर, सागरात, आकाशात लढू. देवकृपेने त्यांचा नि:पात होईपर्यंत लढत राहू."

डंकर्कच्या विध्वंसाला नॉर्मंडीच्या घणाघाती घावाने प्रत्युत्तर मिळते.

आणि मग सुरू होते, जर्मन फौजांची पीछेहाट.

जर्मनांच्या वाट्याला पराभवामागून पराभव येऊ लागतात.

एकीकडून रशिया व दुसरीकडून दोस्त राष्ट्रे बर्लिनच्या दिशेने सरकू लागतात.

पण, विजयाच्या वेळी ताठ राहणारा हिटलर पराभवाच्या वेळीही तेवढाच ताठ राहतो. जर्मनीत शिल्लक उरलेल्या जनतेचा त्याच्यावर अढळ विश्वास असतो.

युवकांची सारी पिढी युद्धात गुंतली असताना गृहआघाडी सांभाळायला पुढे येतात त्या जर्मन महिला. त्या शेती सांभाळतात. कारखाने सांभाळतात. वाहतूक सांभाळतात.

युद्धसामग्रीचे उत्पादन अधिकाधिक जलद गतीने होऊ लागते.

पण, हिटलरच्या सारीपटावर दुर्दैवाचे दान पडलेले असते. बंदुका असतात. पण, त्या पेलायला तरुण हात शिल्लक नसतात. जलदगतीची विमाने तयार होतात. पण, ती चालवायला इंधन शिल्लक नसते. रॉकेटस्चा शोध लागतो. पण, फारफार उशीर झालेला असतो.

बर्लिन वेढले जात असते.

पण, तरीही जर्मनीचे मनोधैर्य खचलेले नसते. इंचइंच लढविण्याच्या जिद्दीने जर्मन स्त्रिया, मुले, वृद्ध उभे राहतात. ओठ पिळले तर दूध गळेल अशी बाराबारा पंधरा-पंधरा वर्षांची कोवळी पोरे लष्करात भरती होतात. हिटलरची ती अखेरची आशा असते.

बर्लिन पडते.

गोबेल्स व त्याची पत्नी विष खाऊन आत्महत्या करतात.

हिटलरचाही असाच अंत होतो. त्याच्या मृत्यूची कथा त्याचा शोफर स्वत:च सांगतो.

नाझी भस्मासुराचा अस्त झालेला असतो.

मग येतात नाझींनी ज्यूंच्या केलेल्या हत्याकांडाच्या कथा. गॅसचेंबर्सची विदारक दृश्ये. कॉन्सन्ट्रेशन कॅम्प्स्. ज्यूंच्या प्रेतांचे ढिगारे...

न्यूरेन्बर्गचा खटला उभा राहतो. सारे आरोपी ठामपणे सांगतात...'नॉट गिल्टी.'

हे जर गुन्हेगार नाहीत तर गुन्हेगार कोण आहेत? त्यांना आज्ञा देणारा हिटलर की शुद्ध रक्ताच्या आर्यन साम्राज्याचा पुरस्कार करणारा जर्मन राष्ट्रवाद? की या राष्ट्रवादाला मूळ धरण्यास अवसर देणारी ग्रेट ब्रिटन, अमेरिकेसारखी दुबळी व भ्याड राष्ट्रे?

या प्रश्नांना उत्तरे नाहीत. असली तरी खरी उत्तरे आम्हांला कळणार नाहीत. कारण, पराभूत हेच नेहमी गुन्हेगार ठरत असतात. तो व्यवहाराचा नियम आहे विध्वंसाच्या, रक्तपाताच्या, अमानुष युद्धाच्या या उभयपक्षी गदारोळातही एक गोष्ट मात्र टिकून राहिलेली असते. कॉन्सेन्ट्रेशन कॅम्प्समधील चिटच्यापिटच्या मुलांनी भिंतीवर काढलेल्या रेघोटया. त्यांनी काढलेली चित्रे. त्या चित्रांत राजे असतात. राजकन्या असतात. राजपुत्र असतात. सूर्योदय असतो. वाऱ्यावर झुलणारी झाडे असतात. झुळझुळणारे निर्झर आणि चिवचिवणारे पक्षी असतात. त्या चित्रांत निरामय आणि निरागस हृदयांची निष्पाप स्वप्ने असतात. त्यांचा विध्वंसाशी संबंध नसतो. रक्तपाताशी संबंध नसतो. अमानुषतेशी संबंध नसतो.

हिटलर, हिमलर, स्टालिन, मुसोलिनी, चर्चिल आले आणि गेले.

पण, ती चित्रे अजून टिकून आहेत.

आणि टिकून राहणार आहे ते एवढेच !

हिटलरचा वस्तुपट संपतो तो अशा विलक्षण कोवळिकेत ओथंबून. मृत्युपासून


"सारे जग श्वास रोखून बसेल"

असे बेगुमानपणे सांगणाऱ्या हिटलरच्या

झंझावाती पुरुषार्थाची कहाणी

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये फक्त

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे २.

जन्माकडे जाणाऱ्या भावपूर्ण कथेसारखा !

'द राईझ अँड फॉल ऑफ द थर्ड रीह्' हा वस्तुपट पाहत असताता केवळ हिटलरच्या आणि जर्मन नाझीवादाच्या उग्रभीषण व्यक्तित्वाचे आणि झंझावाती जीवनाचेच दर्शन घडत नाही. तर, १९२० पासून १९४५ सालापर्यंतच्या जर्मनीचेही समग्र दर्शन घडते. या पाव शतकात जर्मनीत असलेली राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती, त्यातील चढउतार आणि हिटलरच्या अमोघ कर्तृत्वाने पेटवलेला ज्वलंत राष्ट्रवाद यांचे दर्शन घडते.

वस्तुपट कसा असावा हे जसे 'द राईझ अँड फॉल ऑफ द थर्ड रीह्' हा वस्तुपट दाखवून देतो तसेच संकलकाची कात्री काय चमत्कार करू शकते याचेही प्रत्यंतर या वस्तुपटातून आल्यावाचून राहत नाही. हाती आलेल्या सामग्रीतून संकलकाने विलक्षण नाटचपूर्ण आलेख उभा केला आहे. संकलनातील कारागिरी आणि कलात्मकता यांतील सीमारेखा अशा काही बेमालूमपणे परस्परांत मिसळून गेल्या आहेत की, काय कुठे संपते व काय कुठे सुरू होते, हे कळणेच अशक्य होते. संकलक चित्रपटाच्या माध्यमाशी इतका प्रामाणिक राहिला आहे की त्यामुळे बिचारा निवेदक मात्र अनेकदा केविलवाणा होतो. हिटलर आणि त्याचा नाझीवाद यांना बदनाम करण्यासाठीच या वस्तुपटाचे प्रयोजन आहे हे निवेदकाचे हिटलरविरोधी विवेदन नसते तर कदाचित् कुणाला कळलेही नसते. हिटलरच्या राजकारणाला व हिटलरला सारखे "गटाराचे राजकारण", "गटारातील जंतू पर्वतशिखरावर चढले" या व अशाच स्वरूपाच्या निवेदनाने निवेदक हिणवत राहतो. पण, त्याचे दुर्दैव असे की, समोरचे दृश्य मात्र त्याला फसवत असते. कारण, समोरच्या दृश्यांतून प्रत्यय येत असतो तो हिटलरच्या सामर्थ्याचा, त्याच्या बुद्धिमत्तेचा. दृश्य आणि निवेदन असे परस्परविरुद्ध दिशांना जाऊ लागले की आठवण होते ती खुद्द अमेरिकेत झालेल्या अब्राहम लिंकन, जॉन केनेडी, रॉबर्ट केनेडी यांच्या अमानुष हत्यांची...आठवण होते ती व्हिएटनामच्या भूमीवर होणाऱ्या पाशवी विध्वंसाची...आठवण होते ती हिरोशिमा-नागासाकीची...कोरियाच्या हिंस्र युद्धाची व विभाजनाची...

जाऊ द्या ! राजकारणाची गदळ उपसण्यात स्वारस्य नाही.

एका थरारक आणि नाटचपूर्ण वस्तुपटावर ही गदळ सांडली म्हणून काळजात कचकचते, एवढेच !

हे सारे असूनही या वस्तुपटाचे अकरा रील्स कसे खिळवून ठेवतात हे पाहताना मन कसे थरारून जाते. हादरून जाते. हलून जाते. हा अनुभव 'महात्मा'चे तेहतीस रील्स पाहूनही येत नाही. हिटलरच्या शत्रूंना जे साधले ते गांधीजींच्या भक्तांना साधले नाही, हेच खरे !

O

## तुम्ही गुणवत्तेच्या शोधांत आहांत काय ?

**तर मग आगमार्क पदार्थांचाच आग्रह धरा.**

तूप, लोणी, वनस्पती तेलें, मध, मसाले आणि इतर शेतीजन्य पदार्थ खरेदी करतांना, गुणवत्तेला महत्त्व देणारे ग्राहक आगमार्क लेबलाचाच आग्रह धरतात.

गेल्या वर्षी सुमारें १५० कोटी रुपयांचा शेतीजन्य आणि प्राणीजन्य पदार्थांवर आगमार्क लावण्यांत आला.

८२ कोटी रुपयांपेक्षां जास्त किंमतीचे आगमार्क पदार्थ निर्यात करण्यांत आले.

आगमार्क ही सरकारनं अधिकृतपणें दिलेली हमी आहे. ती देण्यापूर्वी सुसज्ज प्रयोग-शाळांमध्यें पदार्थांच्या कसून चांचण्या घेतल्या जातात.

**आगमार्क म्हणजे शुद्धता आणि गुणवत्ता यांची राजमान्य खूण**



68/482

# सेक्युलॅरिझम : एक मतप्रदर्शन



अनिल गोरे

सुहास जोगळेकर

राजेंद्र व्होरा

‘ माणूस ’ साप्ताहिकाच्या दि. २५ जानवारी १९६९ च्या अंकांत प्रा. वि. म. दांडेकर यांचा ‘ सेक्युलॅरिझम : अन्वय आणि अर्थ ’ हा लेख प्रसिद्ध झाला आहे. या ठिकाणी एक गोष्ट विशेष नमूद केली पाहिजे. ती ही की, उच्च पदाधिष्ठित विद्वान प्राध्यापकांनी आपल्या अकॅडेमिक विषयांबाहेरील पण सामाजिक जीवनातील जिव्हाळयाच्या विषयावर अभ्यासपूर्ण प्रतिपादन करण्यास व आपली मते जाहीरपणे मांडण्यास पुढे यावे ही अत्यंत स्वागतार्ह गोष्ट आहे. सर्व विद्याशाखांतील विद्वानांनी सामाजिक प्रबोधनाच्या कार्यात अशा पद्धतीने अवश्य सहभागी झाले पाहिजे.

अर्थात् यामुळे प्रा. दांडेकरांच्या लेखाचा अभ्यास करण्याची व त्यावर चर्चा करण्याची जरुरी वाढतेच. हीच गोष्ट काही अंशी करण्याचा प्रस्तुत लेखाचा उद्देश आहे.

प्रा. दांडेकरांच्या लेखाचे ठोकळमानाने दोन भाग पडतात. पहिल्यामध्ये सेक्युलॅरिझमच्या कल्पनेचा उगम, अर्थ, उपयुक्तता इत्यादींचे विवेचन आहे. दुसऱ्या भागात भारताचा वर्तमान संदर्भ व सेक्युलॅरिझमच्या प्रत्यक्षीकरणातील प्रश्न यांबद्दल मते मांडली आहेत.

पहिल्या भागातील निष्कर्ष सर्वसाधारणपणे असे :

(१) समाजजीवनावर पूर्ण प्रभुत्व गाजवू पाहणाऱ्या राज्यसंस्था व धर्मसंस्था यांतील सेक्युलॅरिझम ही समंजस व्यवहारी तडजोड आहे. [तडजोड हा शब्द सेक्युलॅरिझममधील कल्पना उत्तम स्पष्ट करतो, असे प्रा. दांडेकरांचे मत असावे. वाचकांच्या मनावर ठसण्यासाठी म्हणून की काय, ते त्याचा वारंवार उपयोग करतात.] राज्यसंस्था इहलौकिक बाबींत निर्णायक, तर धर्मसंस्था पारलौकिक बाबींत, अशी ही तडजोड आहे.

(२) ही राज्यसंस्था लोकशाही हुकूमशाही वा राजेशाही असू शकेल सेक्युलॅरिझम लोकशाहीशी मुद्दाम निगडित झालेला नाही.

या दोन्हींबाबत आमचे मत निराळे आहे.

ज्या युरोपीय धर्म–राज्य संघर्षांतून सेक्युलॅरिझमची तडजोड निघाली, असे प्रा. दांडेकर म्हणतात, त्याचा मागोवा घेतल्यास खालील गोष्टी दिसतात. रोमन सम्राटाने, ख्रिश्चन प्रजाजनांनी आपल्या प्रत्येक मतात (धर्माबाबतही) मान्यता दिली पाहिजे, अशी मागणी केल्यावर ख्रिस्ताने " रेंडर टु सीझर व्हॉट इज हिज ड्यू अॅन्ड टु गॉड व्हॉट इज हिज, " असा उपदेश केल्याचे सेंट पॉलच्या गॉस्पेलमध्ये आढळते. प्रस्थापित हितसंबंधांना बाध येईल, तत्कालीन समाजव्यवस्थेचे दोष उघडकीस येतील, सामान्य जनांत जागृती व एकी निर्माण होऊन जुलमी राज्यकर्त्यांवर अनवस्था प्रसंग ओढवेल हे लक्षात घेऊन ख्रिस्त व ख्रिश्चनांची छळणूक करण्याचा, त्यांना नामशेष करू पाहण्याचा हा काळ होता. तडजोड करण्याइतका शक्तिसमतोल येथे नव्हता. यानंतर अॅपॉस्टल्स व पोप हे ' दोन सत्ता ', ' दोन स्फिअर्स ऑफ इन्फ्लुअन्स ' वगैरे विचार मांडतात. ख्रिश्चन धर्मपीठाने स्थैर्य प्राप्त केल्यावर हीच मागणी समाजजीवनाच्या धर्मेतर अंगांतील अधिकारी व्यक्ती पुढे मांडू लागतात. चर्चने सर्वांगीण पकड बसवता कामा नये, कर घेऊ नयेत, ज्या देशाची संपत्ती ती तेथील लोकांच्या कल्याण, स्वास्थ्याकरिताच वापरावी, रोमला देऊ नये अथवा चर्चच्या नोकरशाहीत बुडवू नये इत्यादी. म्हणजेच, एकदा कधी तरी क्रांतिकारी असलेला धर्म प्रस्थापित व्यवस्थेत सामील होऊन सामाजिक प्रगती खुंटवू लागल्यावर त्याविरुद्धही प्रतिक्रिया येऊ लागली. येथेही तुल्यबल शक्तींचा मुकाबला नव्हता व तडजोड वगैरे झाली नाही.

धर्मसुधारणेच्या, प्रबोधनाच्या व मानवतावादाच्या युगाची सुरुवात झाल्यानंतर प्रस्थापित संस्थात्मक धर्माच्या आवश्यकता व उपयुक्तता यांवर वैचारिक हल्ले चढवले जाऊन 'शेकडो' पाखंडी पंथ निर्माण होऊ लागले व चर्चची पकड निश्चितपणे ओहोटू लागली तेव्हा तडजोड म्हणण्याजोगी थोडीतरी परिस्थिती आली. तात्पर्य, रोमन राजे काय वा मध्ययुगीन चर्च काय, प्रत्येकाचे कार्यक्षेत्र मर्यादित ठेवण्याचा विचार त्या त्या वेळच्या प्रागतिक सामान्य-जनहितैषी मंडळींकडून झाला.

" आपणा दोघांनाही जनताजनार्दनाच्या कल्याणाचेच कार्य करायचे आहे, तेव्हा भांडण कशाला? त्यापेक्षा कार्यक्षेत्रे वाटून घेणे बरे नव्हे का?" हा अथवा तत्सम समंजस, व्यवहारी, देवघेवीचा सूर कधीही नव्हता. मध्ययुगानंतरही चर्च समाज-प्रगतीतील धोंड आहे असे म्हणून त्याच्या मुळालाच हात घातल्यावर चर्चने माघार घेतली.

अर्थात भारताच्या संदर्भातील सेक्युलॅरिझमच्या कल्पनेसाठी या निरूपणावर अवलंबून राहण्याची निकड आहे, असे नाही.

भारतीय घटनेच्या तरतुदींमध्ये अंतर्भूत असलेल्या अनेक जीवनमूल्यांप्रमाणेच सेक्युलॅरिझम हे मूल्यही भारतीय परंपरेला पूर्ण नवीन आहे. हा समाज प्रचलिताला जखडून असलेला, जातीयतेने विद्ध झालेला व राजसत्ताक पद्धती अनुसरणारा होता. येथील राजे 'गोब्राह्मण प्रतिपालक असत, केव्हा केव्हा 'विष्णूचे अंश'-देखील असत. येथील तथाकथित सहिष्णुता प्रस्थापित सामाजिक-धार्मिक चौकटीच्या अंतर्गतच फक्त होती. तसेच ती श्रद्धास्थानांबद्दल होती. हिंदू समाजाच्या मूलभूत गृहित कृत्यांबद्दल नव्हती, सामाजिक बंधनांबाबत तर नव्हतीच नव्हती. चार्वाकाला दडपून टाकण्यात आले. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे येथील न्याय-देवताही पक्षपाती होती. एकाच गुन्ह्याबाबत निरनिराळ्या शिक्षा देण्यात येत असत, इत्यादी. क्वचित अकबराला पहिला सेक्युलर राजा म्हणण्यात येते, हा वैचारिक गोंधळ आहे. सर्वधर्मसहिष्णुता म्हणजे सेक्युलॅरिझम नव्हे. पुढे पुढे तर अकबर, सर्व धर्मांना एकाच पोत्यात घालू पाहणारा राजा (जवळ जवळ खलिफाच) बनत होता.

सारांश, सेक्युलॅरिझमची कल्पना भारतीय जीवनावर नवे कलमच आहे. त्यामुळे युरोपातील या कल्पनेच्या उत्क्रांतीच्या टप्प्यांचा दृष्टांत येथे अप्रस्तुत ठरेल. भारतीय समाजाने अत्याधुनिक व प्रगतिशील सेक्युलॅरिझमचाच एकदम स्वीकार केला पाहिजे. लोकशाहीच्या संदर्भात सुरुवातीसच प्रौढमतदान पद्धतीचा स्वीकार करून आपण हनुमान उडी घेतली नाही का?

सेक्युलॅरिझमच्या आजच्या रूपाविषयीही प्रा. दांडेकरांचा दृष्टिकोण सदोष वाटतो. सेक्युलर राज्यसंस्था इहलौकिक कल्याणाकरिता कार्य करते हे त्यांना मान्य आहे; पण या प्रमेयातून त्यांनी काढलेल्या निष्कर्षांवर तडजोडवादाचा फारच प्रभाव पडलेला दिसतो. मासल्यादाखल खाली दोन तडजोडवादी वाक्ये व कंसांत त्यांची दुरुस्त आवृत्ती दिली आहे.

सेक्युलर राज्यसंस्था म्हणजे जिचे कार्यक्षेत्र इहलौकिक बाबींपुरते **मर्यादित केलेले आहे** [सेक्युलर राज्यसंस्था म्हणजे जी इहलौकिक प्रगतीस **सर्वाधिक प्राधान्य देते ती.**] पारलौकिक बाबतींत अशी राज्यसंस्था **हस्तक्षेप करीत नाही** [पारलौकिक बाबी इहलौकिक प्रगतीविरुद्ध असतील तर राज्यसंस्था त्या मोडून काढते व त्या

नसतील तर त्यांबाबत उदासीन असते.] (ठळक ठसा आमचा आहे.)

धर्माची व्याप्ती पारलौकिक बाबींपुरती मर्यादित आहे असेही ते सांगतात. आता जर जीवनाच्या अंगोपांगांच्या अशा विभाजनावर हा सगळा डोलारा उभा आहे, तर त्या विभाजनाचे स्वरूप इहलौकिक–पारलौकिक या शब्दांपेक्षा जास्त सुस्पष्ट करावयास नको काय ? याबद्दल लेखात मौन आहे. ईश्वर आहे की नाही, असल्यास एक की अनेक, विश्व अनादी अनंत आहे काय, इत्यादी बाबतींत सेक्युलर राज्य-संस्थेला रस असण्याचे कारण नाही; पण ईश्वर असून त्याला तरबळी द्यावा लागतो, अथवा ईश्वराची शिकवण एखाद्या पुस्तकात असून त्याप्रमाणे न वागणारा अनंत काळ नरकात जातो, जन्माला आलेल्यांची काळजी घेणेही दुरापास्त होत असले तरी कुटुंबनियोजन ईश्वरेच्छेविरुद्ध असून पाप आहे, असे धर्मामध्ये प्रतीत होऊ लागल्यास सेक्युलर राज्यसंस्थेला निश्चितच हस्तक्षेप करावा लागेल. तिची मूल्ये, ध्येये, धोरणे स्वच्छ आहेत. भौतिक समृद्धी मिळवणे; समता, बंधुभाव आणणे; कलांची भरभराट, विज्ञानाची वाढ व ज्ञानाचा विकास होण्याचा यत्न करणे; बुद्धिप्रामाण्य आणणे इत्यादी. या मूल्यध्येयधोरणाविरुद्ध ज्या संस्था वा कल्पना असतील त्यांचे खच्चीकरण करण्याचे सार्वभौम अधिकार ही राज्यसंस्था स्वतःकडे घेते. इथे तडजोडीचा प्रश्न येतोच कोठे ? या गोष्टींबाबत देवघेव नाही. याल तर सह, न याल तर विना, विरोधाल तर उच्छेदून, ही भूमिकाच सेक्युलर राज्यसंस्थेने तत्त्वतः स्वीकारलेली असते.

दुसरा मुद्दा म्हणजे सेक्युलॅरिझम आणि लोकशाही यांचा अन्योन्य संबंध काय ? केमालपाशा अतातुर्क याने तुर्कस्तानमध्ये हुकूमशाही पद्धतीने काही अंशी सेक्यु-लॅरिझम आणला होता की नाही ? या म्हणण्यात (प्रा. दांडेकरांच्या धाटणीत सांगायचे म्हणजे) मुद्दा आहे. परंतु लोकशाहीचा सेक्युलॅरिझम हा आवश्यक व अंतर्भूत भाग आहे. व्यक्तिविकासाला समान आणि संपूर्ण संधी हा लोकशाहीचा आत्मा आहे. याचाच उपसिद्धांत म्हणजे प्रत्येक बाबतीतील मताबाबत पूर्ण स्वातंत्र्य (धर्मविचारांसह) आणि कृतीबाबत, ती संपूर्ण समाजाच्या ऐहिक हिताविरुद्ध जाणार नाही इतपत, स्वातंत्र्य. आदर्श लोकशाहीमध्ये हे स्वातंत्र्य **मूल्य म्हणून मिळते**, सत्ताधीशांचे धोरण वा सोय म्हणून नव्हे.

“ धर्माने जुन्या काळी पुरस्कारलेली समाजरचना आवश्यक तेथे बदलावी हा सेक्युलॅरिझमचा अर्थ सर्वमान्य आहे,” असे प्रा. दांडेकर म्हणतात. (म्हणजे त्यांना तो मान्य आहे, असे गृहीत धरण्यास हरकत नसावी). पारलौकिक बाबींबरोबरच समाजव्यवस्थेबाबतही धर्म उचापती करत असतो हे अर्थात ओघाने आलेच. हा बदल का हवा ? मोक्ष वा निर्वाण मिळवणाऱ्या नायकांची अथवा सदेह वैकुंठाला जाणाऱ्या टूरिस्टांची संख्या रोडावली म्हणून ? बहुधा नव्हे. असे असेल तर धर्मा-वर आधारित जीवनसाफल्याच्या मूळ कल्पनेवरच ते हल्ला करत आहेत. प्रत्येक

धर्माच्या ईश्वराशी तादात्म्य पावण्याच्या, आकाशाकडे डोळे लावण्याच्या दृष्टिकोणाला ते विरोध करत आहेत. त्यांच्याशी आम्ही सहमत आहोत. पारलौकिक ध्येय व इहलौकिक वाद यांत तार्किकदृष्ट्या सतत एकवाक्यतेची निश्चिती दिसत नाही. ऐतिहासिकदृष्ट्या अनुभवसिद्ध विरोध दिसतो. त्यामुळे सर्व धर्मांना संमत असलेल्या मृत्युलोकीच्या जीवनातील नियमांपैकी भौतिकवादाशी सुसंगत नियमांचा स्वीकार करून बाकी धर्मकल्पना विसर्जित करण्याचीच ही बीजरूप तरफदारी होय.

या तत्त्वप्रणालीचा प्रत्यक्ष जीवनात अंगीकार करताना उद्‌भवू शकणाऱ्या प्रश्नांपैकी काहींचा विचार करू. सरकारी व निमसरकारी समारंभांतून धर्माचा वास असलेल्या सर्व गोष्टी हद्दपार कराव्यात असे कट्टर सेक्युलॅरिस्टांचे (प्रा. दांडेकरांनी शोध लावलेला उपपंथ) म्हणणे आहे. उदा. नारळ फोडणे, पूजा वगैरे. पण त्यांनाच पाश्चात्यांचे शँपेन बाटली उघडणे, मेणवत्ती पेटवणे हे प्रकार चालतात व हे सेक्युलर संस्कार आहेत, असे मानले जाते, असे प्रा. दांडेकर मानतात. हा 'कट्टर सेक्युलॅरिस्टां'वर मोठा अन्याय आहे. अशी वस्तुस्थिती नाही. (असल्यास निःसंशय चूक आहे). यासंबंधी एक प्रवाही विचार असा असू शकेल. भारतीय समाज अजून बहुतांश परंपरानुगामी आहे. येथील धर्माचा पगडा अजून पक्का आहे. प्रगतीकरता तो कमी होणे आवश्यक आहे; परंतु या प्रक्रियेला पुरेसा वेग आलेला नाही. उलट गेल्या दोन दशकांचा अनुभव हा की, जनतेला आधुनिक बनविण्याच्या राज्ययंत्राच्या प्रयत्नांपेक्षा राज्ययंत्राला प्रतिगामी बनविणारा जनतेचा प्रभाव जास्त परिणामकारक होत आहे. अशा परिस्थितीत सार्वजनिक जीवनातून आधुनिकतेचे शक्यतो जास्त पाठ दिले गेले पाहिजेत. निव्वळ मसाला म्हणूनदेखील पारंपारिक कर्मकांडे वापरण्याची श्रीमंती आपल्याला आज परवडण्यासारखी नाही. पुरेसा प्रगत समाज असल्यावर त्या क्रियांमधील धर्माचा वासच निघून जाईल. या अर्थाने मग शँपेन बाटलीचे वावडे राहणार नाही.

याउलट प्रा. दांडेकर नारळ फोडणे आदींचा बचाव करतात तो निखळ विनोदी आहे. त्यांच्या मते हे समारंभ निपटून काढल्यास "आपले सार्वजनिक जीवन निष्कारण दरिद्री होईल." प्रदीर्घ व प्राचीन परंपरा असलेला हा समाज "पोरकेपणाने एकत्र येऊन पोरकेपणाने निघून जाईल." अरेरे! काय हा अनवस्था प्रसंग! या न्यायाने ॲटॉमिक रिॲक्टर्सच्या वास्तुशांती कराव्या लागतील व नवीन लोकसभा सुरू होताना १०१ सत्यनारायण करावे लागतील. नारळामुळे पोरकेपण पुरेसे दूर होणार नाही.

सार्वजनिक जीवन कर्तृत्वाने समृद्ध होते. फुसक्या समारंभाने नाही आणि उत्सवप्रियतेचाच उपशम करावयाचा असेल तर उपरोक्त कारणांसाठी नव्या प्रकारचे समारंभ योजावे लागतील. उदा. ग्रामगौरव.

त्याचप्रमाणे कौटुंबिक संस्कारांसाठी आकाशवाणीने आईबापांना धार्मिक कार्य-

क्रम प्रसारित करून देण्याचे साहाय्य. रविवारी बायबल, शुक्रवारी कुराण, एरवी गीता असा मासल्यादाखलचा सर्वधर्मसमभावी कार्यक्रम ते देतात. खरे पाहता कुटुंबात संस्कार पुरेसे (फारच ?) होतात. आजीच्या गोष्टी, आईच्या शिकवणी, हरिदासाचे कीर्तन, बुवांचे प्रवचन हे डोस सामान्यतः बालकाचा ब्रेन वॉश करण्याला पुरेसे होतात. इतके परिणामकारक की, डॉ. गोविंद खरे यांना कुटुंबनियोजन प्रचारासाठी त्यांपैकी एकाचा प्रयोग करावासे वाटावे. उच्चवर्णीय समाजात तर गैरशिस्ती जेवणावरून धनगराची आठवण करून देतात, पाच बोटांवरून विषमतेची नैसर्गिकता पटवतात, साधुवाणी, शिवलीलामृत, शनिमाहात्म्य वगैरेंतून देवाला धावरण्याचे आवाहन होते. तेव्हा धार्मिक कार्यक्रमांची आकाशवाणीवर गरज नाही. हाच प्रकार प्रत्येक परंपरागत गोष्टीबाबत आहे. त्यांचा प्रचार, प्रसार रूढी, संकेत यांमधून जोरात चालू आहेच. मदतीची गरज आहे ती पोरक्या आधुनिक मतांना. त्यांच्या वंशजांच्या पिढ्या येथे वावरल्या नाहीत. या नव्या आयात रोपाला मूळ धरण्याला मदत कशी करावी हा खरा प्रश्न आहे.

शेवटचा मुद्दा सर्वधर्मसमभावासंबंधी. "... हा धर्मभावनेविषयीच्या आदरावर आधारित आहे. सेक्युलॅरिझमलाही धर्मभावनेविषयी आदर अभिप्रेत आहे असे मी मानतो. नाहीतर सेक्युलॅरिझम ही धर्मसंस्था व राज्यसंस्था यांतील सन्मान्य तडजोड होऊ शकणार नाही." प्रा. दांडेकर.

आता हे पाहा. सेक्युलॅरिझमला आधीच लावलेल्या तडजोडवादाच्या शेपटाला सन्मान्यतेचे उपशेपूटही डकवले आहे. समाजावर पूर्ण प्रभुत्व गाजवू पाहणाऱ्या दोन शक्तींची ही तडजोड असेल(च) तर ती बलसंतुलनावर आधारित असेल. परस्पर आदरावर आधारित असण्याची तात्त्विकदृष्ट्या तरी आवश्यकता नाही, ते असो.

पुढे प्रा. दांडेकर म्हणतात, "सर्वधर्मसमभावाचा आधार केवळ साधी नागरी सभ्यता एवढाच आहे. ... त्याचा अर्थ इतकाच की मी माझ्या घरी हवे तर राम म्हणावे. परंतु रहीमचा उच्चार करणाऱ्या शेजाऱ्याच्या धार्मिक भावनेचा आदर करावा." आदर करायचा म्हणजे काय करायचे ? ती भावना आणि तद्भव विचार बरोबर म्हणायचे ? निश्चितच नाही. 'परंतु मते वेगळी असू शकतात. त्यामुळे त्या व्यक्तींना नीच लेखता कामा नये' हा विचार. पण हा तर सर्वसाधारण भिन्न मतांबद्दल उदार दृष्टिकोण आहे. ही नागरी सभ्यता निव्वळ धर्मालाच लागू होते असे नसून, राजकीय, सामाजिक जीवनाच्या प्रत्येक बाजूबाबत शक्य असणाऱ्या मतवैचित्र्याला लागू आहे. मग सर्वधर्मसमभाव हे खास नाव कशासाठी ? शिवाय भिन्न मतांचा आदर करण्यालाही मर्यादा असू शकते. रामनाम घेणार म्हणजे गोवधबंदीला पाठिंबा आणि रहीमचा पुकारा म्हणजे शरीयतचे कठोर पालन अशी

[पृष्ठ ३९ वर]

लखाशेठ किराणा दुकानच्या कामात गर्क होता. तराजू, तोंड आणि हात एकमेकांस हार जात नव्हते. त्याचबरोबर हिशेबाचे कामही चालूच होते. अंगात बाह्यांचा गंजिफ्रॉक, काचा मारलेले धोतर, कपाळाला उभे गंध, वर नुकतुकीत गोटा असा लखाशेठचा अवतार होता. स्वारी कामाच्या लयीत मग्न होती. गिऱ्हाइकांची गर्दी होती. लखाशेठला वर मान काढायला फुरसत नव्हती. ' कामात ज्याची मान वाकते त्याची मान जगात वर असते, ' असे लखाशेठ आत्मानुभवाने सांगायचा. व्यवहारात चोख तोंडाचा सरळ लखाशेठ जगात वर मानेने वावरायचा.

खोपोली फाट्यावर लखाशेठचे दुकान होते. फाट्यावरची वस्ती, आजूबाजूची खेडी व वाड्या यांतले बहुतेक सारे गिऱ्हाईक त्याच्याकडे असायचे. जानवीजोड्यांपासून बुटाच्या नाड्यांपर्यंत, फुलवातीपासून स्टोव्हच्या वातीपर्यंत, किराणा माल, धान्य, स्टेशनरी वगैरे सारा माल त्याच्या दुकानात असायचा. लक्ष्मणचा लखाशेट झाला, लक्ष्मीधर झाला.

पृथ्वीच्या सौंदर्याने सूर्याचे रक्त तापायला सुरुवात झाली होती. झाडांच्या सावल्या झाडांच्या पोटात दडायला लागल्या. दुपार वाढायला लागली. गिऱ्हाइकांची गर्दी ओसरली. लखाशेठने गल्ल्याला कुलूप लावले आणि दुकानाच्या फळ्या ओढायला सुरुवात केली अन् तेवढ्यात लांबून गणपत मास्तरची हाक आली.

" अहो लखाशेठ, जरा थांबा. "

गणपत मास्तर धावत धावत दुकानच्या दाराशी आला. उमर पस्तीस-चाळीसची. कृश काळा देह, डोक्याला काळी टोपी, अंगात तपकिरी कोट, धोतर अन् पायांत ' री-रिपेअर ' केलेल्या वहाणा, हातात पिशवी अन् पिशवीत रद्दी एवढ्यासकट गणपत मास्तर आला.

" लखाशेठ ! रद्दी विकायला आलो आहे. जरा वजन करून घ्या. " गणपत मास्तर म्हणाला.

लखाशेठने रद्दीची पिशवी हातात घेतली. दुकानाची एक फळी उघडली. लखाशेठ व पाठीमागून गणपत मास्तर दुकानात शिरले. कॅलेंडरवरची अठ्ठावीस तारीख पाहून लखाशेठ सहज हसला. लखाशेठची कॅलेंडरवरची नजर व चेहऱ्यावरचे हास्य पाहून गणपत मास्तर ओशाळला. महिनाबादप्रमाणे ' रद्दी-तुला ' झाली.

# गणपत मास्तरची गोष्ट

**श्याम शिराळकर**

" तीन किलो सहाशे ग्रॅम – एक रुपया ऐंशी पैसे."

मॅट्रिक परीक्षा पास झाल्याच्या खालोखाल आनंद गणपत मास्तराच्या चेहऱ्यावर पसरला. त्याचा अंदाज रुपया-सव्वा रुपयाचा; पण अंदाजापेक्षा निकाल चाळीस-पंचेचाळीस टक्क्याने जास्त लागावा तसे झाले.

लखाशेठने गल्ला उघडला आणि गणपत मास्तरच्या हातावर पैसे ठेवले. त्यातले पाच पैसे गणपत मास्तर लखा-शेठला परत द्यायला लागला.

" लखाशेट, राहूदेत पाच पैसे. माझा अंदाज दीड रुपयाच्या आत होता." गणपत मास्तर म्हणाला.

" गणपत मास्तर, सारे पैसे घ्या. ते पाच पैसे जड झाले असतील तर जाताना विश्वेश्वराच्या देवळात टाका. निम्मं निम्मं पुण्य आपण वाटून घेऊ. व्यवहारात अशी पुण्याई नको."

दोघेही खदखदा हसले. लखाशेठने दुकान बंद केले व दुकानाच्या माडी-वरच असलेल्या आपल्या घरी तो जेवावयास गेला. गणपत मास्तर नाकळचा सडकेने उन्हं आणि रस्ता तुडवीत वाडीवर जायला निघाला.

खोपोली फाट्यापासून दोन-अडीच मैलांवर कदमांची वाडी होती. वाडीत शे-दीडशे उंबरा. कदमांच्या वाडीच्या आजूबाजूला वस्ती होती. त्यासाठी कदमांच्या वाडीत प्राथमिक शाळा होती. त्या शाळेत गणपत मास्तर ' मास्तर ' होता. सारे वर्ग व सारे विषय एकटा गणपत मास्तर उरकायचा. पहिल्या वर्गाला पाढे, दुसरीच्या वर्गाला पुस्त्या, तिसरीला गुणाकार-भागाकार, चौथीला भूगोल एकदम सुरू असायचा. एवढे ' कुरुक्षेत्र ' सांभाळून परत शांतपणे खुर्चीत बसून गणपत मास्तर स्थितप्रज्ञासारखा कधा-



कादंबऱ्या-मासिकं वाचायचा. गणपत मास्तराच्या घरची परिस्थिती गरिबीची होती. मॅट्रिक पास झाल्यावर गणपतने विद्यादानाचा पवित्र व्यवसाय सुरू केला. गणपतच्या मनात कॉलेजात जायचे होते. मराठी घेऊन एम. ए. व्हायचे होते. त्याचा पिंड वाङ्मयीन होता. मराठी सारस्वताला आपल्या लेखणीने काही अमौलिक लेणी ल्यावयाची हा त्याचा मानस होता. पण परिस्थितीने आशेला आवरले. गणपतने शिक्षकाचा व्यवसाय पत्करला. 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रं. . . . ' इ. इ. तत्त्वज्ञान डोळयांपुढे ठेवून गणपत सरस्वती मंदिरात सेवक झाला.

आपण कथा-कादंबऱ्या लिहाव्यात. मराठी वाङ्मयात क्रांती करावी. आपल्या नावाचा बोलबाला व्हावा. 'मराठीतील ख्यातनाम लेखक' ही उपाधी आपल्याला लाभावी. एखादे सरकारी पारितोषिक—एखादा साहित्य अकादमीचा पुरस्कार आपल्या खाती जमा व्हावा, अशी त्याची तीव्रतम मनीषा होती. त्यासाठी त्याचे अहर्निश प्रयत्नही चालू होते. तो कथा लिहावयाचा. कविता रचायचा. कादंबऱ्यांची रूपरेषा तयार करायचा. 'दिसामाजी थोडे तरी ते लिहावे'—हा समर्थांचा बाणा गणपत मास्तरने अंगीकारला होता.

आठवड्याकाठी एखादी कथा तो लिहून काढायचा. चार-पाच कवितांची पिल्लं व्यायचा. मग एखादा बऱ्यापैकी दिवस पाहून तो आपली वाङ्मयीन अपत्ये संगोपनासाठी—प्रसिद्धीसाठी—एखाद्या मासिकाकडे, साप्ताहिकाकडे पाठवायचा. मग आठ-दहा दिवस प्रतीक्षा आणि हुरहूर. पोस्टमनची वाट पाहत दिवस ढकलायचे, अन् पंधरवड्याच्या आत पोस्टमन हटकून यायचा. त्याची दुरून येणारी आकृती पाहून त्याच्या मनात उत्कंठा आणि भीती यांचा लपंडाव सुरू व्हावयाचा. शेवटी एकदाचा पोस्टमन दरवाजात पोहोचायचा आणि शांतपणे एखादे पाकीट त्याच्या हातात द्यावयाचा. 'साभार-परत' ह्या अभिप्रायाने परत आलेले त्याचे वाङ्मयीन अपत्य. त्याला फार वाईट वाटायचे. तो त्या 'साभार-परत' आलेल्या कथेकडे काही क्षण मायेने पाहायचा व नंतर दुःखातिशयाने रद्दीच्या गठ्ठ्यात टाकायचा. छापून आलेल्या रद्दी कथा त्याने असंख्य वाचल्या होत्या व आपल्या छापून न आलेल्या कथा तो रद्दीत टाकायचा. कथा छापून आली काय किंवा न आली काय, शेवटी ती रद्दीतच जायची हे व्यवहारातले सत्य त्याला कळले नव्हते. आपल्या अपयशाने तो उगीचच झुरायचा. त्याच्या मस्तकात न्यूनगंडाचा साप वळवळायचा अन् त्याच्या मनाला डंख द्यायचा. गळून पडलेल्या पिसाकडे मोर जसा पाहतो तसा तो आपल्या 'साभार-परत' कथांकडे पाहायचा.

लखाशेठचा आणि वाङ्मयाचा फारसा संबंध नव्हता. फक्त कीर्द-खतावणीच्या लेखनात त्याला स्वारस्य होते. दिवाळीला काढलेला नफा-तोटा-पत्रक ही त्याची वार्षिक स्पर्धेतील यशस्वी कथा असायची. कुणी प्रसिद्ध करतो म्हटले तरी त्याने कधी ही 'नफा-तोटया'ची कथा दिली नसती. ही वार्षिक कथा फक्त तो स्वतः,

इन्कम टॅक्सचा वकील व साहेब एवढ्यांच्याच नजरेला पडायची. अधून मधून लखा-शेठ ललित वाङ्मय वाचायचा. रद्दीत आलेली पुस्तके, जुनी मासिके, रहस्य-कथा, लोकराज्याचे अंक, अमेरिकन वार्ताहर ह्यांपैकी जे हातात पडेल ते तो वाचायचा. वाङ्मयाचा उपयोग घड्याळाचा विसर पाडण्यासाठी व त्यानंतर पुडे बांधण्यासाठी असतो एवढेच त्याला कळायचे. एखादे पुस्तक विकत घेऊन वाचण्याचा 'घाऊक' व्यापार त्याने केला नाही. रद्दीत येणाऱ्या वाङ्मयातील थोडेफार वाचावे, हा त्याचा 'किरकोळी'चा व्यापार होता.

लखाशेठची आणि गणपत मास्तराची ओळख जुनी होती. मालक व गिऱ्हाईक ह्यांपेक्षा जवळचे नाते त्यांच्यांत होते. अडीअडचणीला दोघेही एकमेकांची कामे करीत-मैत्रीखातर.

दुपारची वेळ होती. दुकानात गिऱ्हाईक नव्हते. लखाशेठने आपले फुरसतीचे काम काढले. रद्दीचे गठ्ठे निवडायचे. वर्तमानपत्रे, मासिके इत्यादींची वर्गवारी करायची. रद्दीचा प्रकार व आकार ह्यांवर ही विभागणी असायची. रद्दी चिवडता चिवडता गणपत मास्तरचा रद्दीचा गठ्ठा पुढ्यात घेतला. त्यातले वर्तमानपत्रे, मासिके, वह्यांचे कागद त्याने वेगवेगळे काढले अन् एवढ्यात त्याच्या हातात एक लखोटा पडला. वर बुक-पोस्ट लिहून खाली गणपत मास्तरचा पत्ता असलेला लखोटा. लखाशेठने कुतूहलाने तो लखोटा उघडला. आत गणपत मास्तरची 'साभार-परत' आलेली कथा होती. कथेच्या कोपऱ्यावर 'साभार-परत' असे लेबल टाचणीने लावले होते. लखाशेठने घडी करून ती कथा लखोट्यात घातली. चांगली बंद तावाची पंधरा-वीस पाने होती. गणपत मास्तर लेखक व्हायच्या मागे लागलाय हे त्याला आज प्रथमच कळले. आजवर कधी गणपत मास्तर ही गोष्ट बोलला नाही किंवा 'साभार-परत' आलेली कथा रद्दीत घालायचा बावळटपणा त्याने केला नाही. ते 'साभार-परत'चे लेबल पाहून लखाशेठला जरा वाईट वाटले. त्याला गणपत मास्तरच्या दुःखाची जाणीव झाली.

आजवर गणपत मास्तरची एकही कथा छापून आली नव्हती. जर कधी छापून आली असतीच तर तो वासरासारखा धावत आला असता आणि धापा टाकीत टाकीत म्हणाला असता, "लखाशेठ, हे बघा मासिक. ह्यात माझी कथा छापून आली आहे माझ्या नावासकट." पण आजवर असे कधी घडले नाही. मनुष्य आपला विजय जेवढा प्रकट करतो, त्यांच्या शतपटीने अपयश लपवीत असतो. रद्दीतून नजरचुकीने आलेल्या कथेमुळे लखाशेठची गणपत मास्तरकडे सहानुभूतीची नजर वळली.

दोन-चार दिवस असेच गेले. एक दिवस फुरसत मिळताच लखाशेठने गणपतची कथा वाचून काढली. चांगली वीस-पंचवीस पानांची कथा होती. नको त्या प्रसंगांची कंटाळवाणी वर्णने, नको त्या व्यक्तींची पंगत ह्यांमुळे कथा काहीशी कंटाळवाणी

झाली होती. ऐन मध्यावर शोकांतिका झालेली कथा लांबवत लांबवत शेवटी सुखांतिका करावयाचा गणपत मास्तरचा प्रयत्न होता. कथानक बरे होते. पण कथेच्याऐवजी 'कंटाळवाणे भारूड' करून ठेवले होते गणपत मास्तरने. लखाशेठने ती कथा जपून बाजूला ठेवली. तसे काही कारण नव्हते; पण लखाशेठला ती कथा एकदम टाकाऊ वाटली नाही.

असेच काही दिवस गेले. कॅलेंडरचे पत्ते पिसले गेले आणि एक दिवस वर्तमानपत्र चाळता चाळता लखाशेठची एका जाहिरातीवर नजर गेली. "लघुकथांची स्पर्धा–' नवोदित लेखकांना आवाहन. आपल्या लघुकथा पाठवा. शब्दमर्यादा पंधराशे. कथा स्वतंत्र असावी. शेवटची तारीख ३० ऑगस्ट." लखाशेठला गणपतच्या 'साभारपरत' कथेची आठवण झाली. चटकन त्याला विचार सुचला. द्यावी त्या बिचाऱ्याची ती अभागी कथा पाठवून. असेल नशीब तर मिळेल बिचाऱ्याला बक्षीस.

दुपारी हाताला सवड मिळताच त्याने गणपत मास्तरची कथा बाहेर काढली. कथेला शब्दमर्यादा होती. त्याने त्या कथेच्या शब्द-संख्येचा अंदाज केला. गणपतच्या त्या भारुडात चार हजारांवर शब्द होते. पण स्पर्धेला शब्दसंख्येचे बंधन होते. क्षणभर त्याला वाटले की, गणपतला बोलावून घ्यावे व कथा आटोपशीर करून घ्यावी. पण त्यात फारसे स्वारस्य वाटले नाही. आणि लखाशेठच्या व्यवहारी डोक्यात एक कल्पना सुचली. कथेतील पहिली चौदाशे-पंधराशे शब्द असलेली पाने ठेवावीत व उरलेली पाने फाडून टाकावीत. मग त्याने तसेच केले. कथेवर परत नजर टाकली. नायक-नायिकेचा वियोग होतो, नायक नोकरीसाठी मुंबईला जातो व नायिका आपल्या नशिबात लिहिलेल्या पतीच्या घरी–कोल्हापूरला–जाते. इथेच जवळजवळ पंधराशे शब्द झाले होते. लखाशेठने त्या पुढील पाने बाजूस काढली. पहिली पाने व्यवस्थित टाचली. शेवटच्या पानावर अगांतुक डोकावणारा अर्धवट परिच्छेद खोडून टाकला. वरती एक कोरा कागद लावला. त्यावर कथेचे नाव 'शेवट'–व लेखकाचे नाव व पत्ता 'गणपत श्रीपत साळुंके–मु. पो. – कदमवाडी' असा लिहिला. एका कोऱ्या पाकिटांत ती कथा घालून त्यावर स्पर्धेच्या आमंत्रकाचा पत्ता लिहून ती कथा पोस्टाने पाठवून दिली. शब्दाचे बंधन व मुदत ह्या दोन्ही अटींत कथा बसत होती, एवढेच सुख लखाशेठला होते. गणपतला कशाचाच पत्ता नव्हता. तो नवी भारुडे खरडत होता.

जवळ जवळ दोन महिने गेले. आणि एक दिवस सकाळी दहा-साडेदहाच्या सुमारास गणपत मास्तर जवळ जवळ धावतच लखाशेठकडे आला. सुटीचा दिवस नसताना शाळा अर्धवट सोडून गणपत मास्तर आला होता.

"लखाशेठ, अहो लखाशेठ ! माझी लघुकथा छापून आली. पहिल्या नंबरचे बक्षीस मिळाले मला." मासिकाचा अंक पुढे करीत गणपत मास्तर म्हणाला.

"शाब्बास मास्तर. नाव काढलंत तुम्ही. आता पेढे काढा."

" पेढे देतो, पण लखाशेठ, काही तरी गोंधळ झाला आहे. माझी मूळची कथा परत आली होती–आणि मूळ कथा छापून आलेल्या कथेच्या दुप्पट-तिप्पट होती. मला कसं काय बक्षीस मिळालं, कथा कुणी पाठविली, कुणी आटोपशीर केली देव जाणे! काही जाम उमगत नाही."

" विश्वेश्वराची कृपा! बक्षीस मिळालं–नाव छापून आलं. बरं वाटलं."

" लखाशेठ, मला उगाचच तुमचा संशय येतोय. तुमच्या हाताला यश आलं. तुम्हीच माझी कथा काटछाट करून पाठवली असली पाहिजे. खरं काय ते सांगा. उगाच का माझा अंत पाहता?"

" मास्तर, मागं तुम्ही रद्दी घालायला आलात आणि त्या रद्दीच्या पैशातले पाच पैसे मला बक्षीस द्यायला निघाला होतात. मी सांगितलं की, वाटेत जाता जाता विश्वेश्वराला पाच पैसे ठेवा. येईल ते पुण्य निम्मं निम्मं वाटून घेऊ. त्या पाच पैशांचं काय केलंत?"

" लखाशेठ! ते पाच पैसे आईच्यानं विश्वेश्वराच्या देवळात ठेवले."

" मग झालं तर–त्या विश्वेश्वराची कृपा झाली. त्या रद्दीत चुकून तुझी परत आलेली कथा आढळली. ती वाचली. बरी वाटली. फार लांबलचक होती तुझी कथा. नंतर काही दिवसांनी वर्तमानपत्राची रद्दी चाळताना स्पर्धेची जाहिरात वाचली. मला वाङ्मयातलं काय कळतंय? काळ-काम-वेगाचं त्रैराशिक तेवढं आपल्याला पटतं. तुझी कथा परत वाचली. पंधराशेच्या आसपास शब्द झाल्यावर पुढची पाने बाजूला काढून ठेवली अन् पहिली सात-आठ पाने एकत्र टाचून पाठवून दिली. तुझ्या गुणांचं चीज झालं."

" पण लखाशेठ, माझ्या कथेचा मूळचा शेवट व तुम्ही केलेला शेवट यांत जमीन-अस्मानाचं अंतर पडलं."

" गणपत मास्तर, त्याचं असं आहे, आयुष्य काय, व्यवहार काय किंवा लघुकथा काय–शेवट कुठं करायचा हे माणसाला कळलं पाहिजे."

आजवर वाचून जे तत्त्वज्ञान गणपत मास्तरला उमजले नव्हते ते लखाशेठने क्लृप्तीने क्षणार्धात पटवून दिले. कृतज्ञतेने तो भारावला.

" लखाशेठ, तुमचे फार उपकार झाले. कथेच्या बक्षिसातला निम्मा हिस्सा तुम्हांला."

" नको रे बाबा ते बक्षीस मला. प्रेमानं दोन पेढे आणून दे आणि पोस्टाच्या तिकिटाचे दहा पैसे दे. म्हणजे झालं. अरे, माणसाला काय कळायला हवं हे तुला मी सांगितलं ना! आयुष्य काय, व्यवहार काय किंवा लघुकथा काय–कुठं संपवायची ते."

O




# नाडीग्रंथ-एक चमत्कार

भूतभविष्य सांगणाऱ्या नाडीग्रंथांची किंवा संहितांची माहिती देणारे हे पुस्तक आहे. भारतात जागोजागी, बहुधा शेकड्यांनी हे ग्रंथ विखुरले आहेत. त्यांतले 'पारखलेले' असे तेरा श्री. शांताराम आठवले यांनी या पुस्तकात दिले आहेत. या पुस्तकांचा बहुतेक भाग वेगवेगळ्या लोकांकडून मागवलेल्या त्यांच्या नाडीग्रंथांच्या अनुभवांनी भरलेला आहे. या लोकांना नाडीग्रंथाची आलेली प्रचीती खरी मानली तर, आठवले म्हणतात त्याप्रमाणे तो चमत्कार आहे.

हे अनुभव वाचताना अद्भुत कादंबरीहून अद्भुत आपण वाचत आहोत असे वाटते. या विषयाचे अनुभव देताना येणारा आकर्षकपणा यात काठोकाठ भरला आहे. काही वर्षांपूर्वी मुंबईत पाण्याची हाकाटी झाली होती. ही हाकाटी जाईल व जोरात पाऊस पडेल हे सांगताना, एका गृहस्थाचे परदेशाहून मागवलेले यंत्र उघड्यावर पडले आहे ते भिजेल म्हणून निवाऱ्यात ठेवावे, असे भृगुऋषी सुचवितो. हिमालय नाहीसा होणार आहे, भारताला उत्कर्षाचे दिवस आहेत, असली भविष्ये चटकन मन वेधून घेतात.

जगावरील अनेक देशांत विलक्षण भविष्य सांगणारे होऊन गेले व होत आहेत. जपानमधील एक प्रचंड भूकंप काही तास आधी वर्तवून, त्याप्रमाणे रेडिओवरून सूचना देण्यात आल्याने लाखो प्राण वाचल्याचे उदाहरण आहे. पण भृगुसंहितांचे—म्हणजे नाडीग्रंथांचे—वेगळेपण यातील भूतभविष्ये केव्हातरी मागील काळीच व्यक्तिगत अशी लिहून ठेवलेली आहेत यात आहे. ती व्यक्ती येऊन गेली की तिचे पान तिला परत दिले जाते. म्हणजे

**दि. बा. मोकाशी**

जेवढी पाने तिथे असतील तेवढ्या नि त्याच व्यक्ती तेथे येऊन जाणार हे अभिप्रेत असावे. हेही एक भविष्यच.

या ग्रंथात येणारे भविष्य खरेखोटे दोन्ही निघते. कधी अर्थ खरे निघते. अर्थ म्हणजे भूतकाळाचे खरे निघावे हेही मी पुष्कळ झाले म्हणेन. आठवले यांनी मिळवलेले लेख काहींनी अतिरंजित लिहिले असतील. स्वतः आठवले यांची वृत्ती चिकित्सेपेक्षा उत्साहाचीच जास्त वाटते. या पुस्तकाला त्यांनी दिलेले ' नाडीग्रंथ–एक अभ्यास ' हे नाव तसे सुचविते. खरे म्हणजे या पुस्तकाला 'नाडीग्रंथ–एक चमत्कार ' असे नाव हवे होते; कारण त्यात या ग्रंथाचा अभ्यास नाही.

हे नाडीग्रंथ कसे लिहिले असतील ? अभ्यासाने, अंतर्ज्ञानाने किंवा तंत्रविद्येने, असे तीन पर्याय त्यात सुचवले जातात. जर अभ्यासाने लिहिले असले तर त्यांची फोड मिळायला हवी. आजचे फलज्योतिष हे 'वराहमिहिरी' पद्धतीचे आहे. कुंडलीतील बारा स्थानांना त्यात महत्त्व आहे. माझ्या कल्पनेप्रमाणे संहिता किंवा नाडीग्रंथ नवमांश किंवा दशमांश कुंडल्यांवरून ज्योतिष सांगतात व या तऱ्हेच्या कुंडल्यांत स्थानांना महत्त्व नसते. ग्रह, त्यांच्या राशी व दृष्टचा एवढेच महत्त्वाचे. या दोन पद्धती अशा वेगळ्या असल्या तर नाडीग्रंथातील पद्धत आज नाहीशी झाली आहे, असे म्हणावे लागेल. पण त्यासंबंधी आज कुणी काही विशेष खुलासा करू शकलेले नाही.

आज आठवले यांनी नाडीग्रंथांचे अनुभव व माहिती गोळा करून एक नवा विषय पुढे आणला आहे. माणसाला भविष्य पाहण्याचा नाद फार जुना आहे. आज एकंदर परिस्थिती वाईट होत चालल्याने ज्योतिषाचा नाद फारच वाढलेला आपणांस दिसतो. पुढे काय होणार, याची काळजी ! अशा स्थितीत नाडीग्रंथांचा अभ्यास होण्यापेक्षा, ज्यांच्याजवळ हे ग्रंथ आहेत त्यांना बरकत येण्याचे हे दिवस आहेत. अर्थात त्यात काही बिघडले नाही. भृगू आदी ऋषींनी दारिद्र्यात दिवस काढले असतील. त्यांच्या वंशजांना तरी मिळावे.

आज सर्व क्षेत्रांतले लोक आपले भविष्य पाहत असतात–नास्तिक, बुद्धिवानही. आज पुण्या-मुंबईत एका घराआड ज्योतिषी आढळेल. ज्योतिष खोटे असे म्हणत ज्योतिष पाहण्यापेक्षा, या प्रकाराला सरळ तोंड द्यावे व नाडीग्रंथ किंवा जे काही असेल त्याची छाननी करावी. भविष्य कळूनही कष्ट किंवा जे काही असेल ते चुकत नाही, हे सर्वांना कळते. पण आज मने कमकुवत झाली आहेत व त्यांना आधार हवा आहे. नाडीग्रंथ किंवा दुसरे ज्योतिष याचा दुसरा तरी काही उपयोग मला दिसत नाही. ○

**[ नाडीग्रंथ–एक अभ्यास : ले. शांताराम आठवले, प्रकाशक–मनोहर ग्रंथमाला, १६०९ सदाशिव पेठ, पुणे २. किंमत रु. ८.००. पृष्ठे १७६.]**

# भेंडीच्या पेंडया

सुधाकर राजे

## □ प्रेमाची सहामाही परीक्षा

अमेरिकेतल्या एका विश्वविद्यालयाने 'प्रेम कसे करावे ?' हे शिकविणारा एक अभ्यासक्रम सुरू केला असल्याचे परवा वर्तमानपत्रांत वाचले. म्हणजे रोमिओ-ज्युलिएट, लैला-मजनू इत्यादी मंडळींची फुकटच नावे झाली म्हणायची. रोमिओ प्रेमाचा ग्रॅज्युएट नव्हता अन् मजनूने प्रमाची पीएच्. डी. घेतलेली नव्हती, मग असलेल्या अशिक्षित प्रेमाचा उदोउदो कसला मांडायचा ? आता प्रेमासारखी रोमँटिक गोष्ट घोकंपट्टी करून अन् पेपर लिहून शिकता येते हे मला माहीत नव्हते. तेव्हा प्रेमाचा अभ्यासक्रम काय असू शकेल, याची कल्पना करणे सोपे नाही. तरीदेखील कल्पना करून पाहू या—

धडा पहिला, प्रेमाचे मानसशास्त्र : प्रेम कोणीही करीना अशी खोटी फिर्याद करण्यापेक्षा आपणच मास स्केलवर प्रेमाचा उद्योग मांडावा, म्हणजे कोठेतरी खडा लागेल. प्रेमाची भावना इतकी विशाल असते म्हणतात, की खऱ्या प्रेमवीराने आपल्या प्रेमाचे रेशनिंग करून पाच-पन्नास जणींवर एकाच वेळी प्रेम करायला काहीच हरकत नाही.

धडा दुसरा, प्रेमाचे गणित : प्रेमाच्या गणितात शून्याला फार मोठे महत्त्व आहे. कारण 'तिच्या' शिवाय सगळे जग शून्य भासले नाही तर तुमच्या प्रेमाचा हिशेब चुकला असे खुशाल समजावे. शिवाय तिच्यासाठी काल पंधरा रुपयांच्या चपला, आज वीस रुपयांची पर्स अन् उद्या पंचवीस रुपयांची साडी अशा हिशेबाने महिन्याकाठी तुमच्या अडीच-तीनशे रुपयांत उरते काय ?—अर्थात् शून्य.

धडा तिसरा, प्रेमाचे आहारशास्त्र : मधुमेहाप्रमाणेच प्रेम झालेल्या माणसाने काय खावे याचे कडक नियम आहेत. प्रेमाची चटणी, प्रेमाची भाकर हे जरी आता सुधारलेल्या युगात खरे राहिले नसले तरी प्रेमाचा पाव अन् प्रेमाचा मस्का हे विसरू नये. शिवाय प्रेमदेवतेला रोज मसाला-डोशाचा नैवेद्य दाखविला नाही तर ती प्रसन्न होणे सुतराम अशक्य. स्वतः प्रेमवीराने मात्र शक्यतोवर लिक्विड डायटवरच राहावे. म्हणजे चहा प्यावा आणि सिगारेट प्यावी.

धडा चौथा, प्रेमाचे व्याकरण : प्रेम नीट 'करता' आले नाही तर 'कर्म' उभे राहील हे विसरू नये. प्रेमपात्राचे सामान्यनाम असामान्य वाटले पाहिजे. प्रेमाच्या व्याकरणात प्रथम-पुरुष नसतो, प्रथम-स्त्री असते.

धडा पाचवा, प्रेमाचे वनस्पती-शास्त्र : प्रेम हे घरी करायचे नसते, बागेत करायचे असते. (पाहा : कोणताही हिंदी सिनेमा.) हिरवळीवर बसून जसे प्रेम करता येते तसे खुर्चीवर बसून करता येत नाही. कारण टूथपेस्टप्रमाणे प्रेमातही क्लोरोफिल असावे लागते. प्रेमाचा सुगंध हाँगकाँगच्या प्लास्टिक फुलाप्रमाणे दीर्घकाळ टिकला पाहिजे.

धडा सहावा, प्रेमाचे व्यवहारशास्त्र : प्रेमवीराने रोज दाढी करता कामा नये. कोरीव दाढीचा प्रेमवीर ही कल्पनाच असंबद्ध आहे. प्रेम करणे अन् तरतरीत दिसणे या दोन विसंगत गोष्टी आहेत. प्रेमवीराचा चेहरा योग्य प्रमाणांत भकास दिसला पाहिजे. निदान पाहणाराला हा माणूस साम्यवादी तरी आहे, नाही तर प्रेमवीर तरी आहे, हे चट्कन ओळखता आले पाहिजे.

मला वाटते हे प्रारंभिक सहा धडे शिकल्यावर प्रेमाच्या सहामाही परीक्षेत पास व्हायला हरकत नसावी.

## ☐ परमेश्वराची लाडकी लॅम्ब्रेटा

जपानमधल्या बौद्ध व शिंतो-धर्मीय देवळांतले पुजारी एक नवीन पुण्य-कर्म करू लागले आहेत, त्यात पुण्य व पैसा या दोन्हींची कमाई होत आहे. जपानमध्ये सध्या अपघातांचे प्रमाण इतके वाढले आहे की लोक आपल्या मोटर-गाड्या घेऊन देवळात जात आहेत व पुजारी मोटरीला वीस रुपये आणि मोटरसायकलीला पंधरा रुपये या भावाने आशीर्वाद देत आहेत ! धर्माचे माहेरघर म्हणून गाजलेल्या हिंदुस्थानातही अपघात टाळण्याचा हा रामबाण उपाय ट्रॅफिक पोलिसांना सुचला नाही. पण आपल्याकडे तर 'भुईचा भार' कमी करण्यासाठी प्रत्यक्ष यमच टॅक्सीवाल्याचा अन् बस-ड्रायव्हरचा अवतार घेत असल्याने हा उपाय हिंदुस्थानात तावडतोब अंमलात आणावा, अशी माझी समस्त पादचाऱ्यांच्या वतीने शिफारस आहे. अर्थात या जपानी उपायात खास हिंदुस्थानी सुधारणा कराव्या लागतील हे ओघानेच आले. उदाहरणार्थ, एकदा मोटरगाडी अन् मोटरसायकल यांची देवाच्या दरबारात वर्गवारी केली की मूठभर फियाट गाडीला आशीर्वादाचा जो भाव तोच भाव ऐसपैस फोर्डला किंवा आलिशान मर्सिडीजला हे देवाला कधीच खपायचे नाही. त्याचप्रमाणे राजदूत अन् बीएस्ए मोटरसायकलीला एकाच भावाचा आशीर्वाद का ? अन् मोटरसायकलीला पुण्य मिळू शकते तर स्कूटरने काय पाप केले आहे ? फार तर परमेश्वराने लॅम्ब्रेटा व व्हेस्पा असा भेदभाव करू नये.

## ☐ स्वर्गात लागणारं फॉरिन एक्स्चेंज

एका पाश्चिमात्य धार्मिक संप्रदायाची प्रमुख असलेल्या एका तथाकथित संतिणीने गेल्या गुरुवारी जगबूड होणार असल्याचे भाकीत केले होते, पण आता तिने जाहीर केले आहे की, तिच्या प्रार्थनेमुळे आणखी काही दिवस जगाला जीवदान

मिळाले आहे; आता १७ मार्चला जगबूड होणार आहे, तेव्हा त्या आधी जमेल तेवढ्या लोकांनी उडत्या तबकड्यांत बसून स्वर्गाला जावे ! म्हणजे अस्मादिकांचा अवतार संपुष्टात आला असे म्हणायला हरकत नाही; कारण, कोठल्याही गोष्टी-साठी क्यूमध्ये उभे राहण्याचा मला कंटाळा आहे, तेव्हा एवढ्या गर्दीत स्वर्गाचे बुकिंग करण्यासाठी आपल्याला किती वेळ ताटकळत उभे राहावे लागेल याच्या कल्पनेनेच माझे पाय दुखायला लागले आहेत.

आणि यदाकदाचित बुकिंग काउंटरपर्यंत पोचण्याची करामत आपल्या हातून झालीच तरी "एक स्वर्ग–एअर-कंडिशन्ड चेअरकार !" एवढे म्हणून भागणार नाही. कारण, या उडत्या तबकड्या कोठल्या विमान-कंपनीच्या आहेत, याचा अजून पत्ता लागलेला नाही. त्या परदेशी कंपनीच्या असल्या की फॉरिन एक्स्चेंजचा बांधा आलाच. भारत सरकार जवळच्या इंग्लंड-अमेरिकेला जाण्यासाठीदेखील परदेशी चलन देत नाही, तेव्हा दूर स्वर्गाला जाण्यासाठी ते देईल हे मला तरी शक्य वाटत नाही. बरे, मी म्हणतो, इंग्लंड-अमेरिकेला पोचल्यावर तिकडे एखाद्या दोस्ताकडून पौंड-डॉलर उसने घेता येतील, पण इहलोकी एकाही पुण्यवान माणसाशी दोस्ती करण्याचे पुण्य माझ्या हातून घडले नसल्याने स्वर्गात लोकल करन्सी हातउसनी देणारा एखादा स्वर्गवासी पुण्यश्लोक सावकार मला भेटेल तेही संभवत नाही. अन् फॉरिन एक्स्चेंज-शिवाय अमेरिकेतला कॉफीचा कपदेखील परवडत नाही, तर स्वर्गातला अमृताचा प्याला काय परवडणार ?

आणखी एक प्रश्न म्हणजे या उडत्या तबकड्यांची फक्त पृथ्वी ते स्वर्ग एवढीच शटल्-सर्व्हिस आहे का ? असल्यास हा रूट व्हाया नरक आहे का ? अन् तसा तो असेल तर हल्ली ज्याप्रमाणे अमेरिकेला जाणारी विमाने जबरदस्तीने क्यूबात उत-रवली जात आहेत त्याप्रमाणे एखाद्या माथेफिरूने स्वर्गाला जाणारी तबकडी मध्येच नरकात उतरवली तर ? गेली कित्येक वर्षे दिल्लीचा उन्हाळा काढूनही नरकातली हीट आपल्याला सहन होईल, अशी मला खात्री वाटत नाही.

आणि मुख्य मुद्दा म्हणजे स्वर्गात विशेष असे काय आहे ? माझ्या मते स्वर्गाची मुख्य उणीव म्हणजे स्वर्गात वर्तमानपत्रे नाहीत. मग अमृताचा मॉर्निंग कप घेताना वाचायचे काय ? नारदमुनी एक परमेश्वराचे स्पेशल कॉरस्पॉंडंट आहेत, पण इतरांची सोय काय ? दुसरे म्हणजे पृथ्वीवर गरम पेय हवे असेल तर एस्प्रेसो आहे, थंड हवे असेल तर कोक आहे. स्वर्गात काय, सकाळ-संध्याकाळ तेच ते अमृत. आता स्वर्गात हिंदी चित्रपट नाहीत हा एक मोठा फायदा असला तरी अप्सरांचा कावारे तरी किती वेळ पाहायचा ? आणि मुख्य म्हणजे स्वर्गात परमेश्वराची एक-छत्री सत्ता आहे, लोकशाही नाही. आता लोकशाही नाही म्हणजे निवडणुका नाहीत, निवडणुका नाहीत म्हणजे पक्ष नाहीत, पक्ष नाहीत म्हणजे पक्षपालट नाही–थोड-क्यात म्हणजे स्वर्गात गंमत नाही.

तेव्हा हा सर्व विचार करून मी असे ठरविले आहे की, कोठल्याही उडत्या तबकडीवर स्वर्गाच्या इनॉग्युरल फ्लाइटचा पास मिळविण्याच्या भानगडीत न पडता जगबुडीचा फर्स्टहँड रिपोर्ट 'माणूस'ला पाठविण्याच्या तयारीत राहायचे. अर्थात दोन-चार फोटो रिपोर्टबरोबर अलेच. आता 'माणूस' आठवड्यातून एकदाच निघतो ही अडचण आहे खरी, पण निदान त्या दिवशी तरी 'माणूस'ची खास आवृत्ती काढावी, अशी माझी माजगावकरांना सूचना आहे. वाटल्यास पुढच्या अंकांत त्यांनी कमी पाने द्यावीत. कदाचित् जग बुडणार हे त्यांच्या दृष्टीने तितकेसे महत्त्वाचे नसेल, पण जगाबरोबर सदाशिव पेठदेखील बुडेल हे निश्चितच अत्यंत महत्त्वाचे आहे, नाही का ?

तेव्हा माजगावकरांनी आतापासूनच विशेषांकाच्या तयारीला लागावे. निदान अग्रलेख अवश्य लिहून ठेवावा. शीर्षक मी सुचवतो–" जगबुडीच्या निमित्ताने परमेश्वरास आमच्या काही विधायक सूचना. " टाइपही चांगला ठळक वापरावा. किती ठळक ? एक गोष्टच सांगतो–एक संपादक एका नवशिक्या मित्राला आपल्या छापखान्यातले निरनिराळ्या आकारांचे टाइप दाखवून ते केव्हा वापरायचे असतात हे समजावीत होता. जसा प्रसंग मोठा तसा टाइप मोठा हे सर्वसाधारण तत्त्व ऐकल्यावर मित्राचे लक्ष वरच्या फळीवर एका खूप मोठ्या टाइपाकडे गेले. त्याने म्हटले, "त्याचा उपयोग नाही सांगितलास ?" संपादक म्हणाला, "तो टाइप जगबुडीची बातमी देण्यासाठी ठेवला आहे." तो मित्र आश्चर्याने म्हणाला, "पण त्याच्याही वरच्या फळीवर त्याहूनही मोठा टाइप आहे, तो कशाला ?" संपादक गंभीरपणे म्हणाला, " जगबूड विशेषांक–आवृत्ती !"

O


---

## सेक्युलॅरिझम....एक मतप्रदर्शन.... [पृष्ठ २७ वरून]

विचित्र संलग्नता आपल्याकडे आहे, याला कोणाचा उपाय आहे ? शिवाय प्रा. दांडेकर यांनी या संदर्भात राज्य-धर्म संबंध व निरनिराळ्या धर्मातील व्यक्तींचे संबंध यांची विनाकारण गल्लत केली आहे. सर्वधर्मसमभावाचा अर्थ राज्याने प्रत्येक धर्माशी ठेवण्याचे संबंध (हस्तक्षेपाचे वा उदासीनतेचे) समान असणे.

सेक्युलॅरिझमची प्रेरणा मान्य केल्यानंतर समाजशासनाचा व्यूह (स्ट्रॅटेजी) ठरतोच. तावडतोबीच्या डावपेचांच्या तपशीलाबाबत मर्यादित मतभेद शक्य आहेत. पण एकंदरीत "चुचकारण्याच्या धोरणा"ने आजवर फायदा झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे तात्पुरत्या लोकप्रियतेच्या आमिषाला बळी न पडता या जीवनमूल्याचा सतत पुरस्कार करीत राहून लोकशिक्षण साधणे, हा एकच मार्ग सद्यःस्थितीत दिसतो.

O



**लेखक । ब्रिगेडियर जे. पी. दळवी**

**अनुवादक । माधव कानिटकर**

**लेखांक दोन**

भारतावर कपटी वक्रदृष्टी ठेवूनच तिबेटमध्ये घुसलेल्या चीनने त्याच्या खास 'चिनी' तंत्राने भारताशी वागायला सुरुवात केली. तिबेटमध्ये घुसल्याबरोबर लगेच भारताशी भांडण उकरून काढले नाही. प्रथम पूर्वतयारी चालू केली. आधी तिबेटमध्ये आपले पाय घट्ट रोवून घेतले. भारताच्या उत्तर सरहद्दीला लागूनच मोठमोठे फसवे रस्ते आणि विमानतळ बांधायला सुरुवात केली. ह्यांतला सर्वात मोठा आणि महत्त्वाचा हाय-वे बांधताना तर त्यांनी अक्साई-चीन प्रदेशातील भारताचीच फार मोठी भूमी खाल्ली. भारताला न विचारताच. तरी आपले लक्ष नव्हते. एवढेच नव्हे तर भारताच्या उत्तरसीमेला लागूनच तिबेटमध्ये त्यांनी चिनी सैन्य फार मोठ्या संख्येने आणून ठेवले. चीन भारतीय नेत्यांना फसवीत होता. ते फसत होते. चीनने जाहीर केले की ही सगळी तयारी त्यांच्या स्वतःच्या संरक्षणा-

**कुलवंतसिंग रिपोर्टने सरकारला स्पष्ट इशारा दिला होता की, जर चीनबरोबर युद्ध झालेच तर आपली सेना अडचणीत येईल. भलत्या भ्रमात राहू नका. पण........**

---

साठी आहे. भारतावर हल्ला करण्यासाठी नव्हे. १९५४ मध्येच चीनने दोन मोठे रस्ते बांधून काढून चीन-तिबेट संलग्न करून टाकले. आता मोठमोठे चिनी लष्करी ट्रक्स चिनी सैन्य भरभरून भारताच्या सरहद्दीपर्यंत सहज आणि द्रुतगतीने येऊन पोचू शकणार होते. आणि आपले जवान? सरहद्दीपर्यंत पोचेपर्यंतच हिमालय पर्वताच्या दुर्गम प्रदेशात अपुऱ्या अन्न-वस्त्रानिशी थंडीत कुडकुडत 'रस्ता' शोधत फिरणार होते. प्रत्यक्ष लढण्यापूर्वीच त्यांची ताकद ही अशी खच्ची होणार होती. चीन आणि तिबेट यांना जोडणारी रेल्वे-लाईन बांधून काढण्यासाठी चिनी इंजिनीयर्स सर्व्हे करीत होते. राजकीय पातळीवरदेखील चीन तिबेटमध्ये यशस्वी ठरत होता. कारण? अत्यंत हुशार पण केवळ हलक्या कुळात जन्मल्यामुळे—केवळ परिस्थितीमुळे—हलकी कामे करावी लागणाऱ्या आणि परिणामी तिबेटमधल्या मालकवर्गावर आणि धर्मगुरूंवर आधीच चिडलेल्या अनेक तिबेटी तरुणांना चिन्यांनी हाताशी धरले. त्यांना खुद्द चीनमध्ये स्वखर्चाने नेऊन उत्तम शिक्षण दिले. मुद्दामच मोठमोठ्या अधिकाराच्या जागा दिल्या. तिबेटमधल्या या 'दलित' तरुण पिढीचे रूपांतर झाले होते, त्यांचे 'ब्रेनवॉशिंग' झाले होते. असाच एक तिबेटी तरुण मला भेटला होता. तिबेटी मालकवर्गाबद्दल, एकूण तिबेटबद्दलच तो इतके कडवट बोलला की एखादा चिनी अधिकारीदेखील तसे बोलला नसता. बरोबर आहे. कारण आता तो 'पददलित', 'हरिजन' किंवा 'मागासलेल्या जमाती'चा किंवा 'अल्पसंख्य' वगैरे काहीही नव्हता. आता तो होता रुबाबात फिरू शकणारा अधिकारी. जन्माने तिबेटी असूनदेखील त्याला आता तिबेटच्या भूमीबद्दल आदर नव्हता. त्याची निष्ठा आता होती ती चीनवर!

चीन आणि तिबेट यांतली सर्वांत महत्त्वाची शहरे चिन्यांनी टेलिफोनने 'जोडून' टाकली होती. तीदेखील अद्ययावत साधनांनी. लढाईमध्ये आपले सैन्य कुठे आहे, परिस्थिती काय आहे, पुढे काय करायचे. याची 'खबर' शक्य तितक्या जलद 'मागे' द्यावी लागते. वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्याला परिस्थितीची जाणीव करून

देणे, शक्य तितक्या लवकर पुढचा हुकूम घेणे, दोन लष्करी 'ठाण्यां'चा एकमेकांशी सतत संपर्क असणे याला काही महत्त्व असते की नाही? काय तयारी होती आपली? आपल्या लष्करी अधिकाऱ्यांकडे हिमालयासारख्या फसव्या प्रदेशात वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत गैरसोयीचे असे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात वापरलेले वायरलेस सेटस् होते, की ज्यांवर बोललेले नीट ऐकूदेखील येत नसे. आपली एक तुकडी निश्चित किती अंतरावर आहे, याचा दुसऱ्या तुकडीला पत्ता नसे. सगळाच गोंधळ.

१९६२ च्या युद्धाची तयारी १९५४ मध्येच चिन्यांची ती तशी होती, तर आपली ही अशी! कारण त्या वेळी आपल्या नेत्यांची सरहद्दीकडे बघण्याची भावनाच अशी होती की कशाला पाहिजे सैन्यावर जास्ती खर्च? कशाला पाहिजेत आसामच्यापुढे हिमालय पर्वतापर्यंत मोठमोठे रस्ते? कशाला पाहिजेत टेलिफोन कनेक्शन्स? 'तिथे तर गवताचे पातेदेखील उगवत नाही!' तिथे सैन्याची जमवाजमव करणे, भावी युद्धाची तयारी म्हणून रस्ते बांधणे यांचा विचारदेखील नेते करीत नव्हते. एवढी जय्यत तयारी असूनदेखील १९५४ मध्ये चीनने भारताबरोबर लगेच गडबड सुरू केली नाही; कारण त्यांना आणखी तयारी करायला वेळ हवा होता. शिवाय १९५० ते १९५३ या काळात चीन कोरिअन युद्धात गुंतला होता. १९५४ मध्ये चीन गडबड करीत होता फ्रेंचांबरोबर. 'तुम्हांला नंतर बघतो' असा विचार मनातल्या मनात करून चीन भारतीय नेत्यांना गोड गोड बोलून फक्त झुलवीत होता. तो काळ होता 'हिंदी-चिनी भाई भाई!' या घोषणेचा. उभय देशांची 'सांस्कृतिक शिष्टमंडळे' परस्परांच्या देशांना 'सदिच्छा भेटी' देत होती. आपल्या देशाचे नेते समाजवादावर लंबीचवडी व्याख्याने देत फिरत होते. पहिली पंचवार्षिक योजना आखली गेली होती. धरणे बांधायची! तरुण पिढीला नेते सांगत होते, 'खेड्याकडे चला!' (आणि सरहद्दीकडे कोणी 'चला'?) समाजवादी भारतातल्या समाजवादी जनतेचे दारिद्र्य दूर करायचे. 'युद्ध', 'बंदूक', 'विमाने', 'बॉम्ब', 'जवान', 'राष्ट्रवाद', 'सरहद्द' किंवा 'आक्रमण' यांतला एकही 'हिंसक' (!) शब्द तरुण पिढीपर्यंत नेते पोचवीत नव्हते. अलौकिक बुद्धिमत्तेच्या माणसांचे काँग्रेसशी जमत नव्हते. जुने आणि जाणिते नेते काँग्रेस सोडून 'अखिल भारतीय' विरोधी पक्षांत धडाधड सामील होत होते. दक्षिण हिन्दुस्थानात वरंगळ आणि तेलंगणमध्ये शेतकऱ्यांच्या भारत सरकारविरुद्ध प्रक्षोभक दंगली होत होत्या. भारताच्या प्रतिनिधीच्याच विनंतीवरून यूनोमध्ये तिबेटच्या प्रश्नावरची चर्चा बंद करण्यात आली होती. चीन हे सगळे बघत होता. भारतात घडणाऱ्या प्रत्येक घटनेची खबर चीनला होती. चीन मनात म्हणत होता, 'चांगलं चाललंय! राजकारणात कपटी तर नाहीतच, पण डोक्यांनी कमीच आहेत हे भारतीय नेते. गोड बोललं की फसतात. चला, आणखी काही काळ गोड बोलू या.'

...आणि मग तो त्रिखंडात गाजलेला 'पंचशील' करार २९ एप्रिल १९५४ ला चीनने भारताबरोबर केला. काय होती त्या पंचशील करारातली ५ तत्त्वे ?

१. चीन आणि भारत परस्परांच्या सीमारेषा आणि सार्वभौमत्व यांबद्दल आदर बाळगतील.

२. चीन आणि भारत एकमेकांवर आक्रमण करणार नाहीत.

३. एकमेकांच्या अंतर्गत व्यवहारात लक्ष घालणार नाहीत.

४. परस्परांचा फायदा होईल, अशा तऱ्हेनेच व्यवहार करतील.

५. शांततापूर्ण सहजीवन हे दोन्ही राष्ट्रांचे उद्दिष्ट राहील.

या करारामुळे फायदा झाला तो फक्त चीनला. या करारातील महत्त्वाची मेख भारतीय नेत्यांना कळली नाही. चिन्यांचा प्रदेश असलेल्या तिबेटमध्ये भारत या करारामुळे व्यापार आणि दळणवळण करू शकणार होता. चिन्यांचा प्रदेश असलेला तिबेट. (Tibetan Region of China) तिबेट हा चीनचा प्रदेश आहे हे लेखी करार करून भारताने मान्य केले. बंधनकारक मानले. चीनचे खोटे प्रेम स्वीकारून आपण आपले तिबेटवरचे हक्क स्वखुषीने सोडले. भारतीय नेते पंचशील कराराबाबत खुशीत होते. त्यांना वाटत होते 'आपण चीनला फसवलं' कसं ? चीनसारख्या बलाढ्य राष्ट्राकडून 'आक्रमण करणार नाही' असं लिहूनच घेतलं की आम्ही. त्याच वेळी भारतीय नेत्यांनी चीनला विचारायला हवे होते की 'परस्परांच्या सीमांबद्दल आदर बाळगू' असे म्हणताना पंचशील करारात ! मग आधी त्या सीमा कुठल्या ते निश्चित ठरवा. तरच या करारावर आम्ही सही करू. नाहीतर नाही ! एवढ्यावर भागलं ? १९०४ च्या अँग्लो-तिबेटियन कराराप्रमाणे खुद्द तिबेटमध्ये पोस्ट आणि तार खात्याचे व्यवहार करण्याचा आणि सैन्य आणून ठेवण्याचा अधिकार भारताला होता. हे आपलें महत्त्वाचे अधिकार आणि हक्क आपण सोडून दिले. सगळ्या अर्थाने तिबेट चिन्यांना देऊन टाकला. या कराराचे समर्थन करताना भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले, "तिबेटमध्ये आत्ता आहे तीच परिस्थिती आपण मान्य केली आहे. ऐतिहासिक आणि व्यवहारिक दृष्टीने विचार करता हा करार करणं इष्टच होतं !"

हा विचार फक्त एका शांतिदूताचा होता. पंतप्रधान नेहरूंना काहीही करून युद्ध नको होते. शांतता हवी होती. त्यांना अशी आशा होती की, चीनबरोबरचा कुठलाही प्रश्न आपण शांततापूर्ण वाटाघाटी करून सोडवू शकू ! पंडितजींचा हा कयास तर्कशास्त्रालासुद्धा सोडून होता. आपण होऊन चावा घ्यायचा नाही हे ठीक आहे, पण फुत्कार टाकायला काय हरकत होती ? नुसता फणा काढलान तरी सर्पापासून लोक लांब पळतात; कारण त्याची 'ताकद' ठाऊक असते म्हणून. उत्तरेकडे हिमालय पर्वतात देशाच्या संरक्षणाच्या तयारीच्या दृष्टीने भारतीय सैन्याला काय काय अडचणी येतील याचा विचार करायचा सोडून पंडितजींनी या प्रश्नाकडे संपूर्ण दुर्लक्ष केले.

एक नवीनच घोषणा देशात पुन्हा पुन्हा ऐकवली जात होती की, 'नेहरू जिवंत असेपर्यंत चीनशी युद्ध होणार नाही.' बडे बडे नेते हेच सांगत होते. वृत्तपत्रे आकर्षकरीत्या तेच छापीत होती. लोक हेच वाचीत होते. १९५४ ते १९६२ या महत्त्वाच्या ८ वर्षांच्या कालखंडात चीनने लढाईची प्रचंड तयारी केली होती. आपण तशी केली नाही. कारण घोषणाच ही की, 'नेहरू असेपर्यंत चीनवरोबर लढाई होणार नाही.' मग तयारी ती कसली? नेहरू आहेत ना!

आपले सरकार, त्याचा नोकरवर्ग, अर्थशास्त्रज्ञ यांच्यावरदेखील याच घोषणेचा पगडा बसलेला, राष्ट्रीय दृष्टिकोणसुद्धा हाच. कार्यक्रम आखले जात होते ते हेच धरून चालून की 'चीनवरोबर युद्ध होत नाही. त्याचा विचारदेखील नको.' याच दृष्टिकोणाचे जनक म्हणून शेवटी खुद्द पंडितजींच्याच मनाला फार यातना झाल्या. ते कळवळून म्हणाले की, "चीनने आमच्या पाठीत खंजीर खुपसला. चीनने आमचा विश्वासघात केला." विश्वासघात? विश्वास टाकायला सांगितले होते कुणी? नंतर ओरडून उपयोग काय? चीन नक्की विश्वासघात करील असे धरूनच चालला असतात तर ही पाळी आली नसती. ज्या वेळी चीन 'विश्वासघात' करण्याची तयारी करीत होता त्या वेळी काय करीत होते पंडित नेहरू? भारताची मान जगात उंच करीत होते. इतकी उंच की, आपल्यालाच आपली सरहद्द दिसेनाशी व्हावी. चीनला युनोमध्ये प्रवेश मिळावा म्हणून खटपट करीत होते. १९५५ मध्ये पंडित नेहरू बांडुंग परिषदेला गेले होते, त्या वेळी आफ्रो-आशियाई राष्ट्रांना चाऊ-एन्-लायची ओळख करून दिली ती पंडितजींनी. ज्या वेळी चीन लढाईची तयारी म्हणून त्याची आर्थिक आणि लष्करी ताकद वाढवीत होता, त्या वेळी आपण वातावरण ठेवले होते ते 'हिंदी-चिनी भाई भाईचे!' जगातली सगळी राष्ट्रे भारत-चीन मैत्रीचे कौतुक करीत होती. युनोमध्ये भारताचे नाव झाले होते. टाळ्या वाजवणारी काही राष्ट्रे अशी लबाड होती की, पुढे काय होणार आहे ते त्यांना ठाऊक होते. ती फक्त एवढेच म्हणत होती की, ज्याला कळायला पाहिजे त्याला कळत नाही. चीनपासून आपल्याला धोका नाही. मग फुकट हातावर टाळी द्यायला काय हरकत आहे? आपल्या बापाचं काय जातंय? म्हणा, "भारत हे फार महान् राष्ट्र आहे! भारत मोठा आहे! नेहरू मोठे आहेत! भारत-चीन मैत्री झिंदाबाद!" युनोमध्ये चीनला प्रवेश मिळावा म्हणून चीनचे जोरदार समर्थन आणि वकिली करीत होता फक्त भारत. इतर देश फक्त आतल्या आत कुत्सित हसत होते. आणि चीन? चीनला भारतावरोबर लढाई पुकारायला अजून वेळ हवा होता, चीन फसवी आणि मोहक भाषण देऊन सांगत होता की, "चीन आणि भारत यांच्यांत आत्तापर्यंत कधीही युद्ध झालेलं नव्हतं आणि इथून पुढं होण्याचं काही कारणच नाही.' भारताच्या नेत्यांना यात काही कळले? काही नाही. अरे! जर युद्ध होण्याचे काही कारणच नाही तर तसे पुन्हा पुन्हा सांगण्याची जरुरीच काय?

या काळातदेखील चीनने आपल्या कपटी नीतीचा थोडा स्पष्ट अंदाज आपल्याला वेळीच दिला होता. आपले नेते तो ओळखू शकले नाहीत. वेळीच त्यांनी चीनकडे गांभीर्याने पाहिले नाही. १९५५ मध्येच बांडुंग परिषदेत बोलताना चाऊ-एन्-लाय् म्हणाले होते की, "काही देशांना लागून असलेल्या चीनच्या सीमा अजून आम्ही निश्चित केलेल्या नाहीत." (We have NOT yet fixed our border lines with some countries.) कुणाला होता हा इशारा? आपण बेसावध होतो. पंचशील कराराची शाईसुद्धा वाळली नसेल त्यापूर्वीच तो करार चीनने ठोकरला. ऑगस्ट १९५४ मध्येच उत्तरप्रदेश–तिबेट सरहद्दीवर बारा-होत्ती (BARAHOTI) या ठिकाणावर चिनी सैनिक घुसले. त्यांनी गडबड चालू केली. बारा-होत्ती हे ठिकाण 'आमचं' आहे, 'आमच्या' हद्दीत ते येते आणि म्हणून तुम्ही ते खाली करा, असे चिन्यांचे म्हणणे होते.

१९५४ मध्ये पंतप्रधान पंडित नेहरूंनी चीनला भेट दिली. त्यांचे चीनमध्ये बादशाही थाटाचे स्वागत करण्यात आले. पंडित नेहरू आणि चाऊ-एन-लाय एक-मेकांशी हस्तांदोलन करताहेत, आलिशान मोटरमध्ये उभय राष्ट्रांचे पंतप्रधान आपापल्या इतमामात बसलेले आहेत, रस्ते सुशोभित केलेले आहेत. 'सुस्वागतम्,' 'भारत-चीन मैत्री चिरायू होवो,' 'पंडित नेहरू झिंदाबाद' असे फलक रस्त्यांत ठिकठिकाणी मोठ्या अक्षरांत बांधलेले आहेत, रस्त्यात प्रत्येक खांबावर भारत आणि चीन यांचे राष्ट्रध्वज एकत्र बांधलेले आहेत, फडकताहेत, पुढे संरक्षणासाठी फटफट्यांवरचे अधिकारी, मागे उभय पंतप्रधानांची सुंदर मोटर, त्याच्यामागे इतर चिनी सरकारी अधिकाऱ्यांच्या मोटरींची परेड. रस्त्याच्या दोन्ही फुटपाथवर नव्हे तर घरांच्या छपरांवर, गॅलऱ्यांत, झाडांवर, जागा मिळेल तिथे अक्षरशः मुंग्यां-सारख्या जमा झालेल्या चिनी जनतेने (!) पंडित नेहरूंची मोटर जवळ आल्या-बरोबर दोन्ही राष्ट्रांचे राष्ट्रध्वज हलवून कंठरव केला असेल की, 'पंडित नेहरू ऽऽ झिंदाबाद! हिन्दी-चिनी ऽऽऽ भाय भा ऽ य!' नेहरूंनी त्यांचे जगप्रसिद्ध मोहक हास्य करून दोन्ही फुटपाथवर जमलेल्या चिन्यांना प्रेमाने आणि स्नेहाने नमस्कार केला असेल! चाऊ-एन-लायदेखील मनातल्या मनात दिलखुलास हसला असेल पण वेगळ्या अर्थाने. चिनी हास्य ते. या अभूतपूर्व स्वागताने पंडित नेहरू भारावून गेले. पंतप्रधान नेहरू चीनवरून परत आले ते आनंदात, नेहमीच्या उत्साहाने, आणि येताना हा विचार बरोबर घेऊन आले की, 'चिनी नेत्यांना युद्ध नको आहे.' सर्वसामान्य माणूस त्यांच्यासारख्या थोर नेत्यावरदेखील असा आरोप करू शकला असता की, चिन्यांनी पंडितजींचे ब्रेनवॉशिंग केलेले आहे. इतका त्या 'चिनी' स्वागताचा पंडितजींच्या मनावर परिणाम झाला होता.

आता हेही पाहूया की, अत्यंत जागृत आणि उत्साही अशा इंडियन आर्मी जनरल स्टाफची चीनच्या बाबतीत भूमिका काय होती? हे मी इतक्यासाठीच सांगतोय

की, कोणी असा प्रश्न करू नये की, नेहरूंनी काय करायला हवे होते ते सांगू नका. त्याबद्दल काही बोलू नका. ते भोळे होते पण फार फार मोठे होते. इंडियन आर्मी त्या वेळी काय झोपली होती ? काय केलेत सैन्याधिकारी या नात्याने तुम्ही ? तुम्ही सरकारला जागे केलेत ?...आणि मी आत्मविश्वासाने सांगतो की, आम्ही झोपलो नव्हतो. आम्ही सरकारला वेळीच इशारा दिला होता. १९४७–४८ मध्ये काश्मीरमध्ये अत्यंत उत्तम कामगिरी बजावणारे धाडसी वीर जनरल कुलवंतसिंग हे आपल्या देशाचे उत्तरेकडून संरक्षण करण्यासाठी हिमालयासारख्या कठीण प्रदेशात लढताना भारतीय सैन्याला काय काय अडचणी येतील, याचा विचार करण्यासाठी नेमलेल्या कमिटीचे प्रमुख होते. यदाकदाचित चीनबरोबर लढाई झालीच तर आपल्याला काय अडचणी येतील, याचाही विचार त्यांनी त्या वेळी केला होता. कारण, आज ना उद्या चीनबरोबर सामना करावाच लागेल, याची भारतीय सेनेतल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची खात्री पटली होती. खात्री नव्हती ती फक्त सरकारला,– भारताच्या राज्यकर्त्यांना. जनरल कुलवंतसिंग यांनी चीनबरोबरदेखील लढाई होऊ शकेल, आपल्याला ती करावीच लागेल,– हा दृष्टिकोण ठेवूनच त्या बाबतीत सैन्याला येणाऱ्या सगळ्या अडचणी स्पष्ट करणारा आपला प्रदीर्घ अहवाल भारत सरकारला वेळीच दिला होता. पण दुर्दैवाने मुलकी अधिकाऱ्यांचे महत्त्वाचे 'अहवाल' ज्याप्रमाणे सरकारदरबारी धूळ खात पडतात, तसाच हा जनरल कुलवंतसिंग अहवाल–तो एका लष्करी अधिकाऱ्याचा देशाच्या संरक्षणाबाबतचा अहवाल असूनदेखील–सरकारकडे अक्षरशः धूळ खात पडला होता. नेहमीप्रमाणे सरकारी अधिकाऱ्यांना फार उशिरा त्यांच्या 'प्रोसीजर'प्रमाणे जाग आली आणि 'अरे ! तो जनरल कुलवंतसिंगांचा रिपोर्ट आलाय नाही का ? पाठवा हं लवकर वरती !' इतक्या सहज आणि थंड गतीने तो अखेर 'वर' पोचला. हा अहवाल वाचून सरकारने निर्णय काय घेतला ? तर केंद्रीय गृहखात्याच्या आधिपत्याखाली एक लहानसा (लहानसा ! Small Indo–Tibetan Border Force.) भारत-तिबेट सरहद्दीचे रक्षण करणारा इंडो-तिबेटन बॉर्डर फोर्स (लहानसा आणि फोर्स ?) निर्माण करण्यात यावा. कशासाठी ? मुख्यतः काही निवडक ठिकाणी (! ) आपल्या हक्कांचे संरक्षण व्हावे म्हणून. हक्क कधी फक्त निवडक ठिकाणीच असतात. शब्द बघा ! 'Mainly to establish, our administration in a few selected places.' एखादा 'भाऊ' जर उद्या थाटात सांगायला लागला की, माझ्या बहिणीच्या शरीरापैकी काही 'निवडक ठिकाणांचेच (! )' संरक्षण फक्त गुंडापासून करीन, तर त्याला तुम्ही भाऊ म्हणाल ? आणि आपल्या भूमीचे आणि हक्कांचे संरक्षण करणे हे कर्तव्य ज्या भारतीय जवानांचे होते ती इंडियन आर्मी ? या बाबतती यूसलेस ! निरुपयोगी ! एवढी मोठी इंडियन आर्मी असताना 'संरक्षणा'साठी वेगळा लहानसा फोर्स निर्माण करावा लागतो ? काय म्हणायचे याला !

कुलवंतसिंग रिपोर्टने सरकारला इशारा दिला होता. विचार करायला संधी दिली होती, की जर चीनबरोबर युद्ध झालेच तर आपली सेना अडचणीत येईल. भलत्या भ्रमात राहू नका. पण म्हणतात ना, 'नळी फुंकली सोनारे, इकडून तिकडे गेले वारे!' एवढा 'रिपोर्ट' वाचूनदेखील भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळाचा हुकम स्वच्छ आणि स्पष्ट असाच होता की, 'चीनविरुद्ध इतकी जय्यत सैनिकी तयारी ठेवण्याची आवश्यकता नाही.' उत्तरेकडची सरहद्द सांभाळण्यासाठी, देशाच्या संरक्षणासाठी अक्षरशः काहीही करायला सरकार तयार नव्हते. सरहद्दीलगत मोठमोठे रस्ते बांधले जात नव्हते. तिबेटमध्ये आपले गुप्त हेर नव्हते (आपल्या सरकारकडे इंटेलिजन्स ॲरेंजमेंट–गुप्त हेर खाते–आहे असे मी धरून चालतो.) शत्रूच्या हालचालींची टेहळणी करणारे, शत्रूंच्या हालचालींची आगाऊ वित्तं-वातमी आपल्या लष्करी अधिकाऱ्यांना आणून देणारे पथक नव्हते. आपल्या स्वतःच्याच भूमीवर ह्या व्यवस्था नव्हत्या. मग शत्रूच्या हद्दीत 'आपली माणसं' घुसवून खबर काढण्याची गोष्टच सोडा. आपल्या सेनेला कुठली अद्ययावत् शस्त्रास्त्रे लागतील, जवानांच्या वाहतुकीची व्यवस्था कशी करायची, सैन्याची पुनर्रचना करायला हवी का नको, सपाट प्रदेशात खेळले जाणारे युद्ध आणि हिमालय पर्वतात होणारी लढाई ही दोन्ही सारख्याच पद्धतीने लढवावी लागतील की काही वेगळ्या पद्धतीने, नवीन जवानांना कोणते नवे शिक्षण आवश्यक आहे, याचा विचार एकाही राजकारणी मायेच्या पूताने केला नव्हता. सैन्यातल्या अधिकाऱ्यांशी या बाबतीत त्यांचा संपर्क नव्हता. वृत्ती ही होती, सैन्यातले अधिकारी त्यांचे ते काय ते बघतील. आपल्याला काय आहे त्याचे? आपण आपले समाजवादावर भाषणे करीत दौरे काढू. लढाईसाठी काही पूर्वतयारी नको? योजना नको? सैन्य म्हणजे काय पोलीस पार्टी आहे? की पाठवली आपली आयत्या वेळी 'घटना स्थळी!' इन्स्पेक्टरसाहेब आणि इतर कॉन्स्टेबल्स यांना नुसते 'ड्रेस'मध्ये पाहूनच हटले पामर लोक मागे! प्रत्यक्ष लढाईपेक्षा त्यापूर्वीचे लष्करी डावपेच अधिक महत्त्वाचे असतात. त्यासाठी वर्षानुवर्षे तयारी करावी लागते. आपली काय 'तयारी' होती?

१९५४ पर्यंत चीनपासून आपल्याला धोका आहे हा विषयदेखील कुठ चर्चिला जात नव्हता. भीती कुणापासून? फक्त पाकिस्तानपासून. शत्रू नंबर १ कोण? चीन? छे: छे:! पाकिस्तान. हिंदुस्थानची १९४७ साली झालेली फाळणी, त्यानंतर झालेल्या धार्मिक दंगली आणि कत्तली. फाळणीपेक्षा फाळणीचे परिणामच अधिक भयंकर ठरले. मुसलमानांनी पंजाबमध्ये हिंदूंच्या केलेल्या अमानुष कत्तली, त्याचा बदला म्हणून बिहारमध्ये हिंदूंनी मुसलमानांना घातलेले कंठस्नान म्हणजे माणुसकीला काळिमाच होता. कुठल्याही विचारी पाकिस्तानी किंवा विचारी भारतीय इसम त्या वेळी जे घडले ते पाहून किंवा वाचून शरमेने मान खाली घालील. ढळढळा रडेल.

पण प्रत्येक पाकिस्तानी किंवा प्रत्येक भारतीय विचारी नसतो. आणि धर्माच्या बाबतीत सर्वसामान्य माणूस विचारापेक्षा अविचारच जास्त करतो. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांतील हिंदू आणि मुसलमान यांच्या आपसांतल्या द्वेषाला आणि मत्सराला काळ हे औषध ठरू शकले नाही. १९४७ मध्ये काय झाले हे दोन्ही जमाती अजूनही विसरू शकत नाहीत. राग, द्वेष, मत्सर आतल्या आत धुमसत होता आणि आहे. अजूनही बहुसंख्य मुस्लीम वस्तीतून जाणाऱ्या गणपतीच्या मिरवणुकांवर मशिदीतून अचूक दगड-विटांचा मारा होतो तर बहुसंख्य हिंदू वस्तीतून जाताना मुसलमानांचा ताबूत अक्षरशः पळवत नेला जातो. परिणामी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अवघ्या एका वर्षाच्या आत भारत आणि पाकिस्तान यांच्यांत युद्ध झाले. जरा कुठे स्थिरता आणि शहाणपणा या दोन्ही राष्ट्रांना येतोय न येतोय तोच ऑक्टोबर १९४७ मध्ये भारताचा अविभाज्य भाग असलेल्या कश्मीरमध्ये पाकिस्तानने टोळ्या घुसवल्या. काश्मीर वाचवण्यासाठी भारतीय सेना धावून गेली. धडक मारून भारतीय सैन्य कश्मीरमध्ये घुसले. आणि त्यांनी पराक्रम गाजवून पाकिस्तानी सैन्य अक्षरशः मागे रेटले. पाकिस्तान्यांना हाकलून दिले. या पहिल्याच लढाईत शूर भारतीय जवानांनी पाकिस्तानचे कायमचे कंबरडे मोडले असते. पण ही लढाई आपण जिंकत असताना, दोन तृतीयांश कश्मीर भारतीय सेनेने वाचवलेले असतानाच, नको त्या वेळी भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी युद्धबंदी स्वीकारली. एक तृतीयांश काश्मीर 'पाकव्याप्त' राहिले. तथाकथित कश्मीर प्रश्न 'यूनो'मध्ये गेला. आणि आजपर्यंत इतकी चर्चा आणि असंख्य सभा होऊनसुद्धा यूनोमध्ये कश्मीर प्रश्न लोंबकळत राहिला आहे. हा इतिहास आहे आणि म्हणूनच भावनेच्या भरात राहूनच फक्त या गंभीर प्रश्नाकडे कानाडोळा करून चालणार नाही. इतिहासापुढे कुठलीही व्यक्ती मोठी नसते. व्यक्तिपूजा असते ती फक्त सामान्य माणसांसाठी. पंडित नेहरू खूप मोठे होते, पण इतिहास त्यांना क्षमा करू शकणार नाही. आज पंडितजी असते तर हा इतिहास त्यांना खडसावून प्रश्न विचारू शकला असता की, 'काहीही कारण नसताना कश्मीरचे युद्ध अचानक बंद करण्याचा हुकूम, जवाहर! तू भारतीय सैन्याला का दिलास?'

भारत आणि पाकिस्तान यांचे वैर जवळ जवळ २० वर्षे कायम टिकले, वाढले ते या भारताच्या पंतप्रधानांच्या विचित्र हुकुमामुळे संपूर्ण कश्मीर आपल्या कजबात येणे हा प्रश्न भारतीय सेनेच्या दृष्टीने अवघ्या काही तासांचा होता. त्या वेळी 'कश्मीर प्रश्न' असा कुठला प्रश्नच भारतीय सेनेने शिल्लक ठेवला नसता. १९४७–४८ साली जन्मलेल्या नवीन पिढीला 'काश्मीर प्रश्न' हा शब्ददेखील ऐकायला मिळाला नसता. कसला आलाय बोडक्याचा काश्मीर प्रश्न? काश्मीर आमचे होते ते आम्ही घेतले बस्! तिथेच सगळे काही संपत होते. पण नाही. काश्मीर प्रश्न आपणच आपल्यावर लादून घेतला. भोळसर धोरणामुळे. काश्मीर

प्रश्नावर आपले किती जवान आतापर्यंत मेले, किती पैसे हकनाक खर्च झाले, सर्वसामान्य भारतीय जनतेला किती त्रास झाला, त्याचा हिशेब करण्यासाठी आता एखादा कॉम्प्युटरच लागेल. किती विचित्र पद्धतीने लढले गेले हे पहिलेच भारत–पाकिस्तान युद्ध ! दोन्ही बाजूंचे कमांडर–इन्–चीफस् ब्रिटिश होते. भारतीय सैन्याचे नेतृत्व करीत होते जनरल बुचर आणि पाकिस्तानी सैन्याचे नेतृत्व करीत होते जनरल ग्रेसी. दोघेही ब्रिटिश. त्यांना कुणामध्येच स्वारस्य नव्हते. ही भूमी 'त्यांची' नव्हती. हे दोघेही ब्रिटिश जनरलस् 'दुपारी युद्ध कसं काय झालं' याची चर्चा संध्याकाळच्या 'प्रेमळ' भेटीत करीत असत. लढाईबद्दल अंतःकरण पेटले होते ते फक्त भारतीय जवानांचे ! आणि म्हणूनच त्यांनी या लढाईत पाकिस्तानच्या तोंडाला फेस आणला.

फाळणीमुळे भारत आणि पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांत अनेक प्रश्न निर्माण झाले होते. भारत आणि पाकिस्तान यांच्या सीमा अजून आखून व्हायच्या होत्या. दोन्ही देशांत परस्परांच्या दृष्टीने 'अल्पसंख्य जमातीं'चा प्रश्न, नद्यांच्या आणि कालव्यांच्या पाणीवाटपाचा प्रश्न होताच. आणि असे इतर अनेक प्रश्न की, ज्यापैकी कुठलाही प्रश्न भारत आणि पाकिस्तान यांच्यांत गंभीर स्वरूपाची लढाई घडवून आणायला पुरेसा होता.

१९५१ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्या सेनांनी पुन्हा एकदा एकमेकांविरुद्ध दंड थोपटले ! पण नशीब पाकिस्तानचे की त्या वेळी लढाई टळली.

१९५० मधेच भारतीय सेनेला तोंड देता देता पाकिस्तानला टेक आली. पाकिस्तान धडा शिकले. भारताबरोबरचे आपले प्रश्न भारताबरोबर युद्ध केल्याशिवाय सोडवणे केवळ अशक्य आहे हे ते समजून चुकले आणि भारतीय सेनेबरोबर


※ माणिक वर्मा ※ चंपावती लिमये ※ शिरीष पै ※ सुमती क्षेत्रमाडे
※ विजया राजाध्यक्ष ※ सुधा करमरकर ※ ललिता फडके
※ प्रतिभा पाटील ※ सुमती गुप्ते ※ प्रफुल्ला जोशी

*जीवनाच्या निरनिराळया क्षेत्रांत नाव मिळविलेल्या*
*भगिनींचे मनोगत*

**" मी ..... स्वप्न ..... वस्तुस्थिती "**

**एप्रिल ६९ च्या महिला विशेषांकाचे आकर्षण**

*मूल्य २ रुपये : वा. व. रु. १५.*

**वसंत मासिक, मुंबई ४.**

लढाई करणे तर शक्य नव्हते. भारतात प्रत्येक माणूस म्हणजे ' नेहरू ' नव्हता. काय हे पाकिस्तानचे दुर्दैव आणि भारताचे सुदैव. भीक तर मागता येत नाही आणि लढायला ताकद नाही. पाकिस्तान हे समजून चुकले की युद्धाच्याच मार्गाने भारता-बरोबरचे प्रश्न सोडवायचे असतील तर भारतीय सेनेला तोंड देण्यासाठी आपल्याला अजून फार तयारी करावी लागेल. भारतीय जवानांपुढे पाकिस्तानी ' जवान ' फारच कमकुवत आहेत, हे पाकिस्तान समजून होते. १९५० मध्ये, कायमची दहशत बसेल अशा भारतीय सेनेच्या योजनांपासून कशी मुक्तता करून घ्यायची या चिंतेत पाकिस्तान होते ! त्याचबरोबर पाकिस्तानला हेही ठाऊक होते की काश्मीर प्रश्नावर किंवा अन्य कुठल्याही प्रश्नावर भारताबरोबर आता युद्ध अटळ आहे, की ज्या युद्धाची पाकला आतून भीतीच वाटत होती. भारत सरकार पुन्हा पुन्हा जाहीर-रीत्या हेच सांगत होते की, ' काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे आणि आता पाकिस्तानबरोबर या प्रश्नावर चर्चा अशी काही राहिलेली नाही. ' फक्त युद्धाचा एकच मार्ग पाकिस्तानला मोकळा होता. पण युद्धाची तयारी तर त्यांची नव्हती. पाकिस्तात जवळ भारताबरोबर लढायची ताकद नव्हती आणि म्हणूनच पाकिस्तानने एक नवाच मार्ग शोधला. कुठल्या मार्गाने गेले पाकिस्तान ? कसे पुन्हा एकदा फसले आपले राजकीय नेते ? काय केले पाकिस्तानने ?

(क्रमशः)

**By arrangement with THACKER & CO. LTD.
from their forthcoming publication,
" HIMALAYAN BLUNDER " by Brig. J. P. Dalvi
© with the original publisher.**


दत्तप्रसाद दाभोळकर

# पिरॅमिडचे गुपित....?

'पिरॅमिडचे गुपित' या नावावरून असे दचकू नका.—हे काही बाबुराव अर्नाळकरांच्या रहस्यकथेचे किंवा ॲड. माधव कानिटकरांच्या नव्या लेखमालेचे नाव नव्हे! हा आहे एक शास्त्रीय अहवाल तसे पाहिले तर अद्यापि हा अहवाल प्रसिद्धही व्हायचा आहे; पण बहुधा या वर्षाअखेर हा अहवाल आपल्या हातात पडेल आणि हा अहवाल तयारी करण्यासाठी खर्च येणार आहे सुमारे एक कोट रुपये.

ईजिप्तचे प्राचीन पिरॅमिड्स म्हणजे पाच हजार वर्षांपूर्वीच्या मानवाच्या कर्तृत्वाचे आणि बुद्धिमत्तेचे प्रतीक. प्रथमदर्शनी एखाद्या अभेद्य किल्ल्यासारख्या वाटणाऱ्या या कबरस्तानात भव्य दालने, प्रशस्त रस्ते आणि अगणित संपत्ती साठवलेली असेल याची आपणांला काही शतकांपूर्वी कल्पनाही नव्हती. गेल्या शतकात या पिरॅमिड्सचे रहस्य समजावून घेण्याचे खूप प्रयत्न झाले. अठराशे सदतीस साली तर सुरुंगाची दारू वापरून हे पिरॅमिड्स फोडून आत जाण्याचाही प्रयत्न करण्यात आला. पण गेल्या शतकात झालेले हे प्रयत्न काही शास्त्रीय प्रयत्न नव्हेत. एखादा राजकीय प्रश्न रस्त्यावर येऊन सोडवणे जेवढे अशास्त्रीय, तेवढेच अशा घातपाती मार्गांनी पिरॅमिडचे सौंदर्य समजावून घेणेही अशास्त्रीय! पिरॅमिड्स आहेत त्या स्वरूपात कायम ठेवून त्यांची रचना समजावून घेणे हे विज्ञानाला आव्हान आहे. आणि हे आव्हान लॉरेन्स रेडिएशन लॅबोरेटरीचे डॉ. लुइस आल्वार्झ यांनी नुकतंच स्वीकारलंय.

डॉ. लुइस आल्वार्झ हे सध्या 'म्युऑन्स' प्रकाशस्रोताच्या साहाय्याने गिझाचा दुसरा पिरॅमिड (चेपरॅनचा पिरॅमिड) समजावून घेताहेत. हा म्युऑन्स प्रकाशस्रोत प्रथम चाळीस साली शोधून काढण्यात आला. 'क्ष' किरण ज्याप्रमाणे माणसाचे शरीर तपासतात तसे हे म्युऑन्स पिरॅमिडचे शरीर तपासतील. म्युऑन्स किरणांचा वेग व दिशा ते ज्या माध्यमातून प्रवास करतात त्या माध्यमाच्या विरळपणावर वा घनपणावर अवलंबून असतात. त्यामुळे पिरॅमिड्समध्ये जर पोकळी असेल तर त्या भागातून बाहेर येताना या किरणांचा वेग कमी होणार नाही. त्यांच्या मार्गातही बदल होणार नाही; पण तो भाग जर पोकळ नसेल तर त्या भागातून येताना किर-



म्युऑन्स प्रकाशझोताच्या साहाय्यान पिरॅमिडची पाहणी

णांचा वेग व दिशा बदलली जाईल. अनेक मार्गांनी म्युऑन्सच्या प्रकाशझोतात हा पिरॅमिड तपासल्यावर त्या पिरॅमिडची रचना तर समजेलच. पण बहुधा त्या पिरॅमिडमधील दालनात कोणत्या वस्तू आहेत हे सांगणेसुद्धा शक्य होईल.

डॉ. आल्वार्झ जी साधनसामग्री वापरताहेत तिचे वजन आहे सत्तर टन. आणि ही साधनसामग्री त्या पिरॅमिडमधील तळघरात ठेवलेली आहे. या सामग्रीत म्युऑन्सचा प्रकाशझोत, फुलबाज्यांची पेटी (स्पार्क चेंबर) आणि चिलखती आवरण (आर्यन बार्स) या तीन प्रमुख गोष्टींचा समावेश होतो. म्युऑन्सच्या प्रकाशझोतातून बाहेर पडलेले किरण पिरॅमिड्समधून प्रवास केल्यावर फुलबाज्यांच्या पेटीत शिरतात. ही पेटी म्हणजे एक सेंटिमीटर अंतरावर ठेवलेले दोन पत्रे आहेत. ज्या वेळी म्युऑन्स या दोन पत्र्यांमधील पोकळीमधून प्रवेश करतात त्या वेळी मोठ्या विद्युतशक्तीची निर्मिती होते. ही विद्युतशक्ती ठिणग्यांच्या स्वरूपात या पोकळीमधून प्रवास करते. त्यामुळे साध्या डोळ्यांनीही आपणांला म्युऑन्सचा मार्ग दिसू शकतो. त्याच वेळी चारी बाजूंनी लावलेले कॅमेरे या ठिणग्यांच्या मार्गांचा फोटो घेतात. पण आल्वार्झ यांनी ही पद्धत नुकतीच बदलली आहे. त्यांनी आता हे पत्रे एक फूट अंतरावर ठेवलेत. त्यामुळे ठिणग्या वगैरे न उडता फक्त विद्युत प्रवाहच या पोकळीमधून प्रवास करतो. बाजूला लावलेल्या आलेख पत्रिकेवर या किरणांच्या मार्गांचा आलेख काढला जातो. या फुलबाज्यांच्या पेटीतून बाहेर पडणारे म्युऑन्स मग चिलखती आवरणावर जाऊन थडकतात. हे चिलखती आवरण पाच फूट जाडीच्या पोलादी पट्टीचे बनवलेले आहे. या पाच फूट जाडीच्या पोलादी पट्टीच्या डाव्या बाजूला म्युऑन्सची गती मोजणारे यंत्र बसवलेले आहे. दुसऱ्या बाजूने या चिलखतात शिरणारे म्युऑन्स किरण यंत्रापर्यंत येईतो

स्वतःचा वेग खूप कमी करतात. आणि मग यंत्राला, पिरॅमिडच्या निरनिराळ्या विभागांतून आलेल्या म्युऑन्सचा सापेक्ष वेग मोजणे खूप सोपे जाते. अशाप्रकारे आलेखन पत्रांनी नोंदवलेली दिशा व चिलखती आवरणांनी मोजलेला वेग विमानाने दररोज कैरो वा न्यूयॉर्कला पाठवून संगणकांकडून त्याचे पृथःकरण केले जाते.

हे काम सुरू केल्यापासून डॉ. आल्वार्झ यांच्या कामात खूप अडथळे आले. पहिली अडचण पैशाची होती. नंतर अरब-इस्रायल युद्धात तर हे काम बंद करावयाचीच पाळी आली होती. पण आता मात्र सर्व अडथळे दूर होऊन या कामाला चांगला वेग आलाय. डॉ. आल्वार्झ म्हणतात, " माझे काम नक्की पुरे होईल. कारण मी काही फक्त या पिरॅमिडस्ना समजावून घेत नाही तर गेल्या पाच हजार वर्षांत विज्ञानाने काय प्रगती केली आहे, हे या जुन्यापुराण्या वास्तूंना समजावून देतोय ! "

## आपल्याला विज्ञानयुगात जगायचंय.......

गेल्या आठवड्यात अचानकपणे खूप दिवसांनी टिंगोजीराव कुरकुरे भेटले. आम्ही मित्र त्या वेळी इराण्याच्या हॉटेलात बसून गप्पा छाटत होतो. शंकराचार्यांचा निषेध, चातुर्वर्ण्यप्रशस्ती करणाऱ्यांच्या विरुद्ध मोर्चे, यज्ञसंस्थेवर बंदी, या साऱ्या गोष्टी विज्ञानयुगासाठी कशा आवश्यक आहेत हे आम्ही चहा घेत एकमेकांना पटवून देत होतो. आमच्या गप्पा मोठ्या रंगात आल्या होत्या, पण खूप दिवसांनी आमच्यात आलेल्या टिंगोजीरावांनी या साऱ्याचा बेरंग केला. ते म्हणाले, " आपल्याला विज्ञानयुगात जगायचंय हे खरं. जी गोष्ट आधुनिक विज्ञानाच्या दृष्टीनं समाजाला घातुक आहे तिचं उच्चाटन पण झालं पाहिजे. पण तुमच्या या मार्गांनी ही गोष्ट साध्य न होता फक्त कटुता वाढते आहे. उपवासानं ज्याप्रमाणं समोरच्या माणसाचं हृदयपरिवर्तन होत नाही, त्याचप्रमाणं निषेध आणि मोर्चे यांनी समाजपरिवर्तन साधलं जात नाही. जर तुम्हांला खरोखर समाजपरिवर्तन करावयाचं असेल तर एक सोपा मार्ग दाखवतो. जरा माझ्याबरोबर बाहेर चला. "

आम्ही मित्र जरा कुरकुरतच टिंगोजीरावांच्या बरोबर बाहेर पडलो. टिंगोजीराव आम्हांला घेऊन भोलानाथ बैलाचा खेळ चालला होता तिथे आले. एक माणूस एका देखण्या बैलाचा खेळ तेथे करून दाखवीत होता. अनेक अशिक्षित आणि सुशिक्षित लोक बैलाभोवती गर्दीने उभे होते. तो बैल नावावरून माणसे ओळखत होता. तुमच्या मनातील प्रश्नाचे दैवी उत्तर तुमच्या हाताला स्पर्श करून देत होता. प्रश्न विचारणारा माणूस भाविकतेने व्याकुळ, हळव्या मनःस्थितीत ते उत्तर स्वीकारीत होता.–अगदी सर्वार्थाने त्या जमावावर बैलाचे राज्य सुरू होते ! टिंगोजीराव आम्हांला म्हणाले, " हा माणूस खूप मेहनती आहे. या बैलालाही त्यानं खूप चांगल्या प्रकारं शिक्षण दिलंय. नुसत्या नजरेच्या इशाऱ्यावरून वा मालकाच्या निरनिराळ्या

आवाजांवरून हा बैल हालचाली करतोय; याच काय पण कोणत्याही बैलाच्या अंगी काही दैवी शक्ती असणं शक्य नाही. या मालकाला वा गर्दीतील माणसाला ज्या प्रश्नाचं उत्तर माहीत नाही त्या प्रश्नाचं उत्तर हा बैल देऊच शकणार नाही."

त्यानंतर टिंगोजीरावांच्या सांगण्याप्रमाणे आम्ही एक मजेशीर प्रयोग केला. आम्ही प्रत्येकाने एका हातात एक रुपया घेतला आणि आमचे दोन्ही हात पुढे करून आम्ही मित्र गर्दीत उभे राहिलो. त्यानंतर कुरकुरे यांनी भोलानाथच्या मालकाला सांगितले, "तुझ्या या बैलानं प्रत्येकाच्या कोणत्या हातात रुपया आहे हे ओळखलं तर तो खरा दैवी बैल !" आणि आमच्या या प्रश्नाचे उत्तर देताना निम्म्या वेळा भोलानाथ बैल चुकला. सरासरीच्या नियमाप्रमाणे तो निम्म्या वेळा बरोबर येणे पण बरोबर होते. त्यानंतर काही वेळ कुरकुरे त्या गर्दीचे हिरो झाले होते. त्यांनी साऱ्या लोकांना एक भाषणच दिले. ते म्हणाले, "हा चांगला शिकवलेला बैल आहे. त्याबद्दल त्याच्या मालकाला जरूर पैसे द्या. वेळ घालवायला करमणूक म्हणून हा खेळही चांगला आहे. पण याच्यात काही दैवी शक्ती आहे, असा भ्रम करून घेऊ नका."

घरी परत येताना टिंगोजीराव म्हणाले, "तुम्हांला जर अंधश्रद्धा, वेडगळ समजुती नाहीशा करावयाच्या असतील तर अशा अनेक गोष्टी मी तुम्हांला शिकवीन निषेध मोर्चे काढून नव्हे, तर प्रत्यक्ष प्रमाणाने स्वतःभोवतालच्या छोट्या जनसमुदायाला तुम्ही त्यातून विज्ञाननिष्ठ बनून शकाल. लवकरच आम्ही कुरकुरे यांच्याबरोबर हाजीमलंगला जाणार आहोत. नुसत्या बोटाने दगड उचलणे ही एक शुद्ध शास्त्रीय कसरत आहे हे तिथल्या मौलवींना टिंगोजीराव तेव्हा पटवून देणार आहेत.

# कलिंग पारितोषिकाच्या निमित्ताने....

बावीस फेब्रुवारीला प्रा. फ्रेड हॉइल या त्रेपन्न वर्षांच्या प्रख्यात शास्त्रीय लेखकाने दिल्लीला कलिंग पारितोषिक स्वीकारले. या पारितोषिकाची कल्पना मूळ बिजू पटनाईक यांची. विज्ञान लोकप्रिय करण्यासाठी सातत्याने लिखाण करणाऱ्या लेखकाला हे बक्षीस देण्यासाठी त्यांनी एक भली मोठी रक्कम युनेस्कोच्या स्वाधीन केलेली आहे.

प्रा. डॉ. फ्रेड हॉइल हे एक खंदे वक्ते आणि नावाजलेले लेखक आहेत. कॉस्मिक किरणांनी जगाचा नाश होईल या कल्पनेवर डॉ. हॉइल यांनी लिहिलेल्या शास्त्रीय कादंबरीने ब्रिटनमध्ये खपाचा उच्चांक गाठला. ही कादंबरी त्यांनी एवढ्या सोप्या भाषेत लिहिली आहे, की या लेखकाला विज्ञानातील काही माहीत नाही, हा

उगाच विज्ञान विषयात लुडबूड करतोय म्हणून टीकाकारांनी तेव्हा टीका केली होती !

भारतभेटीच्या वेळी डॉ. हॉइल यांनी मुंबईत घेतलेली वृत्तपत्र परिषद खूप गाजली डॉ. हॉइल इतक्या सहजपणे वृत्तपत्र प्रतिनिधींना टोलवत होते, की राजकारणी पुरुषांनी त्यांची शिकवणी ठेवावी. जयंत नारळीकर आणि त्रिलोकसिंग या दोन विद्यार्थ्यांचे त्यांनी खूप कौतुक केले. नारळीकरांच्यासमवेत त्यांनी मांडलेला 'स्थिर विश्वाचा सिद्धांत 'आतापर्यंत सहा कसोट्यांना उतरलाय आणि सध्या सुरू असलेल्या सातव्या कसोटीला तो सहज उतरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. 'स्फोटित विश्वाच्या सिद्धांता'ची तर त्यांनी चक्क चेष्टा केली. त्यानंतर प्रो. हॉइल रशिया आणि अमेरिकेवर घसरले. अंतराळ भ्रमणावर होणाऱ्या अफाट खर्चातून मूलभूत संशोधन साधले जात नाही, काही फारसा फायदा होत नाही, ही श्रीमंत राष्ट्रांची करमणूक आहे, असे मत त्यांनी मांडले. हा पैसा जर मूलभूत स्वरूपाचे खगोल-शास्त्रविषयक संशोधन करण्यात खर्च झाला तर विश्वाचे कोडे लवकर सुटेल म्हणून त्यांनी आवर्जून सांगितले. मुलाखतीच्या शेवटी भारतीय खगोलशास्त्राची थोर परंपरा सांगून तिचे ऋण त्यांनी मान्य केले.

या वृत्तपत्र परिषदेच्या वेळी एक गोष्ट राहून राहून जाणवली. कलिंग पारि-तोषिकाची पद्धत आता थोडी बदलली पाहिजे. विज्ञान लोकप्रिय करण्यासाठी झटणारा लेखक भारतात येऊन नुसते बक्षीस घेऊन परत जातो हे बरे नाही. त्यात आपला फायदा नाही. त्या लेखकाला पण हे फारसे आवडत नसावे. हे बक्षीस स्वीकारण्या-पूर्वी त्या लेखकाला एखादी सरस व्याख्यानमाला गुंफण्यास सांगावे. ती व्याख्याने सर्व भारतीय भाषांतून प्रकाशित करण्याची पण सोय व्हावी. किमानपक्षी आकाश-वाणीवरून सर्व प्रादेशिक भाषांत ती भाषणे प्रक्षेपित करावीत. सरकार ही गोष्ट केव्हा करणार असेल तेव्हा करो. तूर्तास विज्ञानेश्वरी मात्र हे काम करणार आहे. परवाच्या भारतभेटीत डॉ. हॉइल यांनी भारतीय खगोलशास्त्रावर एक भाषण दिले. मध्यंतरी डॉ. चंद्रशेखर यांनी पण भारतीय खगोलशास्त्रावर एक भाषण दिले. या दोन भाषणांच्या आधारावर लिहिलेला 'भारतीय खगोलशास्त्र' हा लेख एप्रिल महिन्यात विज्ञानेश्वरी सादर करणार आहे. त्या लेखाचे लेखक आहेत गेल्या वर्षी उत्कृष्ट शास्त्रीय पुस्तकाबद्दल, महाराष्ट्र सरकारचे प्रथम पारितोषिक मिळवणारे प्राचार्य डॉ. चंद्रकांत तळपदे. ○



# अनुपमा

सुधीर दामले

मराठी चित्रसृष्टीची पीछेहाट, प्रेक्षकांना त्याबद्दल वाटणारी अनास्था, याची जी काही अनेक कारणे आहेत त्यांतले प्रमुख कारण म्हणजे नव्या कलाकारांचे दुर्भिक्ष्य ! हिंदी चित्र-सृष्टीत ४–२ महिन्यांनी का होईना एखादा तरी नवा प्रमुख कलाकार पडद्यावर दिसत असतो. पण मराठीत काय ? चेहरे वर्षानुवर्षे तेच. नव्या कलाकारांची चणचण ही आजच्या मराठी चित्ररसिकांची फार मोठी व्यथा आहे.

पण अशा व्यथित प्रेक्षकांना जिंकून घेणारी एक गुणवान, आकर्षक रूपसंपदा लाभलेली आणि मुख्य म्हणजे नायिका म्हणून शंभर टक्के शोभून दिसेल अशी एक कलावती अलीकडे उदयाला आली आहे. तिचे खरे नाव रेखा कुलकर्णी असले तरी व्यावसायिकांनी दिलेले नाव आहे अनुपमा ! 'घरची राणी' हा तिचा पहिलाच चित्रपट यंदाच्या वर्षीचा सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला गेला आहे. त्यातली अनुपमाची कामगिरी नजरेत भरावी अशीच आहे. या 'घरची राणी'मध्ये तिने प्रेमळ, लाघवी,

कर्तबगार आणि विलक्षण स्वाभिमानी इनामदार पत्नी अशा थाटात अन् रुबाबात उभी केली आहे, की हे तिचे पहिलेच चित्र असे सांगूनही खरे वाटणार नाही. नव्या कलाकाराचा बावरलेपणा तर मुळीच आढळत नाही. सहजसंपन्न अभिनयाप्रमाणे या चित्रात अनुपमाचे आढळून येणारे सर्वांत मोठे वैशिष्टय म्हणजे तिचे बोलणे मोठे गोड अन् लाघवी आहे. यात आणखी अभिनयाची भर पडते ती वेगळीच !!

एका सुसंस्कृत, कलाप्रेमी, मध्यमवर्गीय कुटुंबात रेखाचा जन्म झाला. या कला-क्षेत्रात रेखा काही आशाआकांक्षा ठेवून प्रवेश करू इच्छिते असे तिच्या आई-वडिलांना कळायचा अवकाश, त्यांनी तिला मोठया आनंदाने संमती दिली; एवढच नाही तर मॅट्रिकनंतर तिने पुढे शिकलेच पाहिजे, असाही आग्रह धरला नाही. सुदै-वाने आपल्या आईवडिलांनी घेतलेला निर्णय योग्य होता असे वाटायला लावण्याचे सामर्थ्य, तेवढी जिद्द रेखामध्ये निश्चित आहे.

आज जरी रेखा चित्रपटांतून कामे करीत असली तरी मूळची ती नाटकातलीच. कै. मीना पेठे यांनी सादर केलेल्या 'वासवदत्ता' मध्ये तिने एक दुय्यम भूमिका केली होती. त्या नाटकावर सर्व टीकाकारांनी जबर झोड उठविली असली तरी रेखाच्या छोटया भूमिकेची साऱ्यांनीच आवर्जून प्रशंसा केली होती. एरवीच्या जीव-नात रेखा जशी अवखळ, अल्लड आहे तशीच ही भूमिका असल्याने त्यात मोठी गंमत आली होती.

'वासवदत्ता' कधी बंद पडले कुणाला कळलेदेखील नाही. तरी रेखाचे नाव मात्र नाटयव्यावसायिकांना चांगलेच लक्षात होते. याचा प्रत्यक्ष मधुसूदन कालेल-करांनी तिला जेव्हा 'आसावरी' या त्यांच्या नव्या नाटकात काम दिले तेव्हा आला. अनुपमा हे नवे नाव तिला या नाटकाच्या वेळीच देण्यात आले. या नाटकातील रेखाची भूमिका तशी अवघड, आरंभी लाडिक अन् खेळकर असणारी. ही सुमन विवाहानंतर जबाबदारी अंगावर आल्याने गंभीर बनते. ही भूमिका रेखा मोठया ताकदीने वठवीत असे. पुण्या-मुंबईत या नाटकाचे कौतुक झाले नसले तरी महा-राष्ट्रातील अनेक प्रमुख शहरी त्याचे मोठया धुमधडाक्याने प्रयोग झाले. त्याचा रेखाला एक मोठा फायदा झाला, तिला भिन्नभिन्न अभिरुचीचे प्रेक्षक अजमावयाला मिळाले. कामातील दडपण, बुजरेपणा साफ नष्ट झाला. रेखाच्या आजच्या यशात 'आसावरी'चा फार मोठा वाटा आहे हे विसरून चालणार नाही.

या 'आसावरी'मुळेच रेखाला चित्रसृष्टीचे द्वारही खुले झाले. 'घरची राणी'चे दिग्दर्शक राजदत्त नव्या अभिनेत्रीच्या शोधात होते. त्यांना रेखा दिसली, तिच्या अभिनयाचे सामर्थ्य त्यांच्या ध्यानात आले आणि त्यांनी 'घरची राणी'ची हिरॉईन म्हणून तिची निवडही करून टाकली. त्यांची ही निवड कशी योग्य होती, हे 'घरची राणी' पाहिलेल्या प्रेक्षकांना सहज कळून येईल. राजदत्तांनीच अनुपमा आणि भालजी पेंढारकरांचा परिचय घडवून आणला; आणि भालजींनी तिला त्यांच्या

'तांबडी माती' या चित्राची नायिका म्हणून निवडले. अलीकडेच हे चित्र पूर्ण झाले असून लवकरच ते प्रसिद्ध होईल. याखेरीज माधव शिंदे दिग्दर्शित 'धर्मकन्या', कृष्णा पाटील दिग्दर्शित 'एक माती अनेक नाती' ह्या दोनही चित्रांत अनुपमाला प्रमुख भूमिका असून चालू वर्षी ही तीनही मराठी चित्रे प्रसिद्ध होतील. मराठी-प्रमाणेच हिंदीतही तिने नाव कमवण्याची जिद्द बाळगली असून 'एक अकेला' या चित्रात तिला एका मुक्या मुलीची भूमिका असून, शांतारामबापूंनी 'जलबिना मछली' या त्यांच्या आगामी हिंदी चित्रात तिला भूमिका देण्याचे नक्की केले आहे. शांतारामबापूंसारख्या नामवंत, कीर्तिवंत दिग्दर्शकाच्या हाताखाली तिला काम मिळावे ही तिच्या दृष्टीने मोठी भाग्याची गोष्ट!

हा झाला रेखाच्या व्यावसायिक जीवनाचा आढावा, खरेतर लिहायला पाहिजे ते एरव्हीच्या जीवनात ती कशी वागते-बोलते याबद्दलच! टपोऱ्या डोळ्यांची, गोऱ्या वर्णाची, ठेंगणी पण चुणचुणीत अन् विलक्षण बोलघेवडी रेखा अल्पावधीतच दुसऱ्यावर छाप टाकते. बोलण्या-वागण्यातील उत्साह तर काय विचारू नका, एखादी गोष्ट अथवा कुणाचे वर्णन करून ती सांगायला लागली ना, तर साऱ्या गोष्टी साभिनय, अत्यंत मनमोकळेपणाने सांगते. साहजिकच ऐकणारा अगदी रंगून जातो. भालजी पेंढारकरांबरोबर तिच्या प्रथमभेटीचा प्रसंग तिने अशाच ढंगाने मोठा रंगवून सांगितला.

भालजींनी तिला कोल्हापूरला भेटायला बोलाविले. ती त्यांना प्रथमच पाहणार होती. फक्त त्यापूर्वी त्यांचे नाव, कीर्ती ऐकलेली, पण भेटीचा योग काही आला नव्हता. काहीशा अस्वस्थ, अधिऱ्या मनाने ती कोल्हापूरला गेली. वाटेत भालजी कसे असतील, कसे वागतील याचे एक चित्र कल्पनेने तिने रंगविले होते. ती म्हणते, "त्यांच्याबद्दल कल्पना करताना वाटलं होतं ते उंच गोरेपान असतील, वागायला तर प्रेमळ असणारच, पण माझ्यासारखी या व्यवसायात नव्याने प्रवेश करू इच्छिणारी मुलगी प्रथमच भेटणार तेव्हा तर ते माझे खूप कौतुक करतील, प्रोत्साहन देतील. असा काहीसा विचार करीतच मी खोलीत प्रवेश केला. समोर दिसलेले भालजी कसे होते; ते विलक्षण करडया शिस्तीचे, करारी अन् बरेचसे गंभीर वाटले. प्रथमदर्शनी ते रागीटही वाटले. शिवाय उंच तर नव्हतेच, पण गोरेपानही वाटले नाहीत. आणि गंमत अशी की मला त्यांनी प्रथमच जो प्रश्न विचारला तो ऐकून तर मी गारच झाले. ते म्हणाले, 'तुम्ही इथं का आलात?'. आहे की नाही गोंधळात टाकणारा प्रश्न? मी साफ गोंधळून गेले पण काही क्षणच वरं का. त्यांना उत्तर दिलं, 'आपणच बोलावलंत म्हणून तर आले!' 'ठीक आहे. सिनेमात काम करायचंय?' दुसरा प्रश्न, मी उत्तर केले, 'होऽ तुम्ही दिलंत तर करीन!' 'पण हेतू काय? कशासाठी काम करणार?' तिसरा प्रश्न. मी म्हणाले, 'आपल्याकडून शिकायला मिळावं अशी फार इच्छा आहे, पण तो योग

आणणं केवळ आपल्याच हाती आहे.' 'ठीक आहे तुम्ही जाऊ शकता!' अन् काय? मी बाहेर आले. मुलाखत एवढ्यावरच पार पडली. माझे मन मला सांगत होते 'मी नापास झाले म्हणून!' पण नंतर जेव्हा कळले की बाबांनी माझी निवड केली तेव्हा प्रथम धक्का तर बसलाच पण नंतर मी आनंदाने अक्षरशः नाचले. माझे एक स्वप्न पूर्ण झाले.

प्रथमभेटीत बाबा जरी काहीसे करडे, तुटके वाटले तरी सेटवर जाऊ लागताच' त्यांचा अधिक परिचय घडला. ते एक आदर्श दिग्दर्शक तर आहेतच, पण त्यांच्य हाताखाली काम करायला मिळणे हाही एक आनंद आहे. कलाकाराला एखादी गोष्ट समजवावी कशी, तो विशिष्ट प्रसंग त्याच्याकडून बरोबर कसा करून घ्यावा ते त्यांना फारच चांगल्या तऱ्हेने अवगत आहे.

'तांबडी माती' मध्ये मला एका पाटील कन्येची भूमिका आहे. सर्वस्वी ग्रामीण ढंग, मुंबईत राहणाऱ्या मला ते वातावरण सर्वस्वी अनोळखी होते. नऊवारी लुगडे नेमून सहजतेने वावरावे कसे, शेणाने घराच्या भिंती, जमीन कशी सारवावी म्हशीची धार कशी काढावी, काही काही म्हणून माहीत नव्हते. पण साऱ्या गोष्टींत' बाबांनी मला अल्पावधीत तयार केले. माझ्यातला अवघडलेपणा सहज नष्ट झाला.

कलाकाराने आपल्या बोलण्यातून आपली व्यक्तिरेखा कशी साकार करावी याचे ते देत असलेले शिक्षण तर वर्णनातीत आहे. या चित्रात मला एक वाक्य आहे. 'काय हणमा, लाडू संपल का न्हाई!' वरवर दिसायला वाक्य साधं, सरळ वाटल, पण या वाक्यातून त्या मुलीचा निष्पाप, भाबडा स्वभाव व्यक्त व्हायला पाहिजे होता. ते मला काही प्रथमच जमत नव्हते. बाबांनी शिकवल्यावर मला त्या वाक्याचे सौंदर्य कितीतरी पटीने वाढल्याचे तर लक्षात आलेच पण जरूर ते कार्यही त्यातून साधत आहे हे कळले. बाबांच्या हाताखाली काम करायला मिळणे ही खरोखर भाग्याचीच गोष्ट, कलाकाराचे सोने होते.

रेखाने भालजींची वैशिष्ट्ये अशा काही रंजकपणे, श्रद्धेने सांगितली की ती या एकाच चित्रामुळे बाबांची भक्त बनली आहे, हे कळून आले.

अभिनयक्षेत्रात भालजींनी रेखाला खूपच शिकविले असले तरी राजदत्त, माधव शिंदे या दोघांच्या मार्गदर्शनाचाही ती अत्यादराने उल्लेख करते. अर्थात अजूनही आपल्याला बरेच शिकायचे आहे असे ती मानते हेमुद्धा काही कमी नाही.

अशी आहे अनुपमा. चित्रसृष्टीत नाव मिळवायला लागणाऱ्या गोष्टींची अनुकूलता तिच्याजवळ आहे. सहजसंपन्न अभिनय, गोड रूप, लाघवी बोलणे, मुख्य म्हणजे कोवळ वय आहे आणखी काय पाहिजे? तिच्याबद्दल आणखी अपेक्षा आहेत त्या केवळ यामुळेच! पाहूया ती त्या किती प्रमाणांत पूर्ण करते.

O

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

**मेष :** सध्याची ग्रहस्थिती फारशी चांगली नसूनही तुमची पावले प्रगतीकडेच पडत आहेत, यातच तुमच्या ज्वलंत निष्ठेचे जगाला दर्शन घडते. तुमच्यातील अभिजात कर्तृत्वाला याच वेळी उत्थान मिळेल.

प्रयत्नांची शिकस्त करून तुम्ही अपेक्षित यश मिळवू शकाल. नोकरीधंद्यात, शैक्षणिक क्षेत्रात, कलाव्यवसायात सहसा माघार घेण्याचा प्रसंग येऊ नये, याचा अर्थ हा निर्भेळ सुखाचा काल आहे, असे नव्हे. मानसिक व्यथा, अनारोग्य अधून मधून अनुभवावे लागेल.

सामाजिक व राजकीय धमालीत सहसा पाऊल टाकू नका, अधिक काळजी घ्या संघर्षाची.

दि. १५ ते १७ हे दिवस अपेक्षित यश देणारे आहेत.

**वृषभ :** मंगळाचा विरोध उत्तरोत्तर तीव्रपणाने जाणवू लागेल, त्यातून साडेसातीचा प्रारंभ. अशा काली कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी दहा वेळा तरी विचार करायला हवा. भावनेला आवाहन करण्याचा हा काळच नव्हे.

प्रामुख्याने व्यापारधंद्यात मतभेद वाढू लागतील, कौटुंबिक संघर्ष निर्माण होऊ लागतील. मिळते जुळते घेण्यावाचून गत्यंतर नाही.

नको त्या ठिकाणी बदली होण्याचा संभव दिसू लागेल. कितीही नम्रता धारण केलीत तरी वरिष्ठ काहीसे नाराजच बनू लागतील.

कला-साहित्याच्या प्रांतातील प्रगतीच्या संधी हुकतील की काय, असे वाटू लागेल.

दि. १७ ते १९ एवढाच काल अपेक्षित यशाचा जाणवेल.

**मिथुन :** सध्याचे आपले ग्रहमान तसे वाईट नसतानाही मनाला अकारण उद्विग्नता जाणवत असते, याला कारण ग्रहस्थितीपेक्षा सभोवतालची परिस्थितीच कारणीभूत आहे, असे म्हणावे लागते. आहे त्या परिस्थितीत मिळते जुळते घेणे हाच एक या अस्वास्थ्यावर उपाय आहे.

नोकरीधंद्याच्या दृष्टीने स्थानांतर घडेल, राहती जागा बदलावी असे वाटू लागेल. कुणाचे तरी सहकार्य घेतल्याशिवाय निभाव लागणार नाही, अशी जाणीव प्रकर्षाने होऊ लागेल.

साहित्य, वृत्तपत्रव्यवसाय, ग्रंथप्रकाशन अशा क्षेत्रांत तुमचे स्थान निश्चितच

## श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## दि. १५ ते २१ मार्चचे राशिभविष्य

उंचावेल. शिकस्तीचा प्रयत्न केलात तर अपयश येणार नाही.

दि. १६–१७–२०–२१ हे दिवस प्रगतीला पोषक असे आहेत.

**कर्क :** तुमचा अनिष्ट काल केव्हाच ओसरला. उलट, तुमच्या अपेक्षा बऱ्याच प्रमाणात सफल होऊ शकतील याच काळात. तुमची आणि तुमच्या कुटुंबियांचीही परिस्थिती वेगाने सुधारू लागेल. नोकरीधंद्यासाठी केलेले प्रयत्न यशस्वी ठरण्याची लक्षणे दिसू लागतील.

शेती, धान्योत्पादन, द्रव पदार्थ आणि परराष्ट्रीय व्यवहार यांत आपण बरीच प्रगती दाखवू शकाल.

राजकीय सहकार्य आणि सामाजिक सहानुभूती लाभेल आणि त्यामुळेच आजवरचे आपले सारे प्रयत्न आकार घेऊ लागतील.

प्रतिभेचा उन्मेष बहरेल, नव्या कल्पना आकार घेऊ लागतील. कौटुंबिक कार्ये यशस्वी ठरतील.

दि. १८ ते २० बऱ्याचशा गोष्टी यशस्वी होतील.

**सिंह :** इतर ग्रहयोग कितीही अनुकूल असले तरी मंगळाच्या सहानुभूतीची आपणांस नितांत गरज भासते आणि तीच नेमकी न लाभल्याने तुमचे सांसारिक व व्यावसायिक वातावरण काहीसे दूषित बनू लागलेले आहे, ते काही दिवस सहन करण्यावाचून गत्यंतर नाही.

वाढत्या खर्चाचा लोंढा थोपविणे अशक्य होऊ लागेल, शिकस्तीचा प्रयत्न करूनही प्राप्तीत सुधारणा होण्याची शक्यता दिसेनाशी होईल.

अशाही परिस्थितीत तुम्हा सिंहराशी व्यक्तींना कशातही माघार घेण्याचा प्रसंग येणार नाही. ऐन अडचणीच्या प्रसंगी अनेकांच्या मदतीचे हात पुढे होतील.

दि. २०–२१ पासून सर्वत्र आशादायक वातावरण दिसू लागेल.

**कन्या :** आपल्या जीवनातील हा एक पर्वकाल सुरू होत आहे. गुरूचे माहात्म्य आणि मंगळाचे कर्तृत्व तुमच्या वाटयास आलेले असल्याने, या वेळी तुम्ही कुठेही गेलात तरी तिथे तुमचा मानसन्मान घडेल.

नोकरीधंद्यात पुढचे पाऊल पडेल, यांत्रिक–वैद्यकीय व्यवसायांत तर तुम्हांला प्रतिस्पर्धीच उरणार नाही. या वेळेचे माहात्म्यच असे आहे की, आपण सहज काही कार्य करायचे ठरवलेत तर ते अपेक्षेबाहेर यश घेऊन उठेल.

औद्योगिक क्षेत्रात क्रांती घडवून आणाल. सामाजिक क्षेत्रात प्रतिष्ठेचे स्थान संपादू शकाल. स्थावराचा प्रश्न तर सहजपणे सोडवू शकाल.

दि. १७ ते २० अपेक्षित यश लाभेल.

**तूळ** : धनस्थानी मंगळ आणि व्ययस्थानी गुरू ही ग्रहस्थिती सांपत्तिक ताण वाढविल्याशिवाय कशी राहील ? प्रगती होण्याची आशाच नाही, अधोगती झाली नाही म्हणजे मिळविली !

वैद्यांची बिले वाढू लागतील, व्यावसायिक पेचप्रसंग निर्माण व्हायला लागतील. चातुर्याने आणि निर्धाराने अशा प्रसंगामधूनही आपण मार्ग काढू शकाल.

सामाजिक–राजकीय क्षेत्रांतील फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलू नका. दूरच्या प्रवासाचे व मंगलकार्याचे काहीसे पुढेच ढकला. उद्योगधंद्याचे तंत्र थोडेफार बदलले तरच निभाव लागेल.

दि. १८ ते २० अल्पसे यश पदरी पडावे.

**वृश्चिक** : तुमच्या राशीतील मंगळाचे वास्तव्य अपयशाचे निश्चित जाणवणार नाही, पण अस्वास्थ्याचे मात्र जाणवेल. व्यवसायधंद्यात मतभेदाचे वादळ उठेल, कौटुंबिक वातावरण अप्रसन्न बनेल. सांपत्तिक बाजू चांगली असूनसुद्धा अनवश्यक खर्चाला काही ताळतंत्रच राहणार नाही.

असे असूनही हा काल आपणांस प्रगतीचाच जाणवेल. कलाक्षेत्रात नवे करार-मदार होतील, साहित्याच्या प्रांतात मानसन्मान होऊ लागेल.

हे दिवस दूरच्या प्रवासाला मात्र ठीक नाहीत. वाहन कोणत्याही क्षणी रुसेल. प्रकृतीही ऐन मोक्याच्या प्रसंगी बिघडेल.

नवे स्नेहसंबंध जुळून येतील. मंगलकार्यात अंदाजाबाहेर खर्च वाढू लागेल, इष्ट-मित्र क्षुल्लकशा कारणावरूनही नाराज बनू लागतील.

दि. १९ ते २१ अनुकूल काल.

**धनू** : तुमच्या सहनशीलतेचा आणि कर्तव्यनिष्ठेचा कस पाहणारा हा काल आहे. बाराव्या मंगळाने तुमच्यावर चौफेर हल्ला चढविलेला दिसतोय. पैसा, प्रतिष्ठा आणि प्रज्ञा या सर्वांवर या वेळी थोडाफार अनिष्ट परिणाम जाणवायला लागेल,

यासाठी या वेळी आपणांस वाटेल तसे वागून भागणार नाही. नोकरीधंद्यात तर सारे व्यवहार डोळ्यांत तेल घालून पाहायला हवेत. सारे कर्तृत्व पणाला लावून कार्यक्षेत्रात उतरलात तरच काहीसे यश आपणांस पदरात पडून घेता येईल.

दि. १९ ते २१ अनुकूल दिवस.

**मकर** : चौथ्या शनीबद्दल सध्या विचार करण्याचीही गरज नाही. गुरू भाग्यात, मंगळ एकादशात. ते तुम्हांला हवे ते आणि हवे तितके देऊ शकतील.

आपल्या अंगीकृत कार्यात तर या वेळी आपण आवाज उठवाल. सांपत्तिक लाभ अपेक्षेबाहेर होईल, प्रगतीच्या अनेक पायऱ्या ओलांडून पुढे जाल.

यांत्रिक व्यवहारधंद्याचा व्याप आणि विस्तार खूपच वाढवाल. तुमच्या जीवनातील हा एक चिरंतन स्मृतीचा काल आहे. धार्मिक हेतूने प्रवास घडेल, सामाजिक–सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घ्याल.

दि. १९ ते २१ आशादायक काल.

**कुंभ** : साडेसाती संपली. मंगळ हवा तसा आलेला. तुमची प्रगती वेगवान बनायला यापेक्षा अधिक चांगली ग्रहस्थिती दुसरी कोणती ?

राजकीय क्षेत्रात सतत आघाडीवर राहाल. सामाजिक क्षेत्रात तर तुमच्याविना पान हालेनासे होईल.

आठव्या गुरूमुळे अपेक्षित लाभ होणार नाही तरी तुमचे कुठेच नडणार नाही.

वैज्ञानिक–संशोधन क्षेत्रात तर तुमचा दबदबा खूपच वाढेल. आता तुम्हांला हवे तसे वातावरण निर्माण करायला संधी मिळत आहे तिचा भरपूर उपयोग करून घ्या. नोकरीत तर आणखी एक पाऊल पुढे पडेल.

दि. २० ते २१ पासून तुमच्या कार्याला अधिक चालना मिळू लागेल.

**मीन** : या वेळी आपणांस गुरु–मंगळांचे हार्दिक सहकार्य सतत मिळत राहिल्याने, तुमच्या अंगीकृत कार्यात आपण अपेक्षेबाहेर यश सहजासहजी मिळवाल. कित्येक महिन्यांनंतर तुम्हांला ही संधी लाभत आहे.

साहित्य, नाट्य, चित्रपटक्षेत्रांत आकर्षक करारमदार व्हायला लागतील. व्यवसायानिमित्ताने दूरचा प्रवास घडेल. तुमची लोकप्रियता कळसाला पोचेल.

धनस्थानातील शनीमुळे सांपत्तिक लाभ माफकच होईल; पण प्रतिष्ठा मात्र अमाप लाभेल.

उद्योगधंद्याचे नवे क्षेत्र हस्तगत होईल, मंगलकार्याचे जवळ जवळ निश्चित ठरेल.

दि. १० ते १९ विशेष अनुकूल काळ.


लिटक्विझ
क्र. ४७
रु. ५०,०००
१५ भाषेंत
१७५ एजन्टस
२५५ पत्रांत जाहिरात
प्रवेश पत्रिका रविवारच्या नवशक्तित पहा
*लिटक्विझ विकली मोफत मागवा*
लिटक्विझ प्रायव्हेट लिमिटेड मुंबई-७

## मुंबई समाचार

पृष्ठ ६ वरून

परंतु युरोपची एकी घडून येईल का हा प्रश्न आजही कायम आहे. जनरल द गॉल आहेत तोपर्यंत ब्रिटनबरोबर फ्रान्सचे पूर्ववत संबंध प्रस्थापित होतील हे कठीण दिसते ! अमेरिकेचे राजकीय-आर्थिक वर्चस्व झुगारून देऊन, फ्रान्स, प. जर्मनी, ब्रिटन व इटली ह्या चौघांच्या नेतृत्वाखाली सर्व युरोपची आघाडी द गॉलना हवी असल्याचे नुकतेच जाहीर झाले आहे. ह्या आघाडीने व्यापार, संरक्षण वगैरे प्रश्न सामायिकरीत्या हाताळावेत असे त्यांना वाटते. युरोपची एकी, स्वतःच्याच अटींवर द गॉलना हवी आहे. पण ब्रिटन, बेल्जियमसारखी राष्ट्रे अमेरिकन मैत्रीला घटस्फोट देऊ शकतील व 'नाटो' समूळ उखडून टाकायला राजी होतीलशी वाटत नाहीत. तूर्त ही एकी घडवून आणणे साधले नसले तरी, युरोपला आपल्या पाठिशी उभे करण्यात अध्यक्ष निक्सन ह्यांनी यश मिळवले आहे.

---

## शाब्बास, करवीर पुत्रांनो

अराजके, दंगली देशभर बोकाळल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीवर रोज कोरडे ओढले जात आहेत. शिक्षक, प्राध्यापक, कुलगुरू आदींना विद्यार्थ्यांकडून योग्य तो मान मिळायचे तर राहू द्याच. पण त्यांना घेराव केल्याच्या, मारहाण केल्याच्या, त्यांचा अनादर केल्याच्या बातम्या प्रत्यही येत असतात. ह्या वातावरणात कोल्हापूरहून आलेल्या एका बातमीने गोड धक्का दिला. वयोवृद्ध शिक्षकांचा सत्कार करून वृद्धापकाळात त्यांना साहाय्य करण्यासाठी, कोल्हापूरच्या प्रायव्हेट हायस्कूलच्या आजी–माजी विद्यार्थ्यांनी निधी उभारण्याचा एक अभिनव उपक्रम सुरू केला आहे. ह्या शाळेचे एक माजी विज्ञानशिक्षक व मुख्याध्यापक श्री. अ. वि. जोशी ह्यांनी एकाहत्तराव्या वर्षात पदार्पण केले असून, त्यांच्यापासून ह्या निधीच्या विनियोगाचा मुहूर्त परवा कोल्हापुरात करण्यात आला. शिक्षकांना नुसते साहाय्य करणे ह्यापेक्षाही त्यामागची, शिक्षकाविषयीच्या आदराची जी भावना आहे, तिला अधिक महत्त्व आहे. उभ्या भारतातील अशा तऱ्हेचा हा पहिलाच उपक्रम ! करवीरांनो, ह्या विधायक कार्याबद्दल तुमचे मनःपूर्वक अभिनंदन ! तुमचा हा आदर्श इतरही डोळ्यांपुढे ठेवतील अशी आशा बाळगू या !

○

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649

| रा | जा | शि | व | छ | त्र | प | ति |
|---|---|---|---|---|---|---|---|

ब. मो. पुरंदरे । मूल्य रुपये बेचाळीस

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., १७–ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ. पुणे. येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर